# माझ्या राजकीय
# आठवणी

## पुरस्कार

आमच्या छोट्या गांवी आम्ही केलेल्या छोट्या प्रयत्नांची हकिकत
वाचतांना माझे लहानपण पुन्हा माझ्या डोळ्यासमोर आले.

नामदार श्री. यशवंतरावजी चव्हाण
अर्थमंत्री भारतसरकार

★

## जरूर तेवढे प्रास्ताविक

पद्मश्री बाबुरावजी गोखले

Not to be Issued Out

लेखक :

हरी पांडुरंग तथा हरिभाऊ लाड

Ref.Only
LAD
G04227
Y.C.P Ref.Only/LAD
G04227 LIBRARY

# माझ्या राजकीय
# आठवणी

यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय मुंबई ४०० ०२१

G 02105

Not to be Issued Out

## पुरस्कार

आमच्या छोट्या गांवी आम्ही केलेल्या छोट्या प्रयत्नांची हकिकत

वाचतांना माझे लहानपण पुन्हा माझ्या डोळ्यासमोर आले.

नामदार श्री. यशवंतरावजी चव्हाण

अर्थमंत्री भारतसरकार

★

## जरूर तेवढे प्रास्ताविक

पद्मश्री बाबुरावजी गोखले

G04x8

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.
ACC. NO.: G02153
DATE: 24/05/12

Ref. Book
G04227

लेखक :

हरी पांडुरंग तथा हरिभाऊ लाड

# माझ्या राजकीय आठवणी

## पुरस्कार

नामदार श्री. यशवंतरावजी चव्हाण

अर्थमंत्री भारतसरकार

★

## जरूर तेवढे प्रास्ताविक

पद्मश्री बाबुरावजी गोखले

लेखक :

हरी पांडुरंग तथा हरिभाऊ लाड

प्रकाशक :

श्री. श्रीपाद रामचंद्र देशपांडे

गुरुवार पेठ, कराड.

**–( किंमत साडेतीन रुपये )–**

मुद्रक :

वि. रा. नावडीकर

श्रीदत्त प्रि. प्रेस, कराड.

१, रेसकोर्स रोड,
नवी दिल्ली ११००११
दिनांक ३ जून १९७४

माझ्याहून थोडे वयाने मोठे व खरे म्हणजे माझे बालपणचे मित्र श्री. हरिभाऊ लाड यांनी आपल्या राजकीय आठवणी लिहिल्या आहेत. आम्हीं आमच्या लहानपणी एकत्र केलेल्या सार्वजनिक कामाचा वृत्तांत त्यांनी यात तपशीलाने सांगितला आहे. आमच्या छोटया गांवी आम्हीं केलेल्या छोटया प्रयत्नांची हकीकत वाचतांना माझे लहानपण पुन्हा माझ्या डोळयासमोर आले. श्री. हरिभाऊ लाड म्हणजे आमचे, दुबळया शरीराचे पण कणखर मनाचे खरे मित्र आहेत. त्यांच्या संबंधीचा माझा लोभ व आदर पहिल्यापासून आहे व अखेरपर्यन्त राहील. आम्ही लहानसहान माणसांनी असामान्य कामें करण्याची आकांक्षा धरली आणि शक्तीप्रमाणें थोडे थोडे प्रयत्न केलेत. त्यातूनच गांधीजींनी हा भारत निर्माण केला. आम्हां सर्व लहानांना गांधीजींच्या विचारांनी प्रेरित केले. त्याची आज कृतज्ञतापूर्वक आठवण मनांत येते.

हरिभाऊंच्या आठवणी त्यांनी सुबोध, सुव्यवस्थित व कालक्रमाने लिहिल्या आहेत. माझ्या बाबतीतील कांही घटनांचा तपशील कदाचित पुढे–मागे करावा लागेल. परंतु तो त्यांनी सहृदयतेने व आपुलकीने लिहिला आहे. हरिभाऊंच्या या प्रकाशनास माझ्या शुभेच्छा.

(यशवंतराव चव्हाण)

# लेखकाचें अल्प निवेदन

मायभूमीचे स्वातंत्र्य हे जीवनाचे ध्येय मानून अनेक देशसेवकांनी आपले जीवित–वित्त मातृभूमिच्या सेवेंत अर्पण केले आहे. ना शारीरिक शक्ती ना बौद्धिक बळ अशा अवस्थेंत माझ्या सारख्याच्या हातून, कितीशी देशभक्ती नी कितपत देशसेवा घडली असेल याबद्दल माझा मीच मनोमन साशंक आहे. पण एवढी गोष्ट मात्र खरी कीं, माझ्या मनोमंदिरांत देशसेवेची जी एक छोटीशी ज्योत बाळपणीच प्रदीप्त झाली, ती मी कदाकाळी विझू दिली नाहीं. किंबहुना तिजवर अन्यविचारांची वा स्वार्थाची काजळी साचू दिली नाही. भक्ताची कसोटी पाहण्यासाठी परमेश्वर त्यावर संकट परंपरा आणून त्याला हैराण करून सोडीत असतो आणि या दिव्यांतून तावून सुलाखून बाहेर पडलेल्या भक्ताला तो हृदयाशी धरून कृतार्थ करून सोडतो असे म्हणतात.

माझा देश हा माझा देव आणि माझी दुबळयाची देशभक्ती ही मी त्याला अर्पण केलेले पत्र पुष्प फळ आणि तोय. माझा देश स्वतंत्र होऊन प्रगतीच्या वाटा चालू लागला. हे मी ' याचि देही याचि डोळा ' पाहू शकलो. हीच माझ्या भक्तीची एकमेव सांगता, असेच मानून चाललो आहे.

माझ्या देशाच्या स्वातंत्र्याचा लढा चालू असता जे समर प्रसंग चाललेले मी पहात होतो. त्यातील फार थोडया प्रसंगाचे फारच अल्प समजुतीनें मला समजून आलेले वर्णन मी पुढील पानांतून देण्याचा प्रयत्न केला आहे.

एक ध्येय, एक ध्यास या वृत्तीमुळे देशाच्या स्वातंत्र्य लढयांत प्रत्यहि होत असलेल्या घडामोडी मी यथाशक्ती वृत्तपत्रांतून, व्याख्यानातून, वाचनातून तसेंच मित्रपरिवाशी केलेल्या चर्चेतून मी मनाशी टिपत होतो व कवटाळीत होतो. त्यांना शब्दरूप देऊन लोकांपुढें मांडण्याचा माझा हा प्रयत्न आहे.

मला आठवल्या तशा माझ्या या ' राजकीय आठवणी ' मी लिहून काढल्या, जाणत्या लोकांपुढे केल्या. कारण त्यांना झाडून पुसून व्यवस्थित करण्याची आवश्यकता होती हे मी पूर्णपणें जाणून होतो. माझ्या या इच्छेला राष्ट्रीय वृत्तीची बीजें अंतःकरणांत रुजलेल्या व शिक्षकी व्यवसायात असतांना ' जे जे आपणासी ठावे, ते ते हळुं हळुं शिकवावे ' असे धोरण असणारे येथील एक शिक्षक श्री. बाळकृष्ण वासुदेव तथा बाबुराव घाटे यांनी माझ्या इच्छेला उत्साहानें सहाय्य करण्याचे मान्य केले. शालेय विषयांचे अध्यापन करीत असतांना विविध विषयांच्या संदर्भात देशभक्तीचा दृष्टीकोन विद्यार्थ्यांना

समजावून देण्याचा प्रयत्न ते करीत असत. सेवानिवृत्तीच्या कालांत रिकामपणाचा पण आवडीचा उद्योग म्हणून श्री. घाटे यांनी मला सहाय्य केले आहे. श्री शिवछत्रपती मेळयाच्या उपक्रमांतहि श्री. घाटे यांनी पद्यरचना करून मला पूर्वी मदत केली होती. या पुस्तकाच्या लेखनकार्यात त्यांनी केलेल्या सहाय्याबद्दल त्यांचे आभार मानणें माझें कर्तव्य आहे.

या ' माझ्या राजकीय आठवणी ' लिहून झाल्यावर कुतूहल म्हणून मी त्या माझे बालमित्र व राजकीय सोंगडी माननीय यशवंतराव चव्हाण यांना दाखविल्या. त्यांनी माझ्या लेखनांतील चुकांचे निदर्शन करून मला सतर्क केले. पण ' या आठवणी वाचतांना माझ्या बालपणीच्या स्मृती पुन्हा उजळून निघाल्या ' हे त्यांचे उद्गार अधिकच समाधानकारक वाटले आणि त्या आहेत तशा प्रकाशित करण्याचे धाडस मी केले आहे. या त्यांच्या आपुलकीच्या प्रोत्साहनाबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

राजकारणांत भाग घेत असतांना अनेक लहान मोठ्या कार्यकर्त्यांशी माझा जवळून संबंध आला. पण त्या सर्वांचा उल्लेख माझ्या लेखनांत आलेला नाही, पण पुढे मागे शक्य झाल्यास त्यासंबंधीचे माझे विचार पुस्तकरूपानें प्रकाशित करण्याचा माझा विचार आहे. ' सत्य संकल्पाचा दाता भगवान ' या न्यायानें तो योग लवकरच येईल असे मानून चालतो.

माझ्या प्रस्तुत प्रयत्नानें तरुणपिढीला राजकीय आंदोलनाचे ओझरते दर्शन होऊन तिच्या मनांत अल्पशी खळबळ आणि देशप्रेमाची ज्योत प्रज्वलित झाली तरी मला समाधान वाटेल.

माझ्या या पुस्तकरूप होत असलेल्या आठवणींना उजेडांत आणण्याचे कामी राजकारणाच्या आवडीनें आपल्या विद्यार्थीदशेपासून त्यांत भाग घेणारे पद्मश्री बाबुरावजी गोखले यांनी " जरुर तेवढे प्रास्ताविक " लिहून मला खरोखर उपकृत केले आहे. तसेच माननीय श्री. यशवंतरावजी चव्हाण यांनी आपल्या राजकीय कार्यबाहुल्यातून वेळ काढून " पुरस्कार " स्वरुप जे लेखन केले आहे, त्याबद्दल मी त्यांचा अंतःकरणापासून ऋणी आहे.

तसेंच प्रकाशक श्री. श्रीपाद रामचंद्र देशपांडे व मुद्रक श्री. वि. रा. नावडीकर यांच्या सहाय्याबद्दल त्यांचे आभार मानणे माझे कर्तव्यच होय.

– हरी पांडुरंग तथा हरिभाऊ लाड.

# जरूर तेवढेच प्रास्ताविक

आमचे देशभक्त मित्र श्री. हरि पांडुरंग लाड हे **" माझ्या राजकीय आठवणी "** या आपल्या पुस्तकाने ग्रंथकार म्हणून पुढे येत आहेत, ही मोठी अभिमानास्पद व अभिनंदनीय घटना आहे. कंत्राटदार, छापखानेवाले, अनेकानेक लहान मोठ्या कार्यांचे छुपे सूत्रधार आणि स्वातंत्र्याच्या आंदोलनातील चळवळे पुढारी म्हणून ते पुष्कळांना चांगले परिचित होते व आहेत. पण छापखान्याचे संचालक आणि " लोकक्रान्ति " या वृत्तपत्राचे व्यवस्थापक म्हणूनच त्यांचा आजवर साहित्यसृष्टीत अनुभवसिद्ध परिचय होता. आता प्रस्तुत पुस्तकाने हरिभाऊ ग्रंथकार या चढत्या वाढत्या पदवीने लोकमानसात स्थान पटकावित आहेत.

श्री. हरिभाऊ लाड यांच्या राजकीय आठवणी म्हणजे त्यांच्या जीवनातील राजकारणासाठी केलेल्या हालचालींचा व तदनुषंगिक गोष्टींचा इतिहास आहे. हा इतिहास प्रामुख्याने कऱ्हाड शहराशी व त्यातील नामदार यशवंतराव चव्हाण आणि स्वत: श्री. लाड यांच्या प्रगतिशीलतेशी निगडित असला तरी त्याची पार्श्वभूमि अखिल भारतीय स्वातंत्र्यान्दोलनाच्या आशा आकांक्षाची आहे. त्यामुळे हरिभाऊंच्या आठवणींना विशेष प्रतिष्ठा आहे. निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळोणकरांचे वचन आहे की–

> " इतिहास खरा म्हटला म्हणजे मनुष्यजातीच्या मनोव्यापारांचे शाश्वत स्वरुप कोणते व प्रसंगानुरोधाने त्यावर कसकशी कार्ये घडतात याचे ज्यात उद्‌घाटन केले आहे, असा लेख होय. इतिहासापासून मुख्य होणारा लाभ मानवजातीच्या मनोधर्मांचे ज्ञान. "

शास्त्रीबुवांच्या या वचनाचा प्रत्यय की हरिभाऊंच्या या पुस्तकाच्या वाचनाने येतोच येतो.

राजकीय म्हटल्यातरी हरिभाऊंनी अनुषंगिक, सामाजिक आणि संघटनात्मक आठवणीही या पुस्तकात नमूद केल्या असल्या कारणाने, हरिभाऊंचे आत्मचरित्र वाचकांना या पुस्तकात तपशीलवार नसले तरी त्रोटकपणें पण साखळीसूत पहावयास सापडते. आणि सहजासहजी ना. यशवंतरावजी चव्हाण यांच्या बालपणापासूनच्या सहज प्रवृत्तींचा व सार्वजनिक जीवनासाठी विशाल होत गेलेल्या मनाचा आणि बुद्धिचा परिचय

होत जातो. म्हणून कऱ्हाडच्या गेल्या अर्धशतकातील राजकारणी जीवनाच्या मिळवणीने या पुस्तकाकडे पाहिले म्हणजे ते राष्ट्र जीवनरुपी शिवप्रभूला वाहिलेले बिल्वदल असल्याचा आल्हाद वाचकमनाला होतो.

दे. भ. लाड यांचे हे पहिलेच पुस्तक असल्याकारणाने, जशी त्यात नवीन वाटचालीची नवलाई आहे, तशीच भाषेची शैली व सोपेपणा यांची रंगतही आहे. आपल्या सगळया आठवणी तारीख महिन्यांच्या नोंदी घेऊन सांगणारे हरिभाऊ, गच्चीवर चांदण्यात नातवंडाच्या मेळाव्यात बसून इतिहास सांस्कृतिक बिनचूकपणे आठ–आठवून सांगणाऱ्या वत्सल आजोबासारखेही कित्येक ठिकाणी वाटतात. पुस्तकाचा हा विशेष मला हृद्य वाटतो.

कऱ्हाडच्या जीवनात " मुख्य सूत्र हाती घ्यावे । करणे ते लोकाकरवी करवावे ।। " अशी जी लोकसंग्रही मंडळी आहेत, त्यांत दे. भ. हरिभाऊ यांचे एक आगळे स्थान आहे. ते स्थान साजरे करतांना हरिभाऊंना जसा अनेकांचा दुवा मिळाला, तसाच त्यांच्या करारी निश्चितार्थी वृत्तीमुळे काही प्रसंगी काहीजणांचा रुसवाही सोसावा लागला. सार्वजनिक जीवनाच्या चव्हाटयावर उभे राहणाराने हाराकरता नुसती मान पुढे करून भागत नाही; प्रसंगविशेषी माराकरता पाठही ताठ ठेवावी लागते. हरिभाऊंना ते पक्के ठाऊक असल्याकारणाने, त्यांचे सार्वजनिक जीवन निभावले आहे. हरिभाऊंच्या प्रस्तुत पुस्तकाचेही प्रबोधन हेच आहे की " मी सर्वप्रथम भारतीय असून मग कार्यक्षेत्राप्रमाणे लहान मोठा कोणीतरी दुसरा आहे. " विनयी पण विशाल दृष्टीची ही भारतीय नागरीकता आत्मसात करण्यासाठी लहान थोर सर्व कऱ्हाडकरांनी आणि भारताच्या नागरीकातील कऱ्हाडबद्दल आपुलकी, ओढ अगर आकर्षण असणारांच्या हाती हरिभाऊंचे हे पुस्तक जावे व त्यांच्या लेखन परिश्रम हेतूचे सार्थक व्हावे.

कऱ्हाड
३० मे १९७४

– पु. पां. गोखले

☆

हितगुज-



# मी व सार्वजनिक कार्याची आवड

मी शरीराने असा व्यंग की, ज्यामुळे माझी उंची कमी भासावी. शालेय शिक्षणाच्याबाबत प्रगती बरी असायची ! गणित, भूमिती व इतिहास हे माझे आवडते विषय. प्रथम मातोश्री व नंतर वडील भाऊ यांच्या अकाली निधनामुळे मला माझा शालेय अभ्यासक्रम थोडक्यातच आटोपावा लागला. प्राथमिक शाळेच्या अखेरची परीक्षा उत्तीर्ण होऊन इंग्रजी २-३ इयत्तापर्यंत मजल मारतो तोच माझ्या शिक्षणाची इतिश्री झाली व घरच्या नडीशी टक्कर देण्यास मला निरनिराळे व्यवसाय करावे लागले.

वृत्तपत्र वाचनाचा नाद असल्यामुळे इंग्रजी मराठी वृत्तपत्राचे वाचन, श्रवणाने व मूळच्या चौकस बुद्धीमुळे काहीशी ध्येयभावना मूळ धरू लागली. आणि याचाच परिपाक म्हणजे अविवाहित राहून काही सार्वजनिक देशकार्य

करीत रहावे असा मनाचा कल वाहू लागला. पण मृत्यूशय्येवर पडलेल्या वडिलांनी माझ्याकडून विवाह करण्याचे वचन घेतले. त्यांचे मन मोडू नये, निदान मृत्यूसमयी त्यांना दुःख देणे बरे न वाटल्याने त्यांना ' विवाह करीन ' असे वचन मला द्यावे लागले.

वडिलांच्या मृत्यूनंतर इमारतीलाकडाची वखार, शेंगा फोडण्याची गिरणी, बांधकाम–खात्याची कॉन्ट्रॅक्टची कामे व छापखाना वगैरे उद्योग केले. मी जरी असे उद्योग करीत होतो तरी अंगी बाणू लागलेली राष्ट्रीयवृत्ती फिरफिरून जागी होऊन मला हाती घेतलेला व्यवसाय सरळ सुचू देत नव्हती, असे म्हटले तरी चालेल. वरील उद्योगधंद्यांतून निवृत्त होण्याला घडलेली अनेक कारणे देता येतील. पण त्यापासून तादृश्य असा काहीच फायदा आता नसल्यामुळे त्यांचा उल्लेख टाळून मी माझ्या सार्वजनिक कार्यातील अल्प स्वल्प लोकसेवेच्या कार्यासंबंधी लिहिण्याचे ठरविले असल्यामुळे आता त्याकडे वळावयास पाहिजे.

शालेय काळात निव्वळ हौसेने वृत्तपत्रांची ने आण करण्याचे काम आमचे दे. भ. सदाशिव खंडो तथा आण्णासो. अळतेकर, श्री. नानासो भागवत, श्री. पांडुआण्णा पाठक आदि शेजारी गावकऱ्यांच्या कृपाप्रसादाने करण्याचा योग आला होता. प्रथम प्रथम तर इंग्रजी वृत्तपत्रांतील चित्रे पहाणे व मराठी वर्तमानपत्रातील ठकळ ठशाची अक्षरे जुळवून वाचणे एवढाच लाभ या कामगिरीतून झाल्याचे स्मरते. मात्र याहून मोठा फायदा झाला तो गावातील मोठ्या लोकांच्या ओळखीचा व त्यांच्या कौतुकदृष्टीचा.

## श्री. यशवंतरावजींच्या लौकिकाच्या पायाचा दगड

सन १९२४ मध्ये धर्मवीर वटाणे यांच्या सहवासात संपूर्ण खादीधारी व्रताच्या पालनामुळे कॉंग्रेस सभासदत्व स्वीकारले. सातारा जिल्ह्यातर्फे महाराष्ट्र कॉंग्रेसवर कराड तालुक्यातून निवड झाली. पुढे वडिलांच्या मृत्यूनंतर १९२८ साली विवाहबद्ध झालो. सन १९२५ पासून श्रीगणेशोत्सव, श्रीशिवजयंतीउत्सव अशा राष्ट्रीय उत्सवात मनापासून भाग घेऊ लागलो होतो. याच कालात समवयस्क व समानवृत्तीच्या अशा श्री. यशवंतराव चव्हाण

( सध्याचे भारताचे अर्थमंत्री ) व श्री. शिवाजीराव बटाणे यांसारख्या मित्रांशी सहवास आल्याने माझे कार्यक्षेत्र बऱ्याच अंशांनी सार्वजनिक कार्य हेच होऊन बसले. श्री. यशवंतराव हे माझ्याहून बरेच लहान असले तरी त्यांची कुशाग्रबुद्धी व कोणतेही काम अभ्यासून व तळमळीने करण्याचा गुण त्यांच्यामध्ये असल्यामुळे त्यांनी केलेले कार्य व मिळविलेले यश हे जनतेपुढे प्रकट असेच झाले आहे. पण अत्यंत नम्र आणि गौरवाचा लेशही मनात न आणता श्री. यशवंतरावांच्या लौकिकाच्या पायाचा दगड म्हणवून घेण्यास मला मोठा अभिमान वाटण्यासारखी परिस्थिती खासच आहे. केवळ याच विचारातून प्रस्तुतच्या ' माझ्या राजकीय आठवणीचे ' प्रकाशन करण्याचे धाडस मी करीत आहे.

राष्ट्रीय विचारांचे उगमस्थान जे पुणे शहर त्यांतून केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर अखिल भारताला स्वातंत्र्यप्राप्ती विषयीची तळमळ प्राप्त होत असलेल्या काळात आमचे कराडगाव त्यापासून कसे दूर राहू शकणार ? आमच्या घराशेजारीच रहात असलेल्या दे. भ. आप्पासाहेब अळतेकरांच्या घरी सदैव राजकारणाच्या गोष्टी चालत, आणि त्या ऐकून मन विचलित झाल्यावाचून रहात नसे.

## दे. भ. सदाशिव खंडो उर्फ आप्पासाहेब अळतेकर

कोल्हापूर संस्थानाला वावडचा असलेल्या राष्ट्रीयवृत्तीमुळे त्या संस्थानातून हद्दपार झालेल्या व कराडात वास्तव्य करणाऱ्या दे. भ. आप्पासाहेबांच्या समर्थ देशभक्तीची शिकवण तशीच प्रभावी होती. श्रीगणेशोत्सव व श्रीशिवजयंत्योत्सव कराडात धुमधडाक्याने होत. त्यांस जोरात चालना मिळाली. त्यांत भाग घेण्याचे भाग्य साधून घेतल्याशिवाय मला राहवले नाही. हे दोन्ही उत्सव राष्ट्रीय उत्सव म्हणून साजरे करावयाचे तर त्यांत व्याख्याने, राष्ट्रीय कीर्तने, पोवाडे आदि राष्ट्रीय विचारप्रवर्तक कार्यक्रम अवश्यक होते. आणि त्यादृष्टीने आमच्या गावातील कार्यक्रमांत या गोष्टींचा आम्ही प्रामुख्याने समावेश करीत होतो. दे. भ. अच्युतराव कोल्हटकर, राष्ट्रीय कीर्तनकार वाईचे डॉ. पटवर्धन, पोवाडेकार गायक शाहीर पा. द.

खाडीलकर, इत्यादि राष्ट्रीय प्रचारकांचे कार्यक्रम आम्ही धुमधडाक्याने घडवून आणीत असू. त्यामुळे समाज–मनात राष्ट्रीय विचाराचे वारे शिरू लागत. हा तर देशाचा मोठा फायदा होता. पण आम्ही अधिक विचारसंपन्न होत होतो. हा आमचा राजकीय स्वार्थ साधत होता. देशाचा प्राचीन इतिहास, परदेशात झालेल्या राजकीय क्रांत्या इत्यादी गोष्टी ऐकून एक प्रकारची उर्मी अंतःकरणाच्या तळापासून उसळत असे. आणि आपणही आपल्या देशासाठी तनमन धनाने झटले पाहिजे, किंबहुना देशासाठी प्राणार्पणही केले पाहिजे असे वाटू लागे.

राजकारणांचा मूलभूत अभ्यास जरी मला करता आला नाही तरी व्याख्याने, प्रवचने, राष्ट्रीय कीर्तने, वृत्तपत्रांच्या नियमित वाचनाने तसेच श्री. यशवंतरावासारख्या कुशाग्र बुद्धीच्या नवविचाराच्या तरुणाशी केलेल्या विचारविनिमयाने व सहकाराने बहुश्रुत होवून राजकारणाचे धडे मला घेता आले.

अंतःकरणातील देशप्रेमाने उत्स्फूर्त होऊन माझ्या हातून जे थोडेबहुत कार्य झाले त्यातूनच उद्‌भवलेल्या किंवा अनुभवलेल्या या ' माझ्या राजकीय आठवणी ' होत.

★

# श्री. यशवंतराव चव्हाण

मनुष्य मोठा झाल्यावर त्याच्या लहानपणच्या आठवणी आणि लहान-सहान गोष्टी, मोठ्या आणि कौतुकाचा विषय. होऊन बसतात, ही नेहमीचीच गोष्ट आहे. भारताच्या केंद्रीय मंत्रीमंडळांत संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री व त्या आधी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री या जागावर विराजमान होऊन कौशल्यपूर्ण कारभार हाकू लागल्यावर श्री. यशवंतरावांच्या पूर्व चरित्राची आठवण त्यांच्या आवतीभोवती वावरणाऱ्या मंडळींना व इतरेजनांना होऊ लागणे हे साहजिकच आहे.

मला मात्र श्री. यशवंतरावांच्या लहानपणापासून व काही वर्षे रात्रंदिवस निकट सान्निध्यांत असल्याकारणाने त्यांची होत असलेली प्रगती सातत्याने पहावयाचे भाग्य लाभले आहे. प्रतिकूल प्रापंचिक परिस्थितीतही

त्यांनी विद्यार्थीदशेपासून केलेली लोकजागृती व दाखविलेले संघटनाचातुर्य बहुमोलाचेच आहे.

हल्लीच्या सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रे या आपल्या आजोळी श्री. यशवंतरावांचा जन्म झाला. त्यांचे पितांजी मूळचे विटे, तालुका खानापूर जिल्हा सांगली येथील रहिवासी. तेथे त्यांचे लहानसे घर व एकर दोन एकराची शेतीवाडी होती. सरकारी नोकरीच्या निमित्ताने श्री. यशवंतरावांचे वडील कराडास बरेच दिवस राहून तेथेच दिवंगत झाले. वडील बंधू श्री. ज्ञानोबांना वडिलांचे जागेवरच नोकरीची संधी मिळाल्याने या कुटुंबाचे वास्तव्य कराडासच कायम झाले.

वडिलांचे मृत्यूसमयी श्री. यशवंतराव केवळ दोन तीन वर्षाचे होते. त्यांना पितृसुख लाभले नाही असे म्हणावे लागेल. वडील बंधू श्री. ज्ञानोबा व श्री. गणपतराव. तसेच धार्मिक प्रवृतीच्या त्यांच्या मातोश्री विठाबाई यांच्या छायेखाली श्री. यशवंतरावांनी आपले शिक्षण कराड येथे सुरू केले. पण अंतःकरणातील स्वातंत्र्यप्रेमाच्या उर्मीनी शालांत परिक्षेपर्यंतचा कालही सुरळीतपणे त्यांना चोखाळता आला नाही. टिळक हायस्कूलमधील झेंडा प्रकरण, श्री छत्रपती मंडळातील श्री शिवाजी उत्सव, राष्ट्रीय चळवळींतील संघटनाकार्य, भितीपत्रके, बुलेटिन आदिमुळे शालांत परीक्षा उत्तीर्ण होण्यासही कारावासामुळे त्यांना दोन तीन वर्षे अधिक कालावधी घालवावा लागला. या सर्व कालावधीत तसेच महाविद्यालयीन अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अन्यविषयावरील ग्रंथांचे सखोल वाचन व ज्ञान संपादन त्यांनी अहर्निश केले. त्यायोगे झालेल्या ज्ञानाच्या जोरावर वादविवाद व चर्चा करून त्यांनी आपले विचार अधिकच खबीर करून घेतले.

सन १९४०-१९४१ च्या सुमारास वकिलीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर काही महिने त्यांनी वकिलीही केली. पण श्री. यशवंतरावांच्या मनाचा कल राजकीय चळवळीकडेच प्रामुख्याने असल्यामुळे लोकजागृतीचे त्यांचे कार्य अव्याहत चालू होते. त्याच सुमारास त्यांचा विवाह फलटणच्या मोरे घराण्यातील सौ. वेणूताई या सुकन्येशी झाला. सन १९४२ च्या राष्ट्रीय आंदोलनांत श्री. यशवंतराव भूमिगत राहून लोकजागृतीचे कार्य अविरतपणे

करीत होते. सन १९४४ मध्ये त्यांना अटक करून स्थानबद्ध केले. पण लवकरच सरकारी हुकूमात झालेल्या एका गफलतीमुळे ते बंधमुक्त झाले. नंतर झालेली चूक सरकारी नोकरांचे नजरेस आल्यावर त्यांना पुन्हा अटक करून येरवडा जेलमध्ये स्थानबद्ध करून ठेविले. सन १९४४ मध्ये त्यांना कन्यारत्न झाले. पण दुर्दैवाने ही कन्या त्यांना फार दिवस लाभली नाही.

सन १९४४ मध्ये श्री. यशवंतराव चव्हाण जेलमध्ये असतांना त्यांचे वडील बंधू श्री. ज्ञानोबा निधन पावले. श्री. यशवंतरावांना त्यांच्या अकाली मृत्यूचे दुःख सहन करावे लागले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर श्री. यशवंतराव आपल्या तेजाने विधीमंडळांत पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून चमकू लागल्यावेळी त्यांचे द्वितीय बंधू श्री. गणपतराव यांचे निधन ता. १५-१२-४७ या दिवशी क्षयरोगाने झाले. पुढे श्री. यशवंतरावांची पत्नी सौ. वेणूताई याही क्षयरोगाची बाधा होऊन मिरजेच्या हॉस्पीटलमध्ये त्यांच्यावर औषधोपचार करण्यात आले अशा सर्व सांसारिक दुःखांत हालअपेष्टा सहन करीत श्री. यशवंतराव राजकीय क्षेत्रांत आपले पाऊल पुढे पुढे टाकीत चालले होते.

याठिकाणी एक गोष्ट नमूद करावयास पाहिजे की, स्वातंत्र्य पूर्वकाली जेमतेम कुटुंब पोषणाच्या परिस्थितीत श्री. यशवंतरावाच्या मातोश्री व वडील बंधुद्वय यांनी त्यांच्या राजकीय कार्यात अडथळा तर नाहीच आणला, पण त्यांच्या सहकाऱ्यासहि कोणत्याही प्रकारे दोष दिला नाही.

☆

# पूर्व काल

व्यापारमिषाने जलपर्यटन करून देशोदेशी साम्राज्य स्थापन करणाऱ्या ब्रिटीशांच्या मोहिमेत भारतालाही पारतंत्र्याचे जाळयांत अडकावे लागले. परंतु इंग्लंड आणि भारत यांत ५००० पेक्षां अधिक मैलांचे अंतर असल्याकारणाने राज्यकर्ते म्हणून इंग्रजांचा भारतीयासी जो संबंध आला त्या व्यतिरिक्त फारशी जानपहचान होण्यासारखे काही प्रथमतः तरी घडू शकले नाही.

सन १८६९ मध्ये सुवेजकालवा झाल्यापासून सन १८७२ त इंग्लंड व भारतामध्ये तारायंत्राचे दळणवळण सुरू होऊन भारत इंग्लंड जवळ येवू लागला. सन १८९२ साली भारताचे पितामह दादाभाई नौरोजी इंग्लंडच्या पार्टमेंटचे सभासद म्हणून निवडून आले व त्यांनी आपल्या भाषणांनी

पार्लमेंटमध्ये भारतासंबंधी जागृती केली. तसेच सन १८८५ मध्ये सेवानिवृत्त अधिकारी श्री. ह्यूमसाहेब यांनी काही भारतीय पुढाऱ्यांच्या सहाय्याने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना करून भारतीय स्वातंत्र्य-आंदोलनाचा श्रीगणेशा केला. त्यावेळचे भारताचे ग. जनरल लॉर्ड डफरीनसाहेब यांनीही भारतीय काँग्रेस स्थापन करण्याच्या कामी श्री. ह्यूमसाहेबांना पुष्कळच सहाय्य केले. राष्ट्रीयसभा सुरू झालेवर पुढील दहा पाच वर्षांत राष्ट्रीय सभेमार्फत विलायतेत भारतीयांच्या आशा आकांक्षांना तोंडफोडण्यासाठी पार्लमेंटमध्ये शिष्टमंडळे जावू लागली व त्यांच्यातील कै. सुरेंद्रनाथ बॅनर्जी, कै. नामदार गोखले यांच्यासारख्यांनी आपल्या भाषणांनी भारतीयाबरोबर इंग्लंडचेही लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न केला. सर चार्लस ब्रॅडला, सर हेन्री फॅसिस्ट, केरहार्डी यांच्यासारख्या काही उदार आत्म्यांनी भारतासंबंधीची आपली उदार मते प्रदर्शित करून भारताबद्दलची आपली आस्था प्रकट केली. लॉर्ड कर्झनचा करडा अंमल व त्यामुळे भारतात उत्पन्न झालेला असंतोष याचा प्रतिध्वनी इंग्लंडमध्ये पोचून इंग्लंडच्या पार्लमेंटचे लक्ष भारताकडे दिवसेदिवस अधिक लागू लागले.

सन १८९२ ते १९०५ या काळांत इंग्लंडच्या कायदेमंडळात काहीही फेरफार झाला नाही. याच कालांत भारताच्या व जगाच्या राजकारणांत मोठे स्थित्यंतर घडून आले. भारतीय राष्ट्रीय सभेची अधिवेशने दिवसेदिवस अधिक लोकप्रिय होऊन भारतांत राष्ट्रीय सभेचा बस बसत चालला. सालोसाल सरकारकडे राष्ट्रीय सभेने केलेले ठराव व विनंत्या कागदपत्रांच्या फायलींतून पडून राहू लागल्या. इंग्लंडच्या पार्लमेंटपुढे गाऱ्हाणे गाण्यास गेलेल्या शिष्टमंडळांची गाऱ्हाणी निरर्थक झाली. बेकार असंतुष्ट पदवीधरांची संख्या वाढू लागली. त्यातच कर्झनशाहीच्या कडक अमदानीने जनतेत असंतुष्टता व राजकीय जागृती उत्पन्न केली. राजकारणांत सनदशीर पक्षाच्या जोडीला भारतांतील तरुण क्रांतीकारक पुढे सरसावू लागले. त्यावेळच्या रशियासारख्या बलाढ्य राष्ट्रास एशिआई जपानसारख्या चिमुकल्या राष्ट्राने जीत केल्यामुळे आशियाच्या क्षितिजावर भाग्याचा सूर्य उगवला असे वाटू लागले, त्यामुळे तरुणामध्ये आशावादाचे नवचैतन्य संचारले.

सन १९०५ साली इंग्लंडच्या प्रधान मंडळांत फार वर्षांनी उलथापालथ होऊन हुजूरपक्ष अधिकारभ्रष्ट होवून उदारपक्ष अधिकारावर आला. सन १९०७ साली इंग्लंडच्या इंडिया कौन्सिलमध्ये दोन हिंदी गृहस्थांचा प्रथम प्रवेश झाला व सन १९०९ साली गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळांत हिंदी माणसांचा प्रवेश म्हणजे हिंदी मनुष्याचा सरकारच्या अंतगृहांत प्रवेश होय. ही गोष्ट त्याकाळी फार महत्त्वाची वाटत होती. लॉर्ड मोर्लेसारखे नाणावलेले राजकारणी भारताला भारतमंत्री म्हणून लाभले. तेव्हा आता खरोखरच काही लाभ होणार असे काही भारतीयांना वाटू लागले. परंतु देशातील काही असंतुष्ट तरुणांच्या विचारास भलतीच दिशा लागून ते क्रांतीस व रक्तपातास उद्युक्त झाले. अशावेळी हिंदी जनतेत राजकीय असंतुष्टता कमी व्हावी म्हणून लॉर्ड मोर्ले यांनी आपले धोरणास अनुसरून सन १९०९ साली मोर्ले–मिंटो सुधारणा कायदा केला. सदर कायद्यामुळे हिंदी लोकांच्या हातांत खरीखुरी सत्ता आली नाही, पण त्यांना राजपद्धतीतील दोष दिग्दर्शित करण्यास वाव मिळाला. सन १९१४ च्या महायुद्धाने जगाचा त्याचबरोबर भारताच्या राजकारणांत एकदम क्रांती घडवून आणली नसती तर मोर्ले–मिंटो सुधारणांची आयुर्मर्यादा अधिक वाढली असती.

## क्रांतीसिंह वासुदेव बळवंत

दरम्यानच्या काळांत भारताला पारतंत्र्यातून स्वतंत्र करण्यासाठी भारतीय लोकांनी जी अनेक आंदोलने केली, त्यांत क्रांतीकारकांच्या आंदोलनाचे स्थान सर्वाधिक महत्वाचे आहे. भारताच्या संपूर्ण स्वातंत्र्याची पहिली घोषणा ह्याच क्रांतीकारकांनीच केली आहे. त्यांनी स्वतंत्र भारताच्या प्रतिष्ठापनेच्या ध्येयाला साकार करण्यासाठी क्रांतीच्या अग्निकुंडात आत्माहुती देऊन त्यागाची मोठीच परंपरा निर्माण केली आहे. भारतीय क्रांतीकारकांच्या स्वातंत्र्य प्रयत्नांना प्रथम आरंभ महाराष्ट्रातूनच झाला. क्रांती आन्दोलनाचे आद्यप्रवर्तक हुतात्मा वासुदेव बळवंत फडके हे होत. इंग्रजीसत्तेविरुद्ध सशस्त्र बंड घडवून आणण्याकरता त्यांनी प्रथम महाराष्ट्रीय सुशिक्षीतांना संघटीत करण्याचा प्रयत्न केला. पण तो यशस्वी झाला नाही.

तरीहि अशिक्षित रामोशांची संघटना करून सन १८७९ मध्ये त्यांनी ब्रिटिश-शासनाविरुद्ध बंड उभारले. सहा महिनेपर्यंत पुणे व पुण्याच्या आसपासचा परिसर हुतात्मा वासुदेव बळवंतांच्या नावाने दुमदुमून गेला. शेवटी त्यांना विश्वासघाताच्या कुटील नीतीने पकडून त्यांचेवर खटला भरण्यात आला, त्यात त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. एडनच्या तुरुंगातून पळून जाण्याचा अयशस्वी प्रयत्न केल्यामुळे त्यांचा अनन्वीत छळ करण्यात आला. त्यातच त्यांचा सन १८८३ च्या फेब्रुवारी महिन्यांत यातनामय अंत झाला.

## महर्षि आण्णासाहेब पटवर्धन

हुतात्मा वासुदेव बळवंताच्या नंतर महाराष्ट्रांत महर्षि आण्णासाहेब पटवर्धनांनी क्रांतीयुद्ध चेतविण्याचा प्रयत्न केला. ते कायद्याची व वैद्यकीची सर्वोच्च परिक्षा पास झाले होते. त्यांचा जन्म संपन्न घराण्यांत झाला होता. ते चारित्र्यसंपन्न, बुद्धिमान, लोकसंग्राहक होते. त्यांनी त्यावेळच्या इंदोर, बडोदा व लिमडी संस्थानाशी संबंध जमवून आपल्या प्रयत्नांना प्रारंभ केला. एकादा प्रांत संपूर्णपणे आपल्या आधीन असावा म्हणून त्यावेळीं निजामाच्या ताब्यांत असलेल्या विदर्भ प्रांतासाठी प्रयत्न चालविले. वऱ्हाडावर निजामाची कागदी मालकी असली तरी इंग्रजांचे निजामावर कर्ज असल्याने तो प्रांत वहिवाटीसाठी इंग्रजाकडेच होता. तेव्हां ते कर्ज देवून आपल्या आधीन करून घेण्यासाठी आण्णासाहेब पटवर्धनांनी निजामाचे विख्यात दिवाण सालारजंग यांच्याशी संधान बांधून योजना आखली. पण इंग्रज राज्यकर्त्यांना या योजनेचा व तिच्या मागील हेतूचा सुगावा लागून, त्यांनी सालारजंगावर विषप्रयोग केला व या एका योजनेचा नाश केला. नंतर आण्णासाहेबांनी सांगलीचे राजे आप्पासाहेब पटवर्धन यांच्याशी संधान बांधून पुन्हां एकवेळ प्रयत्न केला. काही कारणास्तव त्यांचा हाही प्रयत्न विफल झाला. तरीहि त्यांनी पुनश्च मद्रास इलाख्यांतील व्यंकट परिमाल नांवाच्या एका संस्थानिकाशी मैत्री जोडून प्रयत्न केले. पण तोहि संस्थानिक अकस्मात मरण पावला. या सर्व गोष्टींचा मनावर विलक्षण परिणाम होऊन आण्णासाहेबांनी राजकारण संन्यास घेतला. लोकमान्य टिळक आण्णासाहेबांना गुरुस्थानी कल्पून त्यांचे मार्गदर्शन घेत असत.

भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य बा. गं. टिळक यांच्या राजकीय जीवनावर क्रांतीसिंह वासुदेव बळवंत फडके, आण्णासाहेब पटवर्धन व विष्णुशास्त्री चिपळूणकर या व्यक्तींच्या व्यक्तिमत्वाचा ठसा उमटलेला आहे. वासुदेव बळवंताच्या व्यायाम शाळेत विद्यार्थी म्हणून लो. टिळक जात असत. त्यांच्यापासून स्वातंत्र्यवाद, आण्णासाहेब पटवर्धनांच्यापासून भारतीय जीवनदृष्टी आणि विष्णुशास्त्री चिपळूणरांच्यापासून जनशक्ती आव्हानांचा मत्र या तीन गोष्टी घेतल्या असे म्हणावयास हरकत नाहीं. लोकमान्यांनी केसरी व मराठा या वृत्तपत्रांच्याद्वारे जनमत चेतविण्याचे कार्य चालू केले. तसेंच क्रांतीकारक मार्गाचाही पाठपुरावा करून क्रांतीयुद्धाच्या निर्मितीचाही प्रयत्न केला. श्रीगणेशोत्सव, श्रीशिवजयंत्युत्सवासारख्या राष्ट्रीय उत्सवांचा प्रारंभ करून त्यांनी जनतेत असंतोषाच्या जागृतीचे कार्य सुरु केले. सन १८९६ मध्यें महाराष्ट्रांत दुष्काळ पडला व त्या मागोमाग आलेला प्लेग व त्याकामी रँडसाहेबांच्या नेतृत्वाखाली पुणे शहरावर झालेला अत्याचारी व अविचारी अम्मल याचा पुरेपूर फायदा घेवून लोकमान्य टिळकांनी जनतेत इंग्रजी राजवटीबद्दल असंतोष पसरविला. पण नुसता असंतोष चेतवीत राहण्यानें राष्ट्रात कधीच जोम निर्माण होत नाही. त्याच्या जोडीस परकीय सत्तेस दहशत वादही असणे जरूर असते. आणि त्यासाठी क्रांतीचे तंत्वज्ञान राजकारणांत मान्य केले गेले आहे. राजकारणाच्या तत्वज्ञानांत त्यासाठी दोन मार्गांचा पुरस्कार केलेला आहे. एका प्रचाराने असंतोष फैलावणे व दुसरा म्हणजे अत्याचारी राजसत्तेच्या मनांत धाक उत्पन्न करणे हे होत. त्यासाठी अत्याचाऱ्यांची हत्त्या घडवून आणणे आवश्यक असते. एखाद्या व्यक्तिच्या हत्तेने राज्ययंत्र उलथून न पडले तरी ते चालविणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मनांत मृत्यूची भिती निर्माण करून अत्याचारी मनोवृत्तीला पायबंद बसतो व त्यामुळें जनतेत प्रतिकाराचे धैर्य निर्माण होते हे ओळखून त्यातूनच लोकमान्यांचे क्रांतीकारक सहकारी व अनुयायी दे. भ. दामोदर चाफेकर यांनी २२ जून सन १८९० रोजी आपले बंधू बाळकृष्ण चाफेकर यांच्या सहकार्याने रँड व आयर्स्ट या अधिकाऱ्यांचा महाराणी व्हिक्टोरियाचे

ज्युबिली उत्सवाच्यावेळी खून केले गेले. या कटाची व कृत्याची बातमी सरकारला द्रवीड बंधूंनी दिली. तेव्हां त्यांचा बंदोबस्त चाफेकरांचे तिसरे बंधु वासुदेव चाफेकर व त्यांचे सहकारी रानडे यांनी द्रवीड बंधूंचा खून करून केला व फितुराना काय शिक्षा होते त्याचे प्रात्यक्षिक दाखविले. या प्रकरणी सर्व चाफेकर बंधु व त्यांचे सहकारी रानडे हे अलौकिक धैर्याने फाशी गेले. लोकमान्यांचे चाफेकर घराण्याशी अत्यंत घनिष्ट संबंध होते. उदयपूर संस्थानचे विख्यात दिवाण पंडीत शामजीकृष्ण वर्मा हे असतांना चाफेकर बंधूपैकीं दामोदर चाफेकरांची संस्थानी सैन्यांत भरती करण्याचे शिफारस–पत्र टिळकांनीच शामजीकृष्णाना पाठविले होते व या पुराव्याच्या अनुरोधाने त्यावेळचे पुण्याचे कलेक्टर लॅम्बसाहेब यांनी लोकमान्य टिळकांना अत्याचारी धमक्या देण्यास सुरवात केली. तेव्हा लो. टिळकांनी आपल्या केसरीतून ' सरकारचे डोके ठिकाणावर आहे का ' ? असा परखड लेख लिहिला व कलेक्टरसाहेबांच्या कारवायावर सडेतोड उत्तर दिले. रँड व आयर्स्ट या खूनानंतर लोकमान्य टिळकांनीं बाळकृष्ण हरी चाफेकर यांना हैद्राबादचे तत्कालीन न्यायाधीश श्री. ना. श्री. कोल्हटकर यांच्याकडे आश्रय मिळवून दिला. तसेच दामोदर चाफेकरांच्या फाशी जाण्याच्यावेळी लोकमान्यांच्या हस्ताक्षरांतील ' गीता ' ग्रंथाची त्यांनी केलेली मागणी लो. टिळकांनी पुरी केली. चाफेकरांची उत्तरक्रियाकर्मे टिळकांचे भाचे धोंडोपंत विध्वंस यांनी लोकमान्यांच्या आज्ञेनुसार केली. त्यामुळे सदर रँड व आयर्स्ट यांच्या खूनासंबंधी सरकारला लोकमान्यांचा संशय आला. परंतु जरूर तो पुरावा पुढे करता न आल्यामुळे तो आरोप सिद्ध होऊ शकला नाही.

लोकमान्य सन १९०१ मध्यें कलकत्त्यास तपस्विनी माताजी महाराणी यांच्या भेटीस गेले होते. तपस्विनी माताजी या झाशीच्या महाराणी लक्ष्मीबाई यांची भाची होय. त्यांचा नेपाळच्या राजघराण्याशी घनीष्ट संबंध होता. तेव्हा त्यांच्या सहाय्याने लो. टिळकांनी नेपाळशी संबंध जोडले व कृष्णाजीपंत खाडीलकर आणि हणमंतराव कुलकर्णी या दोघांना नेपाळमध्ये बंदुकांचा कारखाना काढण्यासाठी गुप्तपणे पाठविले. पण सरकारला त्याचा सुगावा लागून ही योजना प्रत्यक्षांत येऊ शकली नाही. बंगालचे क्रांतीकारक हेमचंद्रदास बॉंब तयार करण्याची विद्या युरोपमधून

शिकून आल्यावर त्याचे प्रात्यक्षिक पुण्याला चित्रशाळेच्या जागेत लो. टिळक व बासुकाका जोशी यांना करून दाखविले. चाफेकरांच्या हौतात्म्यापासून प्रेरणा घेवून स्वातंत्र्यवीर सावरकरांनी क्रांतीचे निशाण फडकाविले. त्यांनी सन १९०० मध्ये क्रांतीकारक संस्था स्थापन केली. सन १९०६ साली स्वातंत्र्यवीर सावरकर उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. त्यापूर्वीच त्यांनी भारतात क्रांतीपक्ष संघटीत केला होता. त्यांनी कायद्याचा अभ्यास इंग्लंडमध्ये करीत असतानाच तेथे क्रांतीसंस्थेचे जाळे निर्माण करणेस प्रारंभ केला. त्यांत लालाहरदयाळ, भाई परमानंद, सेनापती बापट यांच्यासारखे ध्येयनिष्ठ पुरुष सावरकरांच्या सहमतानें कार्य करीत होते. त्यावेळीच रशियाचे निहिलीस्ट, चिनचे सन्यत्सेन व त्यांचे अनुयायी इत्यादि आंतरराष्ट्रीय क्रांतीकारकांचा स्वा. सावरकराशी घनीष्ठ संबंध आला. सेनापती बापटांनी बाँब विद्या रशियन क्रांतीकारकाकडून हस्तगत केली. अशाप्रकारे बाँब तयार करण्याची विद्या सेनापती बापट व हेमचंद्र यांनी भारतांत आणली. बाँबतंत्र हस्तगत होताच, क्रांतीकारकांत त्याच्या प्रचारास व प्रयोगास सुरवात झाली. स्वा. सावरकरांनी रिव्हाल्व्हर्स वगैरे सामान विपुल प्रमाणांत भारतांत पाठविले. अशाप्रकारें क्रांतीकार्य व्यापक होत असतानांच स्वा. सावरकरांना लंडनमध्ये अटक करून भारतांत आणणेत आले व १२ मार्च सन १९११ ला दोन जन्मठेपा व आणखीहि शिक्षा झाल्या. एकूण शिक्षा ५५ वर्षे मुदतीच्या होत्या व त्या भोगण्यास त्यांना अंदमानास पाठविण्यांत आले. स्वा. सावरकरांनी जे अनेक क्रांतीकारक ग्रंथ लिहिले त्यांचे प्रकाशक हरदयाळ, भगतसिंग व सुभाषचंद्र बोस हे होते. स्वा. सावरकरांच्या अटकेनंतर त्यांचे शिष्य हरदयाळ व सहचारी रासबिहारी बसू यांनीं तेच कार्य पुढें नेटाने चालू ठेविले. हरदयाळ जसे क्रांतीकारक होते. तसेंच विख्यात पंडितहि होते. स्वा. सावरकरांचे अनुयायी चिदंबर पिल्ले व जिवलग मित्र व्ही. व्ही. एस. अय्यर यानी दक्षिण भारतात व रासबिहारी बसू यांनी पंजाब ते बंगाल, दिल्ली ते जबलपूर या भागात क्रांती चळवळ अत्यंत नेटाने चालू ठेविली. तसेंच हरदयाळ, खानखोजे, बरकतुल्ला, रामचंद्र प्रभृतींनी अमेरिकेत क्रांतीपक्ष जोरात संघटीत करणेस आरंभ केला. त्यांनी कॅनडा व अमेरीकेतील हजारो भारतीयांना संघटीत करून तिकडेहि

क्रांतीकारक पक्ष स्थापन केला. त्या पक्षामार्फत वर्तमानपत्रद्वारा भारतांतील चौदा भाषेत प्रचार सुरू केला. त्या पत्रांच्या हजारो प्रती भारतांत पाठवून क्रांतीयुद्धाचा प्रचार जोरात सुरू केला. त्यामुळें त्यांना इंग्रजाविरुद्ध जर्मन राष्ट्राचेहि सहाय्य मिळू लागले. अमेरिकेतील भारतीय धनीकांनी आर्थिक सहाय्य करून क्रांतीपक्षास संपन्न केले. अशावेळी सन १९१४ साली युरोपांत पहिल्या महायुद्धास प्रारंभ झाला.

## १९१४ सालचे युद्ध व त्याचा भारतीय राजकारणावरील परिणाम.

युरोपमध्यें सन १९१४ साली सुरू झालेल्या महायुद्धांत शस्त्रांचा खणखणाट चालू असता व इंग्लंड त्यामध्यें गुंतले असताना भारतमंत्री मॉंटेग्युसाहेबांनी भारतासाठीं खालीलप्रमाणें जाहीरनामा काढला. " ब्रिटिश सरकारचे असे धोरण आहे की, भारतांतील लोकांचे राज्यकारभाराशी अधिकाअधिक सहकार्य साधावे व या देशातील स्वयंशासित संस्थांची क्रमाक्रमाने वाढ होत जावी '' हेतू हा की, त्यामुळें भारतांत जबाबदार राज्यपद्धतीचा उदय होण्याची तयारी व्हावी व भारत हा ब्रिटिश राज्यांतील एकजीव घटक होऊन राहावा. "

इंग्लंड युद्धाच्या धुमश्चकीत होते. वसाहतींनी तापल्या तव्यावर पोळी भाजून घ्यावी. त्याप्रमाणें इंग्लंडला एकीकडे मदत करीत असताना साम्रा-ज्यांत आपले स्थान अधिकाधिक महत्त्वाचे करून घेण्याची निकड लागली होती. आयर्लंडमध्यें तर उघड उघड बंड झालेले ब्रिटिशांना मोडावे लागले होते. रशियात रशियन राज्यक्रांती होऊन झारशाही उलथून पडली होती व तेथें कांहीकाल झोटिंगशाही व नंतर लोकशाही सुरू झाली. अमेरिका युद्धांत पडली. राष्ट्राराष्ट्राचे स्वातंत्र्य निर्वेध रहावे, म्हणून अमेरिकेने युद्धांत उडी घेतली होती. इंग्लंड तर लहान लहान राष्ट्रांचे स्वातंत्र्य अबाधित रहावे म्हणून युद्धांत पडले होते. ब्रिटनमध्ये राष्ट्रीय प्रधान-मंडळ आले होते. इकडे भारतात महायुद्धाच्या प्रारंभी राजनिष्ठेची एकच लाट उसळली होती. भारताने आपले सैन्य व संपत्ती साम्राज्याच्या सेवेसाठी दिली, नव्हे तर ती

इंग्रजांनी सत्तेच्या जोरावर नेली होती. पश्चिम रणक्षेत्रावर संयुक्तांच्या फौजाची होणारी पिछेहाट फ्रान्समध्यें मार्ने नदीवर ज्या वीरांनी थोपवून धरली व पराभवाच्या परंपरेस कलाटणी दिली. त्या वीरांत हिंदी जवान प्रमुख होते. अशावेळीच भारतात भारतीय कायदे–कौन्सिलांतील जबाबदार पुढारी व लोकप्रिय पुढाऱ्यांनी बाहेर जाहीर सभांतून एकदिलाने राजकीय हक्काची मागणी केली. हिंदु–मुसलमान एक झाले, जहाल मवाळ एक झाले व या सर्वांनी एकमताने एकच मागणी केली. अशाप्रकारे इंग्लंडच्या पार्लमेंटचे भारताकडे लक्ष वेधण्याचे श्रेय सन १९१४ साली उत्पन्न झालेल्या महायुद्धास आहे. त्याप्रसंगी भारताने दाखविलेली राजनिष्ठा व केलेली मदत यांचा इंग्लंडवर परिणाम झाला. त्याचवेळी भारतात सर्व लोकांनी एकमताने जबाबदारीच्या स्वराज्याची मागणी केली. महायुद्ध चालू असतांना अमेरिकेचे प्रेसिडेंट विल्सन यांनी ' स्वयंनिर्णयाचे तत्व ' चौदा कलमी योजनेद्वारा सर्व राष्ट्रास लाविले पाहिजे असे तत्व प्रतिपादिले. अशारितीने राष्ट्रीय अंतर्राष्ट्रीय गोष्टींचा बराच परिणाम होऊन पूर्वीचे उदासीन पार्लमेंट भारतविषयीच्या प्रश्नासंबंधी अधिकाधिक जागृत बनले. त्यातील मजूर पक्षाने पार्लमेंटात भारताचा प्रश्न उचलून धरला.

ता. २० ऑगष्ट १९१७ चे आश्वासन जाहीर केल्यावर मॉंटेग्यूसाहेब भारतांत आले व त्यानी तत्कालीन गव्हर्नर जनरल लॉर्ड चेम्सफर्ड यांचेबरोबर भारतभर हिंडून हिंदी–लोकमताचा अंदाज घेतला व इंग्लंडला गेल्यावर नव्या सुधारणांचा कायदा पास करून घेतला. तोच सन १९१९ चा मॉंटेग्यू–चेम्सफर्ड रिफॉर्म अॅक्ट होय. हिंदी राज्यघटनेंत हिंदी लोकांचा प्रवेश कसा होत गेला ते समजून येईल.

सन १९१९ च्या कायद्याने हिंदी लोकांना जबाबदारीचे हक्क प्रथमच मिळाले. त्यासाठी जबाबदार राज्यपद्धतीच्या पहिल्या हप्त्याच्या प्रयोगास सुरवात झाली.

दरम्यानच्या काळांत सन १९१४ सालच्या महायुद्धाचा फायदा भारतीय क्रांतिकारकांनी कसा करून घेतला हे पाहिले पाहिजे. अमेरिकेतून पिंगळे, कर्तारसिंग प्रभृती शेकडो तरुण निरनिराळ्या मार्गांनी इंग्रजाविरुद्ध

सशस्त्र युद्ध करण्यासाठी भारतात येऊ लागले. त्यांनी निरनिराळ्या स्वतंत्र आघाड्यांवरून बंडे करून, इंग्रजी सत्तेविरुद्ध उठाव केला. परंतु इंग्रजांनी परिस्थिती ओळखून त्यांच्यावर प्रखर घाव घातले. त्यांत कित्येकांना फासावर लटकाविले, तर कैक तोफेच्या तोंडी गेले. अशारितीने सहस्रावधी क्रांतीकारकांचा अंत झाला. तरीहि पुढे सचींद्रनाथ संन्याल, चंद्रशेखर आझाद यांनी स्वतंत्र संघटनेमार्फत क्रांतीचा झेंडा फडकवित ठेविला. बंगालमध्ये यतिंद्रनाथ मुखोपाध्याय व सूर्यसेन प्रभृतींनी क्रांतीयज्ञ चालूच ठेवला. क्रांतीकारकांवरील काकोरी कटाचा खटला, असेंब्लीतील बॉंबचा धडधडांत, सँडर्सचा खून, दत्त, भगतसिंग, राजगुरु यांचे बलिदान अशा अनेक प्रसंगांनी क्रांतीकारकांचा आत्मयज्ञ चालूच होता.

## राजकारणांत प्रवेश

" स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे " या आदेशाने भारतीय जनता भारावून गेली होती. लोकमान्यांनी अनेक नवीन तत्त्वांचे आवाहन केले होते. अत्याचारी कटवाल्यांचा निषेध न करता सनदशीर चळवळीबद्दल समाजांत आकर्षण निर्माण केले. लोकांच्या आकांक्षा वाढल्या होत्या. स्वराज्याचे आंदोलन एका महत्वाच्या टप्प्यावर येऊन पोहोचले होते. पहिले महायुद्ध संपले होते. अशा ऐन मोक्याच्यावेळी लोकमान्य टिळकांचे निधन झाले. सारा भारत दुःखाच्या सागरात बुडून गेला. राजसत्तेने फोडा व झोडा या कुटिल नीतीचा मंत्र भारतभर तसेच महाराष्ट्रांतहि यापूर्वीच आरंभिला होता. मागासलेल्या समाजांत शिक्षणाच्या प्रचारासाठी कोल्हापूरच्या छत्रपती शाहूमहाराज्यांच्या नेतृत्वाखाली ' ब्राह्मण-ब्राह्मणेतर ' चळवळ जोरास लागली होती. तिचे एक अधिवेशन मोठ्या प्रमाणावर कराड येथे भरले. त्या अधिवेशनांत श्री. भास्करराव जाधव, केशवराव बागडे वकील, दिनकरराव जवळकर, केशवराव जेधे प्रभृती मंडळींनीं प्रमुख भाग घेतला होता. श्री. दिनकरराव जवळकरांच्या वक्तृत्वाचा समाजावर अत्यंत मोठा प्रभाव पडे. त्यावेळच्या तरुण पिढीच्या मनावर त्यांच्या भाषणाचा ठसा उमटे.

रौलट कायद्याविरुद्ध विशेषकरून उत्तर भारतात तीव्र असंतोष पसरला होता. या कायद्याविरुद्ध १३ एप्रिल १९१८ रोजीं अमृतसरच्या नागरिकांनी एक निषेधपर सभा जालीयनवाला बागेत भरविली होती. या सभेस स्त्री पुरुष मिळून सुमारे वीसहजार नागरीक उपस्थित होते. सभेस सुरवात होते न होते, तोच जनरल डायरनें आपल्या लष्करी तुकडीसह एकदम गोळीबारास सुरवात केली. या अमानुष गोळीबारात चारशे निरपराध लोक मारले गेले व दोनशे जखमी झाले.

## श्री. यशवंतराव व मी

अशा रितीनें भारतीय जनतेंत अन्याय वागणूकीमुळें असंतोष फैलावत होता. त्याला आम्हीहि अपवाद नव्हतो. पुण्यास ब्राम्हणेतर पक्षाचें ' मजूर ' नांवाचे मुखपत्र निघत असे. हे पत्र कराडमध्यें बहुधा आम्हीच प्रथम मागविले. ते साल १९२४ असावे. त्यावेळी माझ्या सारखेच वाचनाचे अत्यंत नादी श्री. यशवंतराव चव्हाण यांची व माझी मजूर पत्राच्या वाचनाच्या निमित्ताने ओळख झाली. हळुहळू जिव्हाळा उत्पन्न झाला. राजकारणांतील सर्व विषयावर चर्चा होऊ लागली. श्री. यशवंतराव माझ्यापेक्षा वयाने लहान असले तरी सर्व विषयावर सुक्ष्मतेनें बोलत. त्यामुळें आम्हा दोघांचे संघटन दृढ होत गेले. अशा वेळचे बोलण्याचे विषय असे असत की जालीयनवाला बाग, पहिले महायुद्ध, त्या निमित्ताने महात्मा गांधीनी इंग्रजांना लष्कर भरतीस केलेली मदत, लोकमान्य टिळकांची होमरूल चळवळ, प्रतियोगी सहकार, इंग्रजी सत्तेचे फोडाझोडा धोरण, ब्राम्हणेतर चळवळीपासून शिकायाचे तत्वज्ञान, साधनशुचिता व पावित्र्य यांचा सार्वजनिक जीवनावर होणारा परिणाम वगैरे कितीतरी गोष्टी आमच्या चर्चेचे विषय असत.

जागतीक महायुद्ध १९१९ मध्ये संपून तहाच्या वाटाघाटीत तुर्कांची खिलाफत नामशेष होण्याच्या संभवाने भारतातल्या मुसलमानांना भेडसावले. तेव्हां भारतातील मुसलमानांनी खिलाफत जगविण्याची चळवळ सुरू केली. हिंदुमुसलमानांच्या एकीचे साधन या नात्याने महात्मा गांधींनी ती चळवळ आपल्या पोटाशी धरली व प्रथम असहकारतेचा महामंत्र मुसलमानांना

रुजविला. या मताने सारा भारतदेश व्यापला. खिलाफत चळवळीचे प्रचारार्थ कराडास अनेक मौलवी व इतर वक्ते येत असत. यांची उत्तेजक व्याख्याने आम्हीही ऐकत असू.

## महात्मा गांधीचे नेतृत्व

महायुद्धानंतर इंग्रज सरकारने भारतास दिलेली वचने मोडली. लोकमान्यांच्या मृत्यूनंतर राजकीय धुरा महात्मा गांधींनी स्विकारली. सन १९२० साली कलकत्त्यास भरलेल्या कॉंग्रेसच्या जादा अधिवेशनात व नंतर त्याचवर्षी डिसेंबरांत झालेल्या नेहमीच्या वार्षिक अधिवेशनात याप्रमाणे दोन वेळा महात्मा गांधींची राजकीय असहकारीता मान्यता पावताच भारताच्या राजकारणाला नवीन वळण लागले. असहकाराच्या आरंभाच्या काळात सन १९२० च्या नोव्हेंबरांत महात्मा गांधींनी अखिल भारतीय दौरा मौलाना महमदअल्ली व मौलाना शौकतअल्ली व त्यांच्या मासाहेब यांना बरोबर घेऊन काढला होता. त्यावेळीं ते कराडासहि आले होते. सभा कराड गोरक्षण संस्थेच्या जागेत होती. त्यावेळी म. गांधी वगैरेंचे जवळून दर्शन घेण्यासाठी सभेच्या अगोदर दोन तीन तास स्टेजजवळ बसून राहिलो होतो. व्याख्याने हिंदी भाषेत झाली. नीटशी कांहीं समजली नाहीत. पण होमरूल व खिलाफत चळवळ नेटाने चालविण्याचा उपदेश व देशभक्तीचा कानमंत्र कानाशी गुणगुणू लागला. असहकार म्हणजे इंग्रजी राजसत्तेविरुद्ध संप व तो सातारा जिल्ह्यांत प्रथम सुरू झाला. त्याचा आरंभ ज्यांचे कुलकर्णी वतन खालसा होत होते, अशा लोकांचे हातून व वाई तालुक्यातील शाळा मास्तरांच्या पासूनच. कुलकर्णी संपाचेवेळी व शाळा मास्तरांच्या संपाचे वेळी म्हणजे सन १९२१ साली मराठी सातवी पास झाल्यावर सरकारशी सहकार करणाऱ्या लोकांच्या फसवणूकीने तलाठी नेमण्याच्या योजनेप्रमाणे तलाठ्याच्या जागेसाठी माझा अर्ज लिहून घेतला. त्यावेळचे कराडचे कुलकर्णी श्री. बापुराव कुलकर्णी यांनीहि कुलकर्णी वतनी कामाचा राजीनामा दिला होता. त्यावेळच्या कुलकर्णी वतनी मंडळींनी तलाठी योजनेस माणसे मिळू नयेत व राजसत्तेची तलाठी योजना यशस्वी होऊ नये, म्हणून प्रयत्न केला. तेव्हा माझे वडिलांनीहि संपवाले कुलकर्णी

लोकांचीविरुद्ध आपण म्हणजे आपले मुलाने सरकारचे नलाठी योजनेप्रमाणे नोकरी धरून सरकारचे हात बळकट करू नयेत व स्वबांधवांचे विरोधात सामील होऊ नये ही बाब मला पटवून, वडिलांनी नोकरी मिळणेपूर्वीच त्या-पासून परावृत्त केले. त्यावेळी माझ्या वडिलांनी त्यावेळचे परिस्थितीनुरुप जो उपदेश केला, त्यातूनच इंग्रजी राजसत्तेशी सहकार न करण्याचा माझा निश्चय कायम झाला. परंतु इंग्रजी राजवटीची छाप मनावर बळकट अस-ल्याने देशभक्तीसाठी काय करावे ते अनेक व्याख्याने ऐकूनहि नीट ध्यानी आले नाही. परंतु एक दिवस अकस्मात आमचे शेजारचे दे. भ. आप्पासाहेब आळतेकर यांचे घरी दे. भ. शामकवी हे प्रभावी कार्यकर्ते आले. त्यांचे कराडातील अनेक निर्भिड कार्यक्रम, ओजस्वी वाणी व स्फूर्तीदायक काव्ये यामुळे मनावरील भितीचे दडपण नाहीसे झाले. स्वातंत्र्याची ज्योत अन्या-याने व अत्याचाराने विझविता येते असे राजसत्तेला नेहमीच वाटत असते, परंतु आजवरच्या जगाच्या इतिहासाने ही गोष्ट निखालस खोटी ठरविली आहे. हा सिद्धांत दे. भ. शामकवीच्या कराडातील चळवळीने कायमचा बळकट झाला. दे. भ. शामकवींनी बरेच दिवस कराडमध्ये गल्लीबोळांतून व्याख्याने दिली, पद्ये गायिली आणि प्रत्यक्ष त्यावेळचे मामलेदार, फौजदार, पोलीस इन्स्पेक्टर यांची तोंडावर फजिती केली. त्यामुळे लोकांच्या मना-वरील भितीचे दडपण कमी होवून साहसाने देशसेवा करण्याची उमेद निर्माण झाली. नंतर प्रभातफेऱ्या, व्याख्याने यांना न भिता हजर राहू लागलो व दे. भ. आप्पासाहेब अळतेकर, दे. भ. पांडुआण्णा शिराळकर, दे. भ. धर्मवीर वटाणे यांचे नेतृत्वाखाली आम्ही चळवळीत भाग घेऊ लागलो. तेव्हा कराडांत मामलेदारसाहेबांनी १४४ कलम पुकारले. दे. भ. शामकवीच्या व्याख्यानास बंदी घातली तरी त्यास दाद न देता, वटाणे शिवमंदीरासमोर सभा जाहिर झाली. सभेस अत्यंत मोठा लोकसमुदाय जमला होता. त्यावेळचे पोलिस सब इन्स्पेक्टर व पोलीस हडेलहप्पीने वागले. टोळधाडीप्रमाणे सभेवर चालून आले. त्यामुळे लोक सैरावैरा पळून निघून गेले. सभेची सर्व जबाबदारी दे. भ. शामकवींच्यावर. त्यांना पोलीसांनी अटक केली. त्यावेळी शामकवींनी जो निर्भयपणा दाखविला, त्यामुळे आमच्या मनावरील भितीचे दडपण अजिबात नष्ट झाले. दे. भ. शामकवींना या कायदेभंगाचे खटल्यात ६ महिने

सक्तमजुरी व दोनशे रुपये दंड झाला. या सर्व प्रकारामुळें देशासाठीं जे जे काही करावयाचे ते सर्व धाडसानें व तळमळीनें करावयास पाहिजे, याची शिकवण मिळाली.

## सेनापती बापट व मुळशी सत्याग्रह

सविनय कायदेभंगही महाराष्ट्रातच यशस्वी झाला. त्याचे नेतृत्व सेनापती बापटांच्याकडे होते. त्याच कालांत इंग्रज सरकारनें मावळांत मुळशीधरण बांधण्याचे ठरवून ते करण्यास टाटा कंपनीस परवानगी दिली होती. प्लॅन तयार होऊन, त्याप्रमाणें कामास सुरवात झाली. सदर धरण बांधण्यास मावळयांचा विरोध होता पण मानतो कोण ? तेव्हां सेनापती बापटांनी विरोधासाठी सामुदायीक सत्याग्रह करावयाचे ठरविले. त्याप्रमाणें सर्व महाराष्ट्रांतून अनेक सत्याग्रही मुळशीस जमले. त्यांत कराडहून श्री. गणपतराव मारुलकरवकील गेले होते. सत्याग्रहाचें नेतृत्व अर्थात सेनापती बापटांच्याकडेच होते. या विरोधाचा बंदोबस्त करण्यासाठी टाटा कंपनीने सरकारी मदत मागितली. पोलीसी कारवाई सुरू झाली. दडपण जबरदस्ती व जुलमी कायदे यांना उत आला. धरपकड, शिक्षा, तुरुंगवास यांचे सत्र सुरू झाले. पण अत्यंत शांतपणे अहिंसात्मक वृत्तीनें व व्रतानें शेकडो सत्याग्रहींनी हा सत्याग्रह यशस्वी केला व मुळशी धरणाचे बांधकाम कायमचे बंद पाडले. अनेक ठिकाणचे सत्याग्रही तुरुंगातून शिक्षा भोगून आपआपल्या गांवी गेले. त्याप्रमाणें कराडगांवचे सत्याग्रही दे. भ. गणपतराव मारुलकर वकील हेही शिक्षा भोगून आले. त्यांचा जनतेनें मोठा सत्कार करून सत्याग्रहाला लोकमान्यता दिली. सन १९२२ मध्यें बारडोली येथील शेतकऱ्यांच्या सत्याग्रहाचे महात्मा गांधीनीं शिंग फुंकले व ब्रिटिश राजकर्त्यांना आव्हान दिले, परंतु त्याचवेळीं उत्तर भागांतील चौरीचुरा नावाच्या एका लहान गांवी सत्याग्रहाच्या निमित्तानें दंगा माजला. त्यांत अनेक पोलिसांना सत्याग्रहींनीं जिवंत जाळले. ही भीषण बातमी महात्मा गांधींना विश्वसनीयरीत्या समजताच त्यांनीं बारडोलीचा सत्याग्रह रद्द केला. सन १९२२ च्या मार्च महिन्यांत महात्मा गांधींना पकडण्यात आले. १८ मार्च रोजी एका दिवसांत खटल्याची सुनावणी संपली व महात्मा गांधींना

६ वर्षाची शिक्षा ठोठावण्यात आली. तुरुंगात महात्माजी अपेंडिसायटिसच्या आजाराने फारच आजारी पडले. त्यांचेवर शस्त्रक्रिया करावी लागली. ती पुण्यास ससून हॉस्पीटलमध्ये केली. नतर प्रकृती मूळस्थितीत येईपर्यंत ते हॉस्पीटलमध्येंच होते. त्यांना कांहीं महिने विश्रांतीची जरूर असल्याने त्या विश्रांतीची जबाबदारी सरकारने आपल्या अंगावर घेण्याऐवजी त्यांना बंधमुक्त केले,

सन १९२० साली अनियंत्रीत कारभाराचे धोरण मागे पडून द्विदल राज्यपद्धतीचा पहिला अकही त्याचवेळी समाप्त झाला. व यापुढे प्रांतीक स्वायसत्तेच्या प्रयोगास सुरवात होवून, त्याची परिणती अखेर जबाबदार राज्यपद्धतींत किंबहुना सन १९२९ चा लॉर्ड आर्यविन यांचा जाहिरनामा लक्षांत घेता वसाहतीच्या स्वराज्याची तयारी वृद्धीमय होण्याची चिन्हे दिसू लागली. द्विदल राज्जपद्धती अमलांत आल्यापासूनच त्यांत मिळालेल्या जबाबदारीच्या अपुरेपणाबद्दल हिंदी लोकांनी आपले असमाधान प्रकट केले होते. परंतु सन १९२० ते १९२३ ही तीन वर्षे हिंदी राजकारणांत असहकारतेच्या चळवळींत गेल्यामुळें सन १९२३ अखेर या धोरणांत बदल होवून असहकारीस्वराजिष्ट म्हणून कौन्सिलांत शिरले व त्यांनी असहकारीतेऐवजी कौन्सिलांत अडवणुकीचे धोरण स्विकारले. त्यामुळें कौन्सिलांतील राजकारणास रंग चढला. सन १९२४ साली द्विदल राज्यपद्धतीच्या गेल्या चार वर्षांच्या कारभाराची चौकशी करण्यासाठी एक कमिटी नेमण्यांत आली व तिलाच रिफॉर्म्स–इन्क्वायरी कमिटी किंवा मुडिमन कमिटी असे म्हणतात. द्विदल राजपद्धती अगोदरच सदोष आणि त्या राज्यपद्धतीचा प्रयोग सरकार अंगचोर पद्धतीनें करीत असलेनें मिळाले ते हक्कहि जनतेच्या पदरी पडणेची मारामार होत असे. ही गोष्ट कमिटीनें आपल्या बहुमत रिपोर्टात दाखवून दिली होती.

राजकारणांत चालू असलेल्या या उलथापालथी उघड्या डोळ्यांनी पाहून शक्यतेनुसार त्यांत भाग घेण्याच्या इच्छेनें दैनंदिन कार्यक्रम म्हणून लोकजागृतीसाठी एक सार्वजनीक वाचनालय चालवावे, असे आम्हा उभयतांच्या ( श्री. यशवंतराव व माझ्या ) मनात आले. कराडांतील शनिवार

पेठेत एक वाचनालय श्री. शिर्के नांवाचे गृहस्थ चालवित होते. परंतु ते मोडकळीस आले होते, ते वाचनालय हातीं घेऊन त्याची प्रगती करावी म्हणून आम्ही दोघे मिळून श्री. शिर्के यांचेकडे गेलो. आमचे बोलणे झाले, त्याप्रमाणे वाचनालय चालवायाचे हेही ठरले. परंतु ते अमलांत येण्यापूर्वी श्री. शिर्के कराडातून कायमचेच निघून गेले. त्यामुळे प्रचाराचे एक साधन हातीं घेण्याचा आमचा प्रयत्न फसला. या वाचनालयांत केवळ ब्राम्हणेतर चळवळीचे वाङ्मय व वृत्तपत्रे यानाच स्थान दिले गेले होते. त्यांत राष्ट्रीय वाङ्मयाची वृत्तपत्रांची भर घालून जनतेपुढें सर्वांगीण विचार ठेवण्याचा आमचा उद्देश होता. स्वतंत्ररितीनें वाचनालयाचा व्याप आर्थिक दृष्टीनें आम्हास झेपण्यासारखा नव्हता.

सन १९२७ साली श्री. दिनकरराव जवळकरांचे कराडांतील एका व्याख्यानांत अशीच आमची निराशा झाली. व्याख्यान कराडांतील डुबल-गल्लीत झाले. व्याख्यान देतांना श्री. जवळकरांनी केलेल्या कांहीं विधानास विरोधी माहितीचे प्रश्न कराडचे श्री. बाबुराव गोखले यांनी विचारले. त्या विधानाबाबत खुलासा करतांना ती लोकमान्य टिळकांची विधाने म्हणून श्री. जवळकरांनी सांगितली होती व केसरी पत्रांतील तारीखवार अहवालही दिला होता. तेव्हा आम्ही दे. भ. पांडुआण्णा शिराळकर यांच्या घरी जाऊन केसरी पत्राचे त्या त्या तारखांचे अंक पाहिले. त्यांत श्री. दिनकरराव यांनी केलेली विधाने लोकमान्यांनी किंवा इतरांची अशी कोठेहि आढळून आली नाहीत. नतर श्री. जवळकरांना भेटलो असतां म्हणाले कीं, वेळप्रसंगी प्रभावी बोलून फड मारावा लागतो.

या धक्क्यामुळे आमचे मन अस्वस्थ झाले होते, अशाचवेळीं मुसल-मानांचे अनेक प्रश्न व गुंतागुंती याचा आम्हास उलघडा होत नव्हता. तुर्कस्थानची राजसूत्रे केमालपाशानें तेथील सुलतान व मुसलमानांचा खलीफा यांचे हातून हिसकावून घेतल्यामुळे भारतीय-मुसलमान समाजांतील खिला-फतीचे महात्म्य संपले. सन १९२४ चे मुस्लिमलीगचे अधिवेशन लाहोरला बॅ. महमदअल्ली जीना यांचे अध्यक्षतेखाली भरले व त्यानतर दोन मुस्लिम-लीगा अस्तित्वात आल्याचे दिसून आले. बॅ. महमदअल्ली जीनांच्या

अध्यक्षतेखालीं झालेल्या सन १९२४ च्या अधिवेशनांत दोन मुस्लिमलीगा निर्माण झाल्या तेव्हां ही मुसलमानांतील दुफळी घट्ट झ.ली. देशावरील परिस्थितीचा परिणाम म्हणून मुसलमानांची सवत्यासुभ्याची मागणी अधिकाधिक बळकट झाली. सन १९२० ते १९२४ पर्यंत मुस्लिमलीगला चार वर्षे भारतीय कॉंग्रेसनें मौलाना महमदअल्ली व शौकतअल्ली यांच्या सहकार्याने डोके वर काढू दिले नव्हते. त्या मुस्लिमलीगने देशांत आपला राजकारणी सवतासुभा निर्माण केला. सन १९२६ व १९२७ मध्यें दोन्ही मुसलमान पुढाऱ्यांनी आपसांतील द्वैत गाडून टाकण्याचा प्रयत्न केला, तो निष्फळ झाला. तसेंच भारतीय कॉंग्रेस व इतर राजकीय पक्ष मधून मधून तडजोडीचा उपाय काढण्यासाठी परिषदा भरवून झटत होते. पण अशा परिषदांना यश आले नाहीं. मुसलमान समाज हजारो वर्षांची राज्यकर्त्यांची भूमिका सोडणे व मुजोरी सोडणे आणि प्रजाजनाशी समरस होणे. तसेंच पूर्वीच्या आक्रमक राजकारणास तिलांजली देणें या गोष्टी करावयास तयार नव्हता. यासाठीं स्वातंत्र्याच्या मार्गावर असणाऱ्या भारताच्या राजशासनांत अधिकाराच्या जोरावर पूर्वी हजार वर्षांचे चाललेले राजकीय व धार्मिक आक्रमण पुढें चालू ठेवता येईल अशी मुसलमान नेतृत्वाची मनीषा होती. हे आजच्या पाकिस्तानी वर्तनानीं सिद्ध होते. पण आर्यसमाज व हिंदुमहासभा यांचे शुद्धीसंघटण आणि महात्मा गांधींचें अस्पृश्यता निवारण यांचे संघटनार्थ हिंदूनीं उघडलेल्या व्यायामशाळा, ही कामे मुस्लिमांना न आवडून मुसलमानानीं ती कुसपटाची व कुरापतीची साधने मानून हिंदूवर त्यानिमित्तानें अनेक ठिकाणी संधी साधून हल्ले सुरू केले. मशिदीपुढें वाद्ये वाजविणे, बकरीईदच्या सणांत गोवध करणे अशी उभयपक्षातील वैमनस्यांतील जुनी कारणे मागे पडू दिली नाहींत. शुद्धिसंघटण चळवळ बाटवाबाटवीच्या प्रतिकारासाठी व हिंदूचा एकोपा निर्माण करण्यासाठी आहेत आणि व्यायामशाळा या शक्ति वाढविण्यासाठीं म्हणून हिंदूनीं हे उद्योग आपल्या विरुद्ध निर्माण केले असल्याची समजूत स्वार्थी मुसलमान पुढाऱ्यांनी करून दिली होती. हिंदूना बाटविले असतांना शुद्ध करून समाजांत परत घेण्याचा हक्क हिंदूना किंवा आर्यसमाजास नाहीं अशी मुसलमानांची धारणा होती. अस्पृश्यता निवारणाबद्दल असा प्रचार चालू होता की, हिंदूच्या

मध्याधिकाराची फळी भक्कम करण्यासाठीं महात्मा गांधी झटत आहेत. या चळवळीमागे हिंदूंचा मुस्लिमविरोधी राजकीय स्वार्थ आहे. तसेंच हिंदूंना शुद्धिकरणाने हिंदूधर्मास मुकलेल्या हिंदूना पुनश्च स्वजातींत घेतल्यामुळें हिंदूना बाटविणे निष्प्रभ झाले होते. म्हणून मुसलमानामध्यें असंतोष निर्माण झाला होता. त्यामुळे सन १९२३ च्या मे महिन्यात कलकत्त्यास भयंकर दंगा झाला आणि बकरीईदच्या सणांत दिल्लीस मोठा दंगा झाला. तसेंच गुलबर्गा शहरी मुसलमान दंगेखोरांनी हिंदूंच्या मंदिरावर हल्ले करून त्यातील मूर्ती फोडल्या. त्याची झळ कराडासहि लागली. हिंदूत असंतोष निर्माण झाला. पण दंगाधोपा हिंदूंच्या संयमानें झाला नाहीं. परंतु सशस्त्र ब्रिटिश सत्त्येच्या अत्याचारी अहिंदू समाजास ब्रिटिशांच्या भेदनितीचा भरपूर पाठींबा होता. इंग्रजी राज्य हिंदुस्थानांत वाढू लागले तेव्हांपासून मुसलमान इंग्रजांना जवळचे वाटत होते. राजकीय सत्तेची व हक्काची मागणी करण्यांत हिंदूंचा विशेष पुढाकार आहे, हे पाहून मुसलमानांना खास वशिल्याची लालूच दाखवून त्यांना भारतीय राजसत्तेच्या चळवळी- पासून अलग करण्याचा उद्योग ब्रिटिश राजसत्तेनें आरंभिला. जे हिंदू-मुसलमान दंगे झाले ते इंग्रजांच्या या धोरणाचा परिपाक होता.

## इंग्रजांची फोडा झोडा निती

इंग्रजी राजसत्तेनें मुसलमानांना हाताशी धरून हिंदूविरुद्ध उभे केले. सरकारनें मुसलमानांना शेफारून ठेवल्याची चीड आमच्या गांवांत जनतेंत होतीच. आम्हीं हिंदुमहासभेचे सभासद नव्हतो. दे. भ. आप्पासाहेब आळतेकर यांचे नेतृत्वाने व धर्मवीर बटाणे यांच्या सहवासांत असल्यानें आमचा कल कॉंग्रेसकडेच होता. त्यावेळी जिल्हा कॉंग्रेस कमिटी दे. भ. भाऊसाहेब सोमण वकील सातारा यांच्या मार्गदर्शनानेंच चाले. त्यावेळी तालुका व शहर कॉंग्रेस कमिट्या अस्तित्वात नव्हत्या. अशावेळीं कराड तालुक्यांतून सातारा जिल्हा कॉंग्रेसमार्फत महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसवर दे. भ. पांडुआण्णा शिराळकर, दे. भ. आप्पासाहेब अळतेकर, दे. भ. बाबुराव गावले, दे. भ. धर्मवीर बटाणे व हरीभाऊ लाड अशी पांच मंडळी होती. संपूर्ण हातसूत व हातमाग खादी वापरणें वगैरे कॉंग्रेसची बंधने आम्ही

पाळत असू. ते साल १९२४ होते. इंग्रज सरकारचे धोरणामुळें कॉंग्रेस व हिंदुमहासभा यांचे कार्यक्रम जवळ जवळ एकच स्वरुपाचे व एकाच धोरणाचे असत.

सन १९२५ सालच्या श्रावण महिन्यांत नेहमीप्रमाणे ह. भ. प. मारुतीबुवांचे श्री विठ्ठल मंदिरांत गोकुळअष्टमीचा उत्सव चालू होता. सालाबादप्रमाणें देहूकरांची दिंडी टाळमृदंगाच्या घोषात हरीनामाचा गजर करीत, वाद्यें बंद न करतां दरसालप्रमाणें येणार होती. पण यावेळीं स्थानिक मुसलमानांनी दिंडीस मशिदीवरून सवाद्य जाणेस मनाई करणेंचे ठरविलें. हिंदूनींहि धर्मवीर बटाणे यांच्या नेतृत्वाखाली प्रतिकाराची तयारी केली व मशिदीवरून अखंड टाळ, मृदंग, वीणा वाजवीत श्री विठ्ठलनामाच्या जय-घोषांत दिंडीची मिरवणूक निर्विघ्न नेली.

आम्ही व आमचे शिवछत्रपती मंडळ वाद्यप्रकरणी जागरूक होतो. कारण कोणत्याही समाजाचे धार्मिक व सांस्कृतिक बाबतींत व सार्वजनिक कामामध्यें राजसत्तेच्या पाठिंब्यावर व गुंडगिरीच्या साधनांनी अन्याय करणें आम्हाला मान्य नव्हते. त्यांत कुठल्याहि धर्माचा द्वेश किंवा असूया मुळीच नव्हती. पण मुसलमान मात्र धर्मवेडे व इंग्रजी सत्तेच्या चिथावणीनें हस्तक बनून बेजबाबदारपणे वागत होते. त्यांना योग्य जाणीव व्हावी, म्हणून आम्ही या कार्यक्रमास सहमत होतो. पाठोपाठ भाद्रपद महिना होता. श्री गणपती उत्सवाची तयारी चोहोंकडे होऊ लागली.

सन १८९६ सालापासून लोकमान्य टिळकांनी श्री गणपतीउत्सव हे लोकजागृतीचे साधन बनविले होते. त्या परंपरेप्रमाणें धर्मवीर गणपतराव बटाणे यांचे शिवमंदिरांत सुरू केलेल्या श्री गणपतीउत्सवाला त्यांचे चिरंजीव कै. शिवाजीराव बटाणे यांच्या सहकार्यानें उत्सव अधिक लोक-जागृतीयुक्त करण्याचा प्रयत्न आम्ही मंडळींनी केला. ' श्री शिवछत्रपती मंडळ ' या नावाचे मंडळ सन १९२५ ला स्थापन करून या मंडळाचे विद्यमानें ' छत्रपती मेळा ' काढला. तसेच श्री शिवजयंती उत्सवहि साजरा करू लागलो. लोकमान्य टिळकांनी राजकीय जागृती करताच जे हे दोन उत्सव सुरू केले होते, ते उद्दीष्ट पुढें ठेवून आमच्या ' श्री शिवछत्रपती '

मंडळानीहि हे कार्य सुरू केले. श्री गणेशोत्सवप्रसंगी ' छत्रपती मेळा ' काढून लोकजागृती करणारी पद्ये लोकांना ऐकविली. मेळ्याचे पद्यकार श्री. ग. गो. सोमण, श्री. कवी बाळकृष्ण ( श्री. बा. वा. घाटे ), डॉ. वनपाळ व गोविंदराव देव वगैरे होते. दे. भ. ग. दा. सावरकर यांचे 'तुम्ही आम्ही सकल हिंदू। बंधु बंधु' हे त्यावेळी महाराष्ट्रांत लोकप्रिय झालेले पद्य त्यांचेकडे पत्रव्यवहार करून छत्रपती मेळ्याचे पद्यावलीत समाविष्ट करून व ती गाण्यास सरकारी परवानगी मिळविली व मेळ्यांत मुलाकडून गावविली. आमचे मेळ्यांत तुकाराम या नांवाचा हरिजन मुलगा उत्तम गायक होता. श्री. यशवंतराव चव्हाण व श्री. शिवाजीराव बटाणे यांचाहि गाणाऱ्या मुलांत समावेश असे. या मेळ्याचे कार्यक्रम खेडोपाडी केले जात असत. मेळ्याच्या सर्व खटाटोपाची जबाबदारी अशा रितीनें आम्ही पार पाडली.

## धर्मवीर गणपतरावजी बटाणे

श्री गणेशोत्सव प्रसंगीच्या आगमनिर्गमनाच्या सवाद्य मिरवणुकीचा प्रश्न मिरवणूक मशिदीवरून सवाद्य जात असतां, तंटे, मारामाऱ्या व दंगली करून मुसलमान समाजानें देशांत भांडणाचा उपद्रव सुरू केला होता. पण श्री. ज्ञानोबाशेट बटाणे यांनी न्यायकोर्टात आपला सवाद्य मिरवणुकीचा हक्क मिळविला होता. त्यानुसार सन १९२५ च्या श्री गणपती उत्सवांत श्रींची मिरवणूक अखंड वाद्ये वाजवीत नेहमीप्रमाणेंच नेणे आणणेची होती. तर ती मिरवणूक अडविण्याची भाषा मुसलमान करीत होते. सरकारी अधिकारी मुसलमानांचे पक्षपाती होते. तेव्हां शांतताभंगाचा बाऊ निर्माण करून हिंदूंच्या कायदेशीर हक्कांत बदल व्हावा, म्हणून पोलिस अधिकारी सामदामाचे प्रयोग करीत होते. तेव्हा धर्मवीर गणपतराव बटाणे यांनी हिंदूंचा पुढाकार घेतला. भाडोत्री वाजत्री भीतीनें वाद्ये वाजविण्यास आयत्यावेळी कचरतील म्हणून कराडचे सुप्रसिद्ध वाद्यपटु कै. चिलू सभ तेली व त्यांचे साथीदार कै. मारुती बाबाजी महाडीक व कृष्णा मैराळा पुरंदरे वगैरे यांच्या ताफ्यांत मीहि सामील होवून तात्पुरते वाद्य वाजविण्यास शिकलो. या ताफ्यांत व्यवसायी सखाराम घडशी, टेंभू यांनीही भाग घेण्याचे ठरविले.

या सर्व मंडळींनी व आम्ही श्री गणपतीची मिरवणूक मशिदीवरून सवाद्य नेण्याची प्रतिज्ञा धर्मवीर बटाणे यांच्या शिवमंदिरांत केली. मिरवणूकीचे नेतृत्व धर्मवीर गणपतराव बटाणे यांचेकडे आहे असे कळताच सरकारी बंदोबस्त शहरांत कडेकोट झाला. कोणता प्रसंग निर्माण होईल याच्या चिंतेत नागरीक होते. श्री गणपतीची मिरवणूक निघण्या अगोदर मुसलमान मंडळीहि मशीदीत जमावाने बसून राहिल्याचे लोक बोलू लागले. सरकारी अधिकाऱ्यांनी हिंदूवर अनेक बाजूनी दडपणे आणली. पण हिंदूच्या वहिवाटीचा न्याय दरबारी मिळालेला न्यायहक्क सोडून देण्यास आम्ही तयार नव्हतो मिरवणूक मशिदीवरुन अखंड वाद्ये वाजवीत धर्मवीर बटाणे यांचे नेतृत्वाखाली पार पडली. या घटनेचा केसरी पत्राने दे. भ. गणपतराव बटाणे यांचा ' धर्मवीर ' म्हणून गौरव केला.

मुसलमान आम्हास राष्ट्रीय कार्यात राजसत्तेच्या बाजूनें सतावीत होते. त्यास योग्य जाणीव देणेचे श्री शिवछत्रपती मंडळामार्फत ठरविले. मोहरमचा मुसलमानांचा सण जवळ आला होता. त्याबाबत ' हिंदूनो विधर्मी देव देवता भजून धर्मभ्रष्ट होवू नका ' अशा मथळयाचे पत्रक आम्ही तयार केले. नंतर ते पत्रक खेडोपाडी व शहरातहि वाटले. प्रचार सभा खेडोपाडी होणे जरुरीचे वाटल्यावरून त्याप्रमाणें प्रचारसभा घेण्याच्या ठरविल्या. श्री. ल. म. उर्फ नानासाहेब देशपांडे, आबासाहेब घोपाटे व धर्मवीर बटाणे यांनी आम्हास सहाय्य दिले. आम्ही उभयता वरील मंडळींचे नेतृत्वाखाली खेडोपाडी जावून प्रचारसभा घेतल्या. शहरांतहि सभा झाल्या. या कामी हिंदुमहासभेचीहि साथ भरपूर मिळाली. यामुळें ताबूताच्या मिरवणुकीत मुसलमानाशिवाय खेडयापाडयांतील व शहरांतील हिंदूंनी फारच अल्प भाग घेतला. श्री गणपतीचे व ताबूताचे मिरवणुकीचे वेळीं कांहींही गैरप्रकार किंवा दंगाधोपा झाला नाही.

भारतांत राजसत्तेनें मुसलमानांना हाताशी धरून त्यांना जादा सवलती देऊन सरकारनें पक्षपाती राजकारण सुरू केले होतेच. दिल्ली येथील एका मुसलमानी वृत्तपत्रांत हसन इमामी नांवाच्या मौलवीनें ' छत्रपती शिवाजीमहाराज हे मुसलमानांचेच चिरंजीव आहेत असा लेख लिहून

मोठाच असंतोष निर्माण केला. त्यामुळें हिंदू अस्वस्थ झाले. देशभर हिंदु-मुसलमानांचे दंगे होऊ लागले. त्यातच अबदूल रशीद नांवाच्या माथेफिरूनें स्वामी श्रद्धानंदांचा खून केला. स्वामी श्रद्धानंदाच्या या अमानुष खुनामुळें हिंदूंच्या भावना अधिकच दुखविल्या गेल्या.

## स्वामी श्रद्धानंद व श्रद्धानंद साप्ताहिक

स्वामीजींचे स्मरणार्थच जणू श्री. ना. दा. सावरकरांनी 'श्रद्धानंद' नांवाचे साप्ताहिक पत्र सुरू केले. 'पातकी सूर्यावर थुंकला' वगैरे हिंदुच्या भावना जागृत करणारे अनेक तेजस्वी लेख सावरकरांचे लेखणीतून येऊ लागले. अशा तऱ्हेचे लेख वाचून मने अस्वस्थ होऊ लागली. आरंभापासूनच आम्ही 'श्रद्धानंदाचे' वाचक होतो. मागे म्हटल्याप्रमाणें श्री. यशवंतरावांना लहानपणापासून वाचनाचे, लेखनाचे मनस्वी वेड होते. क्रांतीकारकांच्या मनाधैर्याच्या अनेक रोमहर्षक कथा व अनेकांचे रक्तपात, कत्तली आणि अनेकांचे त्याग अशा बंदी असलेल्या व नसलेल्या ग्रंथाचे वाचन चालू होते. बंदी असलेल्या पुस्तकानाच वाचक जास्त भेटतात. अनेक तरुण गुप्तपणे अशा पुस्तकांची पारायणे करून आपल्या मनांतील स्वातंत्र्यज्योत तेवत ठेवत असतात.

स्वा. सावरकरांचे 'माझी जन्मठेप' या पुस्तकाचे वाचन श्री. यशवंतरावांच्या दृष्टीपथांतून सुटले नाहीं. दे. भ. पांडुआण्णा शिराळकर, क्रांतीकारक विचाराचे भाऊसाहेब कळंबे आदि राष्ट्रीय वृत्तीच्या व्यक्तिकडून अशा प्रकारची पुस्तकें मिळवित असू. ती वाचून तत्कालीन राजकारणावर नेहमीच वादविवाद, चर्चा व निर्धार आमच्या मंडळांत होत असत. श्री. यशवंतराव चव्हाण रत्नागिरीस स्वा. सावरकरांना भेटून त्यांच्याशी चर्चा करून आले होते. त्याच कालांत कराडांत डॉ. मुंजे, श्री. पांचलेगांवकर महाराज, श्री. विनायकमहाराज मसूरकर, पंडीत मदनमोहन मालवीय, साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांचेहि दौरे झाले.

रिफार्म्स इक्वायरी कमिटी म्हणजेच मुडिमन कमिटीच्या रिपोर्टानंतर भारताच्या सनदशीर झगड्यांतील दुसऱ्या टप्प्यास सुरवात नोव्हेंबर १९२७

रोजीं पार्लमेंटनें केलेल्या सायमन कमिशनची नेमणूक ही होय. सन १९१९च्या सुधारणा कायद्यांत असे एक स्पष्ट कलम ४१ आहे कीं, दर दहा वर्षांनी भारताच्या राज्यकारभाराची चौकशी व्हावी व त्या चौकशीच्या अनुरोधाने राज्यकारभारात योग्य सुधारणा कराव्यात. या कलमान्वये सन १९२७ साली ब्रिटिश सरकारनें सर जॉन सायमन यांच्या नेतृत्वाखालीं पार्लमेंटच्या सभासदांचे एक कमिशन नेमले. त्यात मजूरपक्षीय दोन, लिबरल पक्षाचे सर जॉन सायमन व इतर कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचे चार असे सात सभासद होते परंतु या कमिशनमध्यें एकहि भारतीय सभासद नव्हता. यामुळें सदर कमिशनशी सहकार्य करणे भारताचा अपमान आहे, असे वाटून भारतांतील राष्ट्रीय सभेनें नव्हे तर नेमस्त पुढाऱ्यांनींदेखील या कमिशनवर बहिष्कार टाकला. कायद्यानें भारतीय सभासद नेमण्यास मुळीच प्रतिबंध नव्हता. असे असूनहि कोणी हिंदी इसम या कमिशनवर नेमला गेला नाहीं. यामुळें भारतीय पुढाऱ्यांत फारच असंतोष निर्माण झाला. अशा असमाधानकारक स्थितींतच सायमन कमिशन ३ फेब्रुवारी सन १९२८ रोजीं भारतांत आले. सायमन कमिशनमध्यें हिंदी सभासद नाहीं. या गोष्टीची वाण भरून काढणेसाठीं जणुकाय प्रत्येक प्रांतीक कायदेमंडळांतून व वरिष्ठ कायदेमंडळांतून सायमन कमिशनशी सहकार्य करणेसाठीं एक एक कमिटी नेमण्यात आली. दरप्रांतांत कमिशन चौकशीसाठीं जाई. कमिटी व हे कमिशन असे तीन कमिटयांचे सभासद एकत्र बसत व साक्षीपुरावा ऐकत. या प्रकारास जाईंट फ्री कॉन्फरन्स हे नांव असे.

कायदेमंडळातच जातवारीचे अनेक पक्षोपक्ष असल्यानें सायमन कमिशनशीं सहकार्य करणेसाठीं एक एक कमिटी नेमणे शक्य झाले. पण वरिष्ठ कायदेमंडळ व प्रांतिक असेंब्लीतील बहुसंख्य सभासदांचा पाठिंबा मिळाला नव्हता. पण तेवढ्यासाठीं सरकारनें आपले काम न थांबविता तसेंच चालू ठेविले.

देशांत या कमिशनच्या निषेधार्थ मोठेच वादळ निर्माण झाले. ज्या ज्या ठिकाणी या साहेबांनी आपल्या कामासाठीं प्रयाण केले. तेथें तेथें त्यांचे स्वागत काळया निशाणांनी मोठ्या प्रमणांत करण्यांत आले. लाहोर येथें कमिशनच्या निषेधार्थ गर्दीत दे. भ. लाला लजपतराय प्रामुख्यानें होते.

पोलिसांनी निदर्शकांची गर्दी हटविण्यासाठीं लाठीमार केला. लाठीमारानें लालाजी जखमी झाले व त्या आजारांतच ते मृत्यूमुखी पडले. त्यांचे मरण लाठीमारामुळें घडले व तो लाठीमार पोलिस अधिकारी सँडर्स यानें केला होता. परिणामी भरदिवसा क्रांतीवीर भगतसिंग यांनी सँडर्सला पिस्तुलाच्या गोळ्या झाडून ठार केले. सँडर्सच्या मारेकऱ्यांना पकडण्यासाठी धडपड करणाऱ्या चाचनसिंहावर क्रांतीवीर चंद्रशेखर आझादांनी गोळी झाडून त्यास ठार केले. मदतनीस सुखदेव व राजगुरु हे होते. पुढें सन १९२९ च्या एप्रिल महिन्यांत क्रांतीकारक भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी दिल्लीच्या इंडियन ले. कौन्सिल हॉलमध्यें दोन बॉम्ब टाकून, पिस्तुलाचें कांही बार काढले. या कृत्यानें उडालेल्या गोंधळांत वरील दोघेही शांतपणें सभागृहांत उभे होते. त्यांना पकडण्यास पोलिस सार्जंट येताच पिस्तुले फेकून देऊन ते पोलिसांच्या स्वाधीन झाले. या क्रांतीकारकावर खटले होऊन त्यांना देहांताची शिक्षा देण्यांत आली.

भारतीय राजकारणाच्या प्रगतीस सायमन कमिशनचा कितपत हातभार लागला हे आतां पाहू. कमिशनच्या कामास मदत करण्यासाठीं नियुक्त केलेल्या कमिटयांचे अध्यक्ष म्हणून सर शंकरन् नायर यांची नियुक्ती करण्यांत आलेली होती. या कमेटयांचे रिपोर्टस् एकामागून एक प्रसिद्ध झाले. परंतु कोणत्याहि कारणानें देशांतील सायमन कमिशनवरील असंतोष व बहिष्कार थंडावला नाहीं. भारतीय जनतेनें भावी राजघटनेची योजना आखण्यासाठीं निवडक हिंदी व ब्रिटिश पुढाऱ्यांची एक गोलमेज परिषद बोलवावी अशी मागणी केली.

सन १९२७ साली महाराष्ट्र कॉंग्रेसमार्फत पुण्यास दे. भ. मेहेरअल्ली व आ. रा. भट यांनी युवक चळवळीस आरंभ केला. त्याचे मार्गदर्शन पं. जवाहरलाल नेहरू, वीर नरीमन व न. वि. गाडगीळ करीत होते. त्या चळवळीसाठीकरितां श्री. यशवंतराव चव्हाणांनी प्रयत्न करून कराडहून कांही तरुण नेले. त्यांत मीहि होतो.

याच साली महात्मा गांधींचा कॉंग्रेसतर्फे दुसरा अखिल भारतीय दौरा महाराष्ट्रांत सुरू झाला. महात्माजींच्या स्वागताची तयारी कराडातहि सुरू

झाली. आमच्या श्री शिवछत्रपती मंडळानें श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली स्वयंसेवक दल तयार केले व सभेच्या इतर कार्यक्रमाची व्यवस्था ठेवली. सदर सभा श्रीकृष्णाबाईच्या वाळवंटात भव्य मंडप घालून भरविण्यांत आली होती. महात्माजींचे व्याख्यान प्रचड जनसमुदायापुढें झाले. त्यामुळें कॉंग्रेसच्या धोरणासंबंधीचा आमचा विश्वास बळावला.

सन १९२० ते १९२९ या कालांत परिस्थिती आजच्या सारखीच गोंधळाची होती. सकृतदर्शनी सरकारपक्ष व लोकपक्ष असे दोनच पक्ष होते. सरकार पक्षांत राजेरजवाडे, जाहागिरदार, सरकारी नोकर, रावसाहेब, सरसाहेब, रावबहादूर व त्यांचे आश्रीत असे राजनीष्ठ लोक होते. लोक-पक्षांत स्वातंत्र्याचं हक्क कसे कसे मागावे याविषयीं मतभेद होऊन त्या त्या अनुपंधानें पक्षभेद होते. प्रथमचे सामाजिक प्रश्नावरून झालेले सनातनी व सुधारक हे तंटे मागे पडून, नंतर मवाळ व जहाल असे पक्ष निर्माण झाले. परंतु तेहि लखनौचे कॉंग्रेसचे अधिवेशनांत कॉंग्रेसमध्यें एकत्र आले. पण त्याचवेळीं भारताचे दुर्दैवानें लोकमान्य दिवंगत झाले. पुन्हां कॉंग्रेसमध्यें फेरनाफेरवाले असे पक्ष पडले. त्यांत कौन्सिल प्रवेश व बहिष्कार तसेंच वसाहतीचे राज्यकीय स्वातंत्र्य इत्यादी विचारसरणीमुळें परस्पर विरोधी तट पडले. कॉंग्रेसचे बाहेर गुप्त क्रांतीकारक संस्था होत्याच, शिवाय एकीकडे हिंदुमहासभा व दुसरीकडे मुस्लिम लीग अशा संस्था तयार झाल्या होत्याच. कम्युनिष्ठ निराळे होते. कॉंग्रेसमध्यें फॉरवर्ड ब्लॉक रॅडिकल, सोशालिस्ट उद्‌भवले होते, पण सर्व पक्ष देशहितावर स्थिर नजर ठेवून समीकरणाच्या मार्गानें जाण्याचा प्रयत्न करीत. मतभेद नाहीसे करण्यापेक्षा राष्ट्राच्या अभ्युदयाकरितां एकोप्यानें प्रयत्न करण्याचे तत्त्व प्रथमतः अमलांत आण-ण्याचाही प्रयत्न होई. जो तो पक्ष आपआपली मते अधिकाधिक लोकप्रिय व्हावीत यासाठी व देशकार्यासाठी दोघांनी एकत्र काम करण्यास कांहींही अडचण निर्माण होऊ देत नसत. त्यावेळीं प्रत्येक पक्षाचे विचार भिन्न असले तरी अंतीम हेतू विविक्षित कार्य करण्याच्या कामी जे ऐक्य अपेक्षित असते त्यामध्ये एकमेकाच्या आड आलेच पाहिजे ही क्षुद्र मनोवृत्ती कोणीही दाख-विली नाही. मतभेद विरहित कार्यक्रमांत अनेक प्रकारच्या विचाराचे लोक कार्यान्वित होत असत. देशकाल परिस्थितीप्रमाणें अभ्युदयाचा पल्ला

अतीमातल्या अंतीम मर्यादेपर्यंत जाणार नसल्यानें याबद्दल आपापसांत भांडण करून दूर होण्याचा प्रसंग कोणीहि निर्माण केला नाहीं. एका पक्षानें दुसऱ्या पक्षास आपल्या विशिष्ट मताचा आग्रह करणें अत्यंत चुकीचे होय असे मानून प्रत्येकानें आपापली मते लोकापुढें मांडून जनतेस आज नाहीं, तर उद्या आपल्या बाजूचे करून घेण्याची निरनिराळ्या पक्षांची जी झटापट चालू होती, तीच राष्ट्राच्या प्रगतीचे खरे साधन होय. कांहीं विशिष्ट मते लोकापुढें मांडण्याचे प्रत्येक पक्षास स्वातंत्र्य असणे यांतच राष्ट्राचे हीत असते, अशी त्यावेळच्या पक्ष प्रमुखांची धारणा होती. या विचारसरणीमुळें आम्हा मित्रसमुहाला सर्व पक्षांचे पुढाऱ्याजवळ प्रत्यक्ष जाऊन त्यांचे म्हणणे नीट समजावून व अभ्यासून घेता येत होते. या परिस्थितीचा फायदा तरुण पिढीस त्यावेळीं होत होता. त्यावेळचे कॉंग्रेसचे नेतृत्व महात्मा गांधीच्याकडे होते. त्यांच्या जनताभिमुख कार्यक्रमास तसेंच निस्वार्थ, त्याग, सत्य, अहिंसा या तत्वज्ञानाचा संपूर्णपणें विचार करून आम्ही व आमचा मित्रसमुह कॉंग्रेसमध्येंच स्थिर झाला.

सन १९२७ सालीं छत्रपती श्री शिवाजीमहाराजांचा त्रिशतसांवत्सरीक उत्सव सार्वजनीक वर्गणी जमा करून मोठ्या प्रमाणावर साजरा केला. त्या कार्यक्रमांत वाईचे राष्ट्रीय किर्तनकार डॉ. दत्तोपंत पटवर्धनबुवा आणि अहमदाबादचे राष्ट्रीय पोवाडेकार शाहीर पां. द. खाडीलकर एम्. ए. यांचे किर्तन, पोवाडे व गायनाचे कार्यक्रम ठेवण्यांत आले होते. राष्ट्रीय प्रचार कार्यक्रमामुळें उत्सव बहारीचा रंगला. लोकांना आमच्या प्रयत्नशील देश-प्रेमाबद्दल कौतुक वाटू लागले. या व अशाचवेळीं सहृदय मित्रद्वयांच्या अंतः-करणात ज्वलंत देश–प्रेमाला भर आला

सन १९२७ सालीं मद्रास येथील डॉ. अन्सारी यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनाबरोबर देशांतील कॉंग्रेसखेरीज मुस्लीम लीग, हिंदुमहासभा आदिकरून सर्वपक्षीयांची परिषद भरली. सर्वपक्षीय परिषदेनें हिंदी लोकांचे तात्पुरते समाधान करणाऱ्या मागण्या कोणत्या हे ठरविण्या-करिता एक कमिटी नेमली. त्यामध्यें पुढीलप्रमाणें सभासद होते.

पं. मोतीलाल नेहरू, सर अल्ली इमाम, सर तेजबहादूर सप्रू, लोकनायक मा. श्री. अणे, सरदार मंगलसिंग, शेख कुरेशी, नेताजी सुभाषचंद्र बोस,

रा. बहादूर जी. आर. प्रधान अशा या कमिटीचे अध्यक्ष पंडीत मोतीलाल नेहरू होते.

या कमिटीनें ऑगस्ट १९२८ मध्ये आपला रिपोर्ट प्रसिद्ध केला. त्यासच नेहरू रिपोर्ट असे म्हणतात. यांतील विवेचन जबाबदारीच्या जाणीवेनें केलेले आहे. यांत भारताचे ध्येय डोमिनिअनस्टेटस असावे हे कबूल केले आहे. मुस्लिमांना राखीव जागा दिलेल्या आहेत, प्रजेच्या हक्कांचे रक्षणहि केलेले आहे. परंतु भारताला एकदम चोवीस तासांत किंवा एक वर्षात स्वराज्य देता येणें अडचणीचे आहे याची जाणीव ठेवून मर्यादित स्वराज्याची मागणी केली आहे. लष्करावर व परराष्ट्रीय धोरणावर हिंदी लोकांचा आजच ताबा असावा, अशीहि मागणी मागितलेली अशा नेहरू रिपोर्टाचे, हिंदी राजकारणांत अनेक स्थित्यंतरे झाली तरीहि सर्व राजकीय पक्षांनी स्वागतच केले आहे.

देशांतील जहाल नेमस्त पक्ष तसेंच हिंदू मुसलमान नेहरू रिपोर्टावर आपली मागणी केंद्रभूत करीत असतांना तत्कालीन उदार वृत्तीचे व्हाईसरॉय लॉर्ड आर्यविन यांनी डोमिनिअनस्टेटस्ची घोषणा केली. नेहरू रिपोर्टामुळें सायमन कमिशनचा अवमान होऊ लागला. तेव्हां सन १९२९ साली ब्रिटिश प्रधानमंडळाशी विचारविनिमय करण्यासाठीं तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड आर्यविन विलायतेस गेले. त्यावेळीं सायमन कमिशनचे साक्षी पुरावा गोळा करण्याचे काम संपले होते. विलायतेंत सन १९२९ साली पंचवार्षिक निवडणूक होऊन पार्लमेंटात मजूरपक्षाची बहुमताने निवड झाली. रॅम्से मॅग्डोनल्ड हे मुख्य प्रधान झाले. लॉर्ड आर्यविन हे विलायतेंतील मुत्सद्यांचा विचार घेऊन भारतांत आलेवर त्यांनी ३१ आक्टोबर १९२९ रोजी जाहिरनामा काढला. त्यांत भारतास वसाहतीच्या दर्जाचे स्वराज्य स्थापन करणे हे क्रमाक्रमाने होणाऱ्या राजकीय सुधारणेच्या विकासाचे ध्येय आहे असे म्हटले होते व लवकरच अमलांत येणारी नवी राजघटना सर्वांच्या संमतीनें तयार व्हावी म्हणून संयुक्त गोलमेज परिषद बोलावून त्यांत भारत, इंग्लंड व हिंदी संस्थानिक यांचे पुढारी प्रतिनिधी बोलाविले जातील व सर्व संमत राजघटना तयार करणेंत येईल असेहि सुचविले होते.

सन १९२२ साली तहकूब केलेली बार्डोलीची साराबंदीची चळवळ पुन्हा महात्मा गांधींनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखालीं सुरू केली. चळवळींत शेतकऱ्यांनी महात्मा गांधींची तत्वें श्रद्धेनें पाळली. सारा वसुलीकरितां राजकर्त्यांनी शेतकऱ्यांची मालमत्ता जप्त करण्याचा धूमधडाका सुरू केला. त्यांची जमीन, गुरे व इतर मालमत्ता विकत घेण्यास कोणीच पुढे येईना. तेव्हां कांहीं अहिंदू समाजकंटकामार्फत जुलूम, जबरदस्तीं व अन्याय करून पाहिला, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. गुरेढोरे राखण्याची जबाबदारी सरकारवर पडली. सरकारी माणसांनी गुरांचे व मालमत्तेचे संरक्षण जसे करावयाला हवे होते, तसें ते करीत नसल्याच्या बातम्या प्रसिद्ध होऊ लागल्या. जनतेच्या क्षोभाला भरती चढली. सत्याग्रहाच्या टापूंत अंमलदारांना खाण्याचे पदार्थ, न्हावी, धोबी वगैरे मिळेनासे झाले. खाण्याचे पदार्थ दुसरीकडून त्या भागांत नेण्याची पाळी सरकारवर आली. सरकारला असहकाराचे चटके असह्य झाले. त्यामुळें बार्डोलीचा सारावंदीचा सत्याग्रह यशस्वी झाला व शेतकऱ्यांच्या मागण्या सरकारला मान्य कराव्या लागल्या. यामुळें जनतेत महात्मा गांधींच्या सनदशीर चळवळीबाबत आकर्षण निर्माण झाले. राजकिय व सामाजिक चळवळी जनतेतूनच निर्माण झाल्या पाहिजेत, याची संपूर्ण जाणीव जनतेंत निर्माण झाली. अशाप्रकारें महात्मा गांधींच्या नेतृत्वाचा भारतीय जनतेवर परिणाम होऊन जनतेंत आवेशच चढला व वसाहतीचे स्वराज्य हे भारताला गुलामगिरीतून संपूर्णपणें मुक्त करणारे नसून त्यामुळें संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय साध्य करतां येणार नसल्यानें सन १९२७ साली मद्रास येथें महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं भारतीय कॉंग्रेसनें संपूर्ण स्वातंत्र्य हे कॉंग्रेसचे ध्येय होय, असा ठराव पास झाला.

या गोष्टीचा परिणाम आमचेवर होऊन अधिक लोकजागृतीसाठीं साधन म्हणून एक वृत्तपत्र सुरू करावे व त्यासाठीं स्वतंत्र मालकीचा छापखानाहि असावा असे आमच्या मनास वाटू लागले. तेव्हां श्री. यशवंतराव व मी आम्ही दोघांनी ही योजना धर्मवीर बटाणे यांच्यापुढें मांडली. ती त्यांना पसत पडली. सदर छापखाना धर्मवीर बटाणे व मी समसमान भांडवल घालून आणणेचे ठरविले.

आतां मी स्वतंत्र होतो. त्यामुळें घरचे भांडवल घेऊन धर्मवीर बटाणे यांच्या सहकार्यानें छापखाना आणला. व्यापारी प्रेस या नांवाने सुरू केला. छापखान्याचे डिक्लेरेशन व त्याचबरोबर श्री. यशवंतरावांचे सल्ल्याने 'श्री शिवछत्रपती' नांवाच्या साप्ताहिकाचेंहि डिक्लेरेशन केले. अशाप्रकारे श्री. यशवंतराव चव्हाण, श्री. शिवाजीराव बटाणे व मी असे एकविचारे कार्यक्रम ठरवून कार्य करीत होतो. छापखाना सन १९२९ चे शेवटी सुरळीत सुरू झाला. साप्ताहिक वृत्तपत्र सुरू व्हावयाचे, परंतु सन १९३० उजाडताच देशांत सार्वजनिक मीठसत्याग्रह, जंगल सत्याग्रह इत्यादी कार्यक्रमाची सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू झाली. त्यामुळें आमचे वृत्तपत्र प्रकाशनाचे कार्य स्थगीत झाले.

कलकत्त्यास सन १९२८ मध्यें भारतीय कॉंग्रेसनें पंडीत मोतीलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली 'नेहरू रिपोर्ट' पास केला. हा रिपोर्ट सर्वपक्षीय असल्याकारणानें वसाहतीच्या स्वराज्याला धरूनच होता, परंतु संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयानें प्रेरीत झालेल्या पं. जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस आदि तरुणांना 'नेहरू रिपोर्टातील वसाहतीचे स्वराज्य' मान्य नव्हते. संपूर्ण स्वातंत्र्य हे भारताचे ध्येय असल्याचा सन १९२७ चा ठराव त्यांनी पुन्हां पुरस्कारला. पण महात्मा गांधींच्या तडजोडीनें 'नेहरू रिपोर्ट' मान्य करून त्यास अशी पुस्ती जोडण्यांत आली कीं, नेहरू रिपोर्टातील मागणीची पूर्तता सन १९२९ च्या डिसेंबर अखेरपर्यंत न झाल्यास, तसेंच त्यासंबंधी समाधानकारक अभिवचन जाहिर न केल्यास भारतीय जनतेचे संपूर्ण स्वातंत्र्य हे ध्येय साध्य करण्याकरितां योग्य तो मार्ग आक्रमिला जाईल. मुस्लिम लीगमध्यें मात्र त्या नेहरू रिपोर्टासंबंधी अनेक मतभेद निर्माण झाले. विशेषतः इतर राजकीय पक्षापेक्षा हिंदु-मुसलमानांत मतभेद होऊन मुस्लिम-लीगनें नेहरू रिपोर्ट मानण्याचे साफ नाकारले. देशांतील जमिनदार, संस्थानिक वगैरे वर्गांनी प्रतिकूल धोरण व्यक्त केले. अशातऱ्हेनें ता. ६ फेब्रुवारी सन १९२८ मध्यें भारतांत आलेल्या सायमन कमिशनचे बहिष्कारावाबत असलेली एकवाक्यता नष्ट झाली.

या फाटाफुटीचा फायदा घेऊन ब्रिटिश सरकारनें लॉर्ड आर्यावनच्या घोषणेप्रमाणें भारतास डोमिनिअनस्टेटस् द्यावयाच्या बाबतींत मुग्धता

स्वीकारून गोलमेज परिषद बोलावण्याचे जाहिर केले. गोलमेज परिषदेचे आश्वासन म्हणजे नेहरू रिपोर्टाप्रमाणें लोकमताची मागणी मान्य केल्यासारखे होते. गोलमेज परिषदेंत राजकीय सुधारणेची चर्चा कीं, डोमिनिअनस्टेटस् देण्याची चर्चा होणार हे स्पष्ट झालेले नव्हते. नेहरू रिपोर्टाचे धर्तीवर राजकीय घटना आखावी अशी राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांची इच्छा होती. म्हणून गोलमेज परिषदेंत वसाहतीच्या स्वराज्याची घटना आखली जाईल असे आश्वासन लॉर्ड आयर्विन यांनी द्यावे अशी मागणी केली, पण लॉर्ड आयर्विन यांनी गोलमेज परिषदेंत काय होईल ते तुमचे तुम्ही पहा अशा अर्थाचा खुलासा केला.

सन १९२९ च्या जाहिरनाम्यांत लॉर्ड आयर्विन यांनी जाहीर केल्याप्रमाणें डोमिनिअनस्टेटस्‌ची घोषणा करण्यांत मोठी चूक झाली व भारतास फारच अधिकार जाहिर केले असे वाटले असावे. कारण सन १९२९ नंतर ब्रिटिशांनी पसत केलेल्या कोणत्याहि हिंदी राजघटनेसंबंधीच्या मसुद्यांत रिपोर्टांत डोमिनिअनस्टेटस्‌चा चुकूनहि उल्लेख नाहीं. त्याचे कारण सन १९३१ च्या डिसेंबरच्या १ तारखेस ब्रिटिश पार्लमेंटात ' वेस्टमिन्स्टर ' या नांवाचा कायदा पास झाला. या कायद्यानें डोमिनिअनस्टेटस् या शब्दाचा अर्थ पूर्वीहून अधिक व्यापक करण्यांत आला. त्यामुळें ब्रिटिश पार्लमेंटचे वसाहतीवरील वर्चस्व अजीबात नाहीसें झाले. डोमिनिअनस्टेटस् शब्दास असा नवा व्यापक अर्थ प्राप्त झालेवर भारतासंबंधी बोलतांना तो न वापरणेची इंग्रज मुत्सद्यांनी विशेष काळजी घेतली.

सन १९२८ च्या ठरावासंबंधी ब्रिटिश राजकर्त्यांनी स्तब्धता पाळल्यामुळें भारतीय कॉंग्रेसनें आपली प्रतिज्ञा पार पाडण्यासाठीं सन १९२९ च्या डिसेंबर ३१ च्या मध्यरात्री लाहोर येथें पं. जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या कॉंग्रेसमध्यें संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पास केला व कॉंग्रेसचा तिरंगी झेंडा अंतराळांत चढविला. ब्रिटिश सरकारनें देशाला सर्वप्रकारे दुर्बल करून सोडले आहे. तेव्हां ती दुर्बलता नाहींशी करण्याला स्वातंत्र्याशिवाय अन्य उपाय नाहीं. अशा आशयाच्या मजकुराचे एक पत्रक छापून सन १९३० च्या २६ जानेवारीला सर्व देशांत मिरवणूकी काढून

सभा भरवून वाचले जावे असा आदेश काँग्रेसनें जाहिर केला. तो आदेश जनतेकडून मोठ्या उत्साहानें पाळला गेला. ता. २६ जानेवारीच्या स्वातंत्र्य-दिनादिवशी देशनिष्ठेची शपथ घेणारी हस्तपत्रके लावावीत व त्याचे सभेत वाचन व्हावे असेहि ठरविण्यांत आले.

भारतीय काँग्रेसच्या वरील आदेशाप्रमाणें स्वातंत्र्यदिनानिमित्त गांवो-गांवी काँग्रेसची प्रतिज्ञा पत्रके सार्वजनिक ठिकाणीं लावून प्रचार करावा, प्रभातफेऱ्या काढाव्या, सभा भरवून त्याचे वाचन करावे. या कार्यक्रमासाठी आम्ही ह्या योजना आखल्या. टिळक हायस्कूलमध्यें इंग्रजी ६ वी मध्यें शिकत असलेल्या श्री. यशवंतरावांनी आपले वर्गमित्र व हायस्कूलमधील इतर विद्यार्थी यांना एकत्रित करून ता. २५–१–१९३० च्या मध्यरात्रीनंतर गांवांत पत्रके लावण्याचे काम सुरू केले. निरनिराळे गट आपआपल्या नेम-लेल्या कामावर रुजू झाले. श्री. पांडुरंग डोईफोडे यांच्यासह स्वतः श्री. यशवंतराव हे कराडांतील चावडी चौकांत पत्रक लावीत असतां पोलिसांनी पाहिले. तेव्हां त्यांना पकडणेसाठीं पाठलाग सुरू झाला. श्री. पांडुरंग डोईफोडे पोलिसांना सांपडले. पण श्री. यशवंतरावांनी पोलिसांना हुलकावणी देऊन पळ काढला. पोलिसांना मिळालेल्या बाहेरील माहिती-प्रमाणें श्री. यशवंतरावांना पत्रके लावण्यातील साथीदार म्हणून अटक करण्यासाठी पोलीस अधिकारी टिळक हायस्कूलमध्यें गेले. पण तेथील राष्ट्रीयवृत्तीचे मुख्याध्यापक श्री. म. ह. दुवेदी यांनी हायस्कूल आवारांत मी कोणासहि तुमच्या स्वाधीन करणार नाहीं असे स्वच्छ बजावून सांगितले. मधल्या सुट्टीत शाळेच्या आवाराबाहेर पोलिसांनी श्री. यशवंतरावांना पकडले व त्यांचेवर खटला भरण्यांत आला. न्यायाधिशापुढें खटला सुरू होण्यापूर्वी त्यांच्या कुटुंबाच्या हितचिंतकांनी व सरकारी अधिकाऱ्यांनी पोलिसांनी श्री. यशवंतरावांनी गुन्हा कबूल करून माफी मागावी म्हणजें उगाच शिक्षणाचे नुकसान होणार नाही, असे सांगून त्यांचे मन वळविण्याचा उपदेश श्री. यशवंतरावांच्या आप्तेष्टांना केला. विशेष हे कीं, त्यांचे कुटुंबातील त्यांचे दोन्ही वडील बंधू श्री. ज्ञानोबा व श्री. गणपतराव किंवा त्यांच्या मातोश्री यांनी पोलिसांनी करावयास सांगितलेला उपदेश केला नाहीं व करणेची त्यांची तयारीहि नव्हती. कांही प्रतिष्ठानीं हा प्रयत्न करून पाहिला

परंतु श्री. यशवंतरावांना आपल्या ध्येयनिष्ठेपासून कोणीही परावृत्त करू शकला नाहीं.

रीतसर खटला चालून श्री. यशवंतरावांना दिड वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा व दिडशे रुपये दंड ठोठावण्यांत आला. त्यांच्या शैक्षणिक बाबीत अशारितीनें जो व्यत्यय आला, यांस त्यांची ध्येयनिष्ठा व आम्हा मित्र-मंडळींचे प्रोत्साहन कारणीभूत झाले. पण याबद्दल मातोश्री व बंधू-द्वयांनी आम्हा कोणासच दोष दिला नाहीं, किंवा आमचेवर रोषही केला नाहीं. श्री. यशवंतरावांना झालेल्या शिक्षेबद्दल कांहींच दुःख वाटले नाहीं. पण झालेला दंड पुणे येथील रानडे वक्तृत्व स्पर्धेत मिळालेले १५० रुपयाचे बक्षीस पोलिसानी जप्त करून वसूल केला. याबद्दल मात्र त्यांना फार दुःख झाले.

सन १९३० च्या जानेवारी २६ रोजीं कॉंग्रेसच्या आदेशाप्रमाणें श्रीकृष्णाबाईच्या घाटावर दे. भ. आप्पासाहेब आळतेकरांच्या नेतृत्वाखाली दे. भ. पांडुआण्णा शिराळकर, दे. भ. राघुआण्णा धोपाटे, धर्मवीर गणपतराव बटाणे, श्री. गणपतराव आळतेकर, हरीभाऊ लाड व इतर १५–२० मंडळींनीं कॉंग्रेसच्या प्रतिज्ञा पत्रकाचे वाचन केले. सभेस सुमारे १००० श्रोते पांगून पांगून हजर होते. अर्थात कडक पोलीस बंदोबस्त होताच.

यानंतर सुमारें दिड महिन्यांनी १२ मार्च रोजीं महात्मा गांधींनी दांडीयात्रा काढून सविनय कायदेभंगास प्रारंभ केला व लोकजागृतीचा झंझावात देशभर पसरविला. साबरमती आश्रमापासून सुरतेच्या समुद्राकाठचे दांडी हे ठिकाण सुमारे दोनशे मैलावर आहे. आश्रमांतून महात्मा गांधींनी १२ मार्च १९३० रोजीं दांडीस जाण्यास सुमारे ८० स्वयंसेवकासह प्रस्थान ठेविले. हा सर्व प्रवास पायीच चालू असतांना वाटेंत त्यांनी अनेक खेड्यांना व गावांना भेटी दिल्या. ही यात्रा जरी गुजराथेंत निघाली असली तरी तिनें सारा भारतदेश हलवून सोडला. परदेशी वृत्तपत्राचे बातमीदार यात्रा सुरू होणेच्या आधीच साबरमतीस जमले होते. त्यांतील कांहीं या यात्रेबरोबर होते. महात्मा गांधींनी मिठाचा कायदा मोडण्यासाठीं पदयात्रा सुरू केली. सविनय कायदेभंगाची ही मोहिम हां हां म्हणता वणव्याप्रमाणें

देशभर पसरली. महात्मा गांधी दांडीस ५ एप्रिल रोजीं पोहोचल्यावर त्यांनी सरकारास रीतसर नोटीस देऊन जाहिर करून मिठाचा कायदेभंग केला. याप्रमाणें सर्व भारतभर त्यांचे अनुयायी मिठाचा कायदा मोडू लागले. धारासना, वडाळा, शिरोडा येथील मिठागरावर सत्याग्रही गटागटानें मोठ्या प्रमाणांत सविनय कायदेभंग करू लागले. सरकारी दडपशाही सुरू झाली. पुढारी व ठळक अनुयायी कैदखान्यांत गेले. तरी सामान्य जनांचा उत्साह सरकारी दडपशाहीला आवरता आला नाही. फार मोठ्या समुदायात संयमाची व शिस्तीची अपेक्षा व्यर्थ असते. तथापि सरकारी अत्याचार व दडपशाहीशी तुलना करता सन १९३० च्या चळवळींत जनतेनें अभिनंदनीय अहिंसात्मक संयम पाळला. महात्मा गांधींनी अन्याय्य कायदे मोडायचे असे धीट पाऊल राष्ट्रास शिकविले. देशांत उत्साहाची एकच लाट उसळली. जिल्ह्याजिल्ह्यांत भारतीय कॉंग्रेसचे अधिकृत प्रचारक पाठविण्यात आले. आमच्या सातारा जिल्ह्यांत सोलापूरच्या डॉ. अंत्रोळीकरांची नियुक्ती झाली. त्यांच्या आगमनाबरोबर सातारा जिल्ह्यानेहि उठाव घेतला. वाईच्या प्राज्ञ पाठशाळेचे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, साताराचे हणमंतशास्त्री महाजनी यांचेही प्रचार दौरे सुरू झाले.

राष्ट्रांत चालू असलेल्या उग्र आन्दोलनांत महाराष्ट्र अग्रेसर होता व त्यातले त्यांत सातारा जिल्हा आघाडीवर राहून आंतरिक तळमळीनें कार्य करीत होता. ' जय सातारा ' ही देशभर होत असलेली घोषणा हेच त्याचे प्रतीक होय. या कालांत कराडांत असा एकही दिवस जात नव्हता कीं, ज्या दिवशी श्रीकृष्णाबाईचा घाट, शनिवार चौक अगर अन्य सार्वजनिक ठिकाणी सभा, व्याख्यानें झाली नाहीत. सभा, मिरवणूका, मोर्चे आणि घोषणा यांनी गांव दुमदुमत असे.

या सभांना नियमितपणें हजर राहून देशभक्तिची स्फूर्ती जवळपासच्या खेड्यांतील उत्साही तरुण घेत असत. मसूरचे तळमळीचे कार्यकर्ते श्री. राघुआण्णा लिमये आम्हास लाभले. श्री. राघुआण्णांची ध्येयनिष्ठा अत्यंत बळकट होती. त्यांचे कार्य विधायक स्वरुपाचे असे. पुढें पुढें तर ते प्रभावी वक्ते होऊन त्यांनी तरुण कार्यकर्त्यांची बळकट संघटना निर्माण

केली. खेड्यापाड्यांतून श्री. राघुआण्णानी धुमधडाक्यानें प्रचारकार्य सुरू केले व बहुजनसमाजांत राष्ट्रभक्तिची प्रखर ज्योत प्रज्वलीत केली.

दुर्दैवानें स्वातंत्र्यप्राप्तीनंतर श्री. राघुआण्णा मोटार अपघातांत मृत्यू पावले.

देशकार्याचे लोण खेड्यापाड्यांतील कानाकोपऱ्यांत पोहोचविण्याचे कार्य करीत असतांना कित्येक खेड्यांत आम्हाला अशी कांहीं तेजस्वी झाकली माणके गवसली. इंदोलीचे दे. भ. दिनकरराव निकम हे एक होत. बहुजनसमाजाच्या अंतरंगांत शिरून त्यांना देशकार्याकडे वळवून आणण्याचे अत्यंत अवघड पण जरुरीचे कार्य श्री. दिनकररावांनी मनापासून केले. त्यांच्या सहाय्यामुळेंच इंदोली व आसपासच्या भागांत चळवळ सर्वत्र फोफावली.

याप्रमाणें आम्हीही खेड्यापाड्यांतूनहि प्रचारकार्य करीत होतो. महात्मा गांधींचा मोर्चा सुरू झाला. त्यावेळीं सातारला एक सत्याग्रही शिबीर सुरू झाले. सत्याग्रही मिळविण्याचे कार्य धर्मवीर बटाणे यांचे नेतृत्वाखालीं आम्ही सुरू केले. या कार्याचे केंद्र अर्थातच आमचा व्यापारी छापखाना होता. प्रयत्नांनी आम्ही ४५० स्वयंसेवक सातारचे शिबीरास पाठविण्यात आले. त्यावेळीं वैशाख महिना होता. आमच्या श्री शिवछत्रपती मंडळाच्या श्री शिवजयंती उत्सवाची तयारीहि जोरांत चालू होती. कार्यक्रमांत खेड्यापाड्याच्या लोकांच्या आवडत्या नामांकित भजनी मंडळींचा भजनाचा कार्यक्रम ठेवण्यांत आला होता. तसेंच पोवाडे व व्याख्यानें वगैरे कार्यक्रमहि होते. जाहिर व्याख्यानाचा कार्यक्रम श्री. पन्नालाल लाहोटी यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाला. त्या सभेंत अचानकपणें ठरविले नसताहि स्वयंसेवक अश्विनीकुमार या नांवाच्या सत्याग्रहीनें बेकायदेशीर मीठ विकण्याचा कार्यक्रम सुरू केला. या सभेस पोलीस हजर होतेच. पोलिसांनी अश्विनीकुमारास तावडतोब अटक केली. कराड तालुका कॉंग्रेसचा अध्यक्ष मीच होतो. त्याच सभेंत दुसरे दिवशी मिठाचा सत्याग्रह असल्याचे जाहिर करण्यात आले. व्याख्यानाच्या कार्यक्रमानंतर रात्रीं नामवंत भजनी मंडळींचे भजनास प्रारंभ झाला. खेड्यापाड्याचे हजारो लोक सदर कार्यक्रमासाठीं

आले होते. त्यांनाहि धर्मवीर वटाणे यांनी दुसऱ्या दिवशी श्रीकृष्णाबाईच्या घाटावर मीठाचा सत्याग्रह होणार असल्याचे जाहिर केले.

आमचे मंडळांत मी मिठाचा सत्याग्रह करावयाचा असे ठरले. त्याप्रमाणें दुसरे दिवशीं श्रीकृष्णाबाईचे घाटावर मिठाच्या सत्याग्रहाची सभा भरली. सत्याग्रहांत भाग घेण्याबद्दल जनतेतून चढाओढ सुरू झाली. सत्त्याग्रही कुमार बळवंत दत्तात्रय निकम, कोल्हापूर याने बेकायदेशीर मीठाचे पुडीचा लिलाव पुकारला. चढाओढीत पहिली पुडी कराडचे नागरीक पण हल्ली सांगली मुक्कामी असलेले सुप्रसिद्ध व्यापारी श्री. शामजी राजपाल शहा यांनी घेतली. त्याचा हा सत्त्याग्रह आम्हाला अनपेक्षित व उत्स्फुर्त असाच वाटला. दुसऱ्या पुडीचा लिलाव सत्याग्रही नंदलाल चतुर्भुज शहा, सांगली यांनी जाहिर केला, तो मी घेतला. सभेचा कार्यक्रम संपला. त्यावेळीं येथील पोलीस प्रमुख इन्स्पेक्टर नाईक व सब् इन्स्पेक्टर जाधव यांनी आम्हा चौघांना अटक केली व पोलीसांनी आणलेल्या मोटारीतून नेण्याचा प्रयत्न केला पण जनतेच्या इच्छेनुरुप सत्याग्रहीना मिरवणुकीने जेलकडे न्यावे लागले. दुसरे दिवशी खटला चालला. कोर्टाच्या कामात भाग घ्यावयाचा नसल्यानें ताबडतोब निकाल देण्यांत आला. चौघांना प्रत्येकी तीन महिने साधी कैद अशी शिक्षा झाली. फक्त श्री शामजी राजपाल शहा यांना या शिक्षेशिवाय ५० रुपये दंडाची शिक्षा अधिक झाली. आम्हा चौघांची शिक्षा पूर्ण झाल्यावर जेलमधून आमची सुटका झाली. कराडला आलो. चळवळ जनतेंत उत्साहपूर्वक चालली होती. त्यांत मीहि सामील झालो. सभा भरविणें प्रभातफेऱ्या काढणे हा नित्याचा कार्यक्रम असे. या गुन्हयाखाली माझेसह १०।१२ लोकावर निरनिराळे ५।६ खटले भरण्यात आले. त्यात मला आणखी ६ महिन्याची शिक्षा झाली. या शिक्षेची मुदत पूर्ण न होताच गांधी-आर्यविन कराराप्रमाणें अपुरी भोगावी लागली.

## काळी निशाणे व गव्हर्नरांचे स्वागत

कायदेभंगाची चळवळ देशांत जोराला लागली होती. महाराष्ट्रांत सातारा, नगर, पुणे, सोलापूर जिल्हे आघाडीवर होते. कराड तालुक्यांत

वडोली, मसूर, तांबवे, काले येथेंहि जंगलसत्याग्रह झाले. तुरुंग भरत चालले होते. या सुमारास जुलै महिन्यांत सातारा जिल्ह्यामध्यें मुंबईच्या गव्हर्नरांचा दौरा जाहिर झाला. कांहीं स्वार्थी व लाचार लोक स्वागताच्या तयारीची भाषा बोलू लागले. तसेंच रावसाहेब, रावबहादूर, खानसाहेब, सरसाहेब अशा सातारा जिल्ह्यांतील मंडळींनी स्वागताची तयारी केली कराड शहर काँग्रेसमार्फत गव्हर्नरांच्या आगमनप्रसगी काळ्या निशाणानीं करण्याचे ठरविण्यांत आले. गव्हर्नराच्या आगमनाचे रस्ते व त्यावरील घराघरांची झडती पोलिसांनी घेऊन कडेकोट बंदोबस्त करण्यांत आला. तरुण विद्यार्थ्यांची प्रभावी संघटना झाली होती. काँग्रेस कमिटीचे नेते दे. भ. पांडुआण्णा शिराळकर, गणपतराव आळतेकर, बाबुराव गोखले, राघुआण्णा धोपाटे वगैरे मंडळी पोलीसांनी अडथळे निर्माण केले तरी रस्त्यांच्या दुतर्फा जनसमूहाला बरोबर घेऊन काळ्या निशाणासह उभे होते. गव्हर्नरला ता. १३ जुलै १९३० रोजीं कोयना पुलापासून कृष्णानदीवरील फरशीपर्यंत लोकांनी काळी निशाणे एवढ्या मोठ्या प्रमाणांत दाखविली कीं, नोकरशाहीला घाम फुटला. विशेष हे कीं, कराड म्युनिसिपालिटीसमोर तरुण विद्यार्थी संघटनेने गव्हर्नर साहेबांच्या मोटारीसमोर काळी निशाणे फडकवली. पेठ रविवारच्या माणिक चौकांत कराड म्युनिसीपल प्रेसिडेंट खानसाहेब कच्छी यांच्या इमारतींत गव्हर्नर साहेबांचे खाजगी स्वागत होणार होते. त्याप्रसंगी चौकातील श्री. मोहनलाल शर्मा, श्री. रामचंद्र शर्मा, श्री. मारुतीराव महाडीक यांचे नेतृत्वाखाली तेथील जनतेनें साहेबांचे काळ्या निशाणांनी स्वागत केले. अशाप्रकारे काँग्रेसच्या यशस्वी कार्यक्रमामुळें नोकरशाही बेभानपणें चिडली. गव्हर्नर जाताच पोलीस बंदोबस्त काढून घेण्यांत आला.

कडक हरताळामुळें बाहेरून आलेल्या शेकडो पोलीसांना खावयास अन्नहि मिळण्याची पंचाईत पडली. इकडे श्रीकृष्णाबाईचे घाटावर हजारोंनी लोटलेल्या खेड्यापाड्यांतील जनसमुदायाची भोजनाची व्यवस्था नागरिकांनी मोठ्या जिव्हाळ्यानें केली होती. त्यामुळें नोकरशाहीस अधिकच चीड आली. तिनें येथील काँग्रेसच्या प्रमुख पुढाऱ्यावर व कार्यकर्त्यावर, गव्हर्नरसाहेबांना मानपत्र देणाऱ्या कौन्सिलरांच्या घरावर दगडफेक केली. सन्मानार्थ उभारण्यांत आलेल्या कमानींचा नाश केला, म्युनिसिपालटीचे

सार्वजनिक कंदील व बत्त्या फोडल्या, अशा तऱ्हेचें आरोप ठेवून खटला भरला. या खटल्यांतील आरोपींची नांवे येणेंप्रमाणें–

१) पांडुआण्णा शिराळकर २) बाबुराव गोखले ३) राघुआण्णा धोपाटे ४) गुलाब पैलवान ५) तुकाराम पतकी पैलवान ६) नरसोपंत धोपाटे ७) बाबुराव अष्टेकर ८) मोहनलाल शर्मा ९) रामचंद्र शर्मा, १०) मारुतराव महाडीक ११) सदाशिव वैद्य १२) मार्तंड झारी १३) दादोबा कालेकर. सदरचा खटला ' गव्हर्नर खटला ' म्हणून महाराष्ट्रांत गाजला, परंतु हा खटला ' गांधी आर्यावन ' कराराप्रमाणें काढून घेण्यात आला.

स्वातंत्र्यासाठीं अहिंसक शांततामय युद्धाच्या प्रभावी साधनांच्या प्रयत्नामुळें चिडून ब्रिटिश नोकरशाहीनें जबरदस्ती व जुलमी कायद्याचा अम्मल सुरू केला. त्याची उदाहरणे म्हणून सोलापूरचा लष्करी कायदा व त्याचे परिणाम म्हणून हुतात्मा श्रीकृष्ण सारडा, मल्लाप्पा धनशेट्टी, कुर्बान हुसेन, जगन्नाथ शिंदे वगैरे चौघांना फाशीची शिक्षा देण्यांत आली. तसेच चिरनेर गोळीबार याचाही उल्लेख करतां येईल. अशारीतीनें मीठाचा कायदा, जंगल सत्याग्रह अशा अन्याय्य कायद्याचा भंग करून साठ हजार माणसे तुरुंगात गेली.

## गोलमेज परिषदांचा गोमकाला

चळवळीच्या मध्यांत जॉर्ज स्लोम नांवाच्या ब्रिटिश वार्ताहरानें महात्मा गांधीना येरवडा जेलमध्यें भेटून कांहीं तासपर्यंत स्वराज्याच्या मागणीची चर्चा केली व त्यासंबंधीचे महात्मा गांधींचे मनोगत कागदावर लिहून काढले. नंतर महात्मा गांधीनी त्यांत कांहीं फेरफार केले व दुसऱ्या दिवशी तो खर्डा मुंबईच्या वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाला. त्यांत थोडे अपवाद वगळले असता प्रांतीक स्वायत्तता देण्यात यावी, हें कबूल केले होते. पण वरिष्ठ सरकारांत हिंदी लोकास जबाबदारीचे हक्क मुळींच देण्यांत आले नाहीत. अशा रितीनें सायमन कमिटीचा रिपोर्ट अपेक्षेप्रमाणें निराशाजनक झाला. त्यामुळें एकीकडे कायदेभंगाची चळवळ व दुसरीकडे निराशाजनक

रिपोर्ट अशी परिस्थिती निर्माण झाली. चळवळ अधिकच बळावली. नेमस्तहि कडक विरोधाची भाषा बोलू लागले. चळवळीचे वाढते प्रमाण पाहून सरकारनें ३१ ऑक्टोबरच्या जाहिरनाम्यास अनुसरून हिंदी घटनेबाबत विचार करण्यासाठीं सन १९३० नोव्हेंबर महिन्यांत विलायतेत गोलमेज परिषद बोलाविली व त्या परिषदेंत ब्रिटीश हिंदुस्थानांतील निरनिराळ्या पक्षांतील लोकास व प्रमुख संस्थानिकांस पाचारण करण्यांत आले. कराडहून वर्णाश्रम संघातर्फे श्री. लक्ष्मण महादेव उर्फ नानासाहेब देशपांडे विलायतेस गेले होते. या परिषदेंत भारतीय कॉंग्रेसनें भाग घेतला नाहीं. या पहिल्या गोलमेज परिषदेचे अधिवेशन सुमारे दोन महिने चालून जानेवारी १९३१ मध्यें संपले. त्यांत भावी राज्यघटना संयुक्त राज्यपद्धतीच्या तत्वावर तयार करण्यांत यावी व त्यांत संस्थानिकांनी सामील व्हावे. लष्कर व परराष्ट्रीय व्यवहार यासारखी साम्राज्याच्या महत्वाची खाती खेरीज इतर बाबतींत वरिष्ठ सरकारच्या कारभारावर वरीष्ठ कायदेमंडळाचे दडपण असावे. अल्पसंख्याकांचे व प्रस्थापित हितसंबंधाचे रक्षण करण्याची संरक्षक बंधने घालण्याचा सरकारास अधिकार असावा असा निर्णय घेण्यात येऊन ही परिषद संपली. परंतु या बैठकीस हजर असलेल्या भारतीय प्रतिनिधींच्या तोंडून असे उद्‌गार निघाले कीं, महात्मा गांधींची केवळ गैरहजरीच नव्हे तर कैद आणि देशांत धिंगाणा घालीत असलेली दडपशाही याच्या जाणीवेनें शुद्ध देशहिताच्या खऱ्या कळकळीचे असे कांहींही यांतून निघाले नाहीं. यामुळें गोलमेज परिषदेस गेलेले सारे सभासद बेचैन झाले होते.

देशांत पसरलेली अस्वस्थता शांत व्हावी, असे सरकारलाही वाटत होते. त्यामुळें श्री. सप्रू, श्री. जयकर या देशांतील प्रसिद्ध कायदेपंडीतांनी सरकारकडे जो पत्रव्यवहार सुरू केला होता, त्यास अनुसरून पं. मोतीलाल नेहरू व पं. जवाहरलाल नेहरू यांना अलाहाबाद तुरुंगातून म. गांधीशी विचारविनिमय करण्यासाठीं येरवडा जेलमध्यें पाठविण्यास सरकारकडून मान्यता मिळाली. त्याप्रमाणें म. गांधीचा नेहरू पितापुत्राशी विचार-विनीमय झाला. परंतु सरकार व कॉंग्रेस या दोन्ही बाजूच्या विचारांची भूमिका मुळातच परस्पर विरोधी असल्यामुळें तडजोड निघणे अशक्य झाले. शेवटी श्री. सप्रू–जयकर निराश होऊन स्वस्थानी गेले. आणि नेहरू पिता–

पुत्रांना अलाहाबाद तुरुंगांत सरकारनें परत पोहोचविले. परंतु काँग्रेसच्या समझोत्याची तीव्र जाणीव विलायतेतील सरकारलाही झाली होती. आणि म्हणूनच काँग्रेसनें गोलमेज परिषदेंत भाग घ्यावा, यासाठीं तत्कालीन व्हॉईसरॉय लॉर्ड आयर्विन यांच्याकरवी सन १९३१ च्या मार्च महिन्यांत महात्मा गांधींशी वाटाघाटी केल्या. त्यांत उभयपक्षी समझोता होऊन सरकारनें ४ मार्च रोजीं समेट केला. यासच गांधी–आयर्विन करार म्हणतात.

या कराराप्रमाणें महात्मा गांधी व त्यांचे निकटचे अनुयायी आणि हजारोंच्या संख्येनें तुरुंगात असलेल्या सामान्य सत्याग्रही स्त्री पुरुषांची सरकारने बिनशर्त सुटका करावी. चालू असलेले खटले सरकारनें बिनशर्त काढून घ्यावेत व महात्मा गांधींनी गोलमेज परिषदेकरितां विलायतेस जावे असे ठरले. कराराप्रमाणें सर्व सत्याग्रही सुटले. महात्मा गांधीहि सुटले व त्यांनी अलाहाबादेस प्रयाण करून नेहरू पितापुत्राशी विचारविनीमय करून सरकारशी करावयाच्या समेटाची दिशा ठरविली. दिल्लीस जाऊन व्हॉईसरॉय साहेबाशी बोलणी करून कबूल केलेप्रमाणें गोलमेज परिषदेसाठीं विलायतेस जाण्याचे प्रस्थान ठेवले. यावेळी त्यांचेबरोबर पं. मदनमोहन मालवीय यांना घेतले होते. ही गोलमेज परिषद म्हणजे एक टोलेजंग तमाशाच आहे असें त्या उभयतांना वाटत होते.

ही दुसरी गोलमेज परिषद भरण्याच्या मध्यंतरीच्या कालांत ब्रिटीश प्रधानमंडळांत बदल होऊन मजूर मंत्रीमंडळाच्या जागी रॅम्सेमॅग्डोनल्ड यांच्याच नेतृत्वाखाली राष्ट्रीय प्रधानमंडळ स्थापित झाले. त्यांत सर सॅम्युअल होअर हे नवीन भारतमंत्री अधिकारारूढ झाले. या परिस्थितीमुळें भारतीय संस्थानिकांच्याकडून पहिल्या गोलमेज परिषदेंत झालेल्या निकालास फाटे फोडण्याचा बराच प्रयत्न झाला. फेडरल गव्हर्मेंटमध्यें सामील होण्याची त्यांची पूर्वीची उत्कंठा कमी झाली होती. अशा स्थितीत दुसऱ्या गोलमेज परिषदेंत झालेल्या फलश्रुतीवरून नवीन कांही न मिळता पहिल्या गोलमेज परिषदेंत मिळालेले, मिळते किंवा नाही यासंबंधी पहिल्या गोलमेज परिषदेस उपस्थित असलेल्या प्रतिनिधींना काळजी वाटू लागली. तत्त्वे अबाधित राखण्याचा नव्या राष्ट्रीय सरकारचा निर्धार कायम आहे. मजूर मंत्रीमंडळाच्या

कारकिर्दीत मिळवलेली व पहिल्या गोलमेज परिषदेतील अखेरची वचनें राष्ट्रीय मंत्रीमंडळानें पाळण्याचे ठरविले आहे.

महात्मा गांधी लंडनला गेले. तेव्हां त्यांना भारतीय जनतेचा संपूर्ण पाठिंबा व चळवळीमुळें त्यांचा झालेला बोलबाला यामुळें इंग्लंडच्या राज-कर्त्यांनी त्यांचा सन्मान केला. ते ज्या रस्त्याने जात, त्या रस्त्यावर त्यांच्या मोटारीपुढें तेथील राजकीय पद्धतीप्रमाणें सन्मानदर्शक मोटारी खणखणत धावत असल्यामुळें इंग्लंडच्या जनतेचे लक्ष भारताकडे वेधून घेण्याचे कार्य महात्मा गांधींच्या विलायतवारीनें चांगलेच साधले. इंग्लंडच्या राजेसाहेबांची भेट घेतांना ठराविक पद्धतीचे कपडे घालून भेटावयास जावयाचे असते असा नियम होता. परंतु महात्मा गांधींच्या निर्धारान्वयें भेटीच्या वेळीं सदर बंधन घालणेंत आले नाहीं. आपल्या नेहमीच्या कपड्यांत या दरिद्री नारायणाचे सेवकानें बदल केला नाहीं. केवळ पंचा व उपरणें या कपड्यानिशी महात्मा गांधींनी राजेसाहेबाची भेट घेतली.

सन १९३१ च्या सप्टेंबर महिन्यांत दुसरी गोलमेज परिषद इंग्लंडचे मुख्य प्रधान रॅम्सेमॅग्डोनल्ड यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली. महात्मा गांधींनी हिंदू–मुसलमानांच्या राजकीय आकांक्षेतील मतभेद मिटविण्याकरितां कमालीचे परिश्रम केले. परंतु त्यांचा हेतू साध्य झाला नाहीं. उलट मुसल-मानाप्रमाणेंच अस्पृश्य पुढाऱ्यांनी स्वतंत्र मतदार संघ व राखीव जागांची मागणी केली व त्या फुटीर वृत्तीला राज्यकर्त्यांचा पाठिंबा मिळेल असे दिसू लागले. परिषदेंत संस्थानिक, मुसलमान, अस्पृश्य, हिंदुमहासभा अशा देशा-तील विविध पक्षांनी आपापले प्रतिनिधीत्व आंकडेवारीनें मांडून आपली स्वातंत्र्याची मागणी केली. त्यावेळीं वरील संस्थानीं जाहिर केलेल्या आंकडेवारीवरून भारताची लोकसंख्या दुपटीनें भरू लागली. शेवटी महात्मा गांधीनीं आपले प्रतिनिधीत्व ज्या जनतेच्यावर अवलंबून आहे त्याबद्दल बोलतांना ब्रिटिश भेदनीतीचा खरपूस समाचार घेऊन त्यांच्या कुटिल कारस्थानाबद्दल अध्यक्ष रॅम्सेमॅग्डोनल्ड यांना लाजविले. विविध भारतीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या आंकडेवारीची बेरीज करतां ती ७२ कोटी होते असे नजरेस आणून त्यांतुन भारताची खरी लोकसंख्या ४० कोटी वजा करून

ज्या ३२ कोटी लोकसंख्येची पोकळी निर्माण झाली आहे, तिचा मी प्रतिनिधी आहे असे बोचकपणें सांगून त्यांनी आपली मागणी पुढें मांडली. ब्रिटिश-साम्राज्यानें देऊ केलेल्या वसाहतीच्या स्वराज्यांतील देणगी भारतीय जनतेस न पेलणारी गोष्ट असल्यानें ती कॉंग्रेस संस्थेस मान्य नाहीं. तेव्हां आम्हांस संपूर्ण प्रांतिक स्वायत्तता द्यावी. बाकी सर्व बाबी तूर्त सरकारनें सांभाळाव्या अशी मागणी केली. महात्माजींच्या या मार्मिक मागणीचा अर्थ भारतीय प्रतिनिधींना न समजल्याने त्यांनीं महात्मा गांधींना त्यांच्या या मवाळ-मागणीबद्दल दोष दिला. पण सदर मागणीतील मर्म ब्रिटिश राजकर्त्यांनांच समजले होते. तेव्हां त्यांनीं महात्मा गांधींची ही मागणी नाकारून पहिल्या गोलमेज परिषदेप्रमाणें निकाल जाहिर केला. भारतीय जनतेला व सर्व-पक्षीय पुढाऱ्यांना महात्मा गांधीच्या मुत्सद्दीपणाबद्दल मागावून धन्यता वाटली.

परिषद संपली. महात्मा गांधी स्वदेशी परत आल्यावर फार दिवस तुरुंगाबाहेर राहाणार नाहींत अशी चिन्हे त्यांचा मुक्काम इंग्लंडमध्ये अस-तानांच स्पष्ट दिसू लागली होती व तेहि तुरुंगांत जाण्याच्या तयारीनेंच स्वदेशचा रस्ता चालत होते. वरील अंदाजाप्रमाणें महात्मा गांधींनी मुंबईच्या किनाऱ्यावर पाय ठेवताच त्यांना अटक करण्यांत आली.

गांधी आयर्विन करारान्वये मुक्त झालेले कॉंग्रेस पुढारी त्यांचे अनु-यायी गोलमेज परिषदेचे फलश्रुतीकडे डोळे लावून बसले असले तरी संघटनेचे त्यांचे कार्य सातत्यानें चालू होतेच. चळवळ गतीमान ठेवण्याची जबाबदारी आमच्या मंडळांतील लोकांनी श्री. यशवंतराव यांचेवर टाकली होती. ती त्यांनी चोखपणे बजावली. आम्ही एकत्र आलो. श्री. यशवंतराव भावनेपेक्षा ध्येयाची जपणूक करीत असत. त्यास अनुसरून त्यांनीं एक कार्यक्रम तयार केला. कराड तालुका कॉंग्रेस कमिटीचा अध्यक्ष मीच अस-ल्याने कराड तालुक्यात गट परिषदाद्वारा प्रचारमोहीम श्री. यशवंतरावांनी सुचविलेप्रमाणें सुरू केली. तालुक्याचे भाग पाडले. इंदोली, मसूर, ओंड, उंडाळे, काले अशी केंद्रे मुक्रर केली व त्या भागांत शिस्तबद्ध प्रचारकार्य सुरू केले. प्रत्येक गटपरिषदेस नवा नवा नामवंत पुढारी अध्यक्ष म्हणून

आणला होता. काले येथील गटपरिषदेचे अध्यक्ष पू. सानेगुरुजी होते. गुरुजींच्या उपदेशानें जनतेंत अमाप उत्साह निर्माण झाला.

महात्मा गांधीच्या अस्पृश्यता निवारण कार्यक्रमाच्या दृष्टीनेहि आम्ही आपली पाउले पुढे टाकीत होतो. येरवडा तुरुंगाच्या अंधेरी विभागांत मी शिक्षा भोगीत असतां कर्मधर्म संयोगानें कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सान्निध्याचा लाभ झाला. त्यावेळीं मी त्यांना कराडास व्याख्यानास येणेबद्दल विनंती केली. त्यांनीहि येण्याचे कबूल केले. पण आपला नेहमीचा शिरस्ता पाळला जात असेल तरच मी येईन असे त्यांनी सांगितले. ' आपली उतरण्याची सोय हरीजन वाड्यांत हरीजनाकडे झाली पाहिजे व निमंत्रकांनी त्याच घरी माझे समागमे तेथेंच भोजन केले पाहिजे ' हा त्यांचा नियम पाळण्याचे कबूल करून सुटका होताच त्यांचे घरी जाऊन आम्ही कराडास परत आलो. योगायोग असा कीं, आमचे मंडळाचा शिवजयंती उत्सव जवळच आला होता. त्यांत कर्मवीर विठ्ठल रामजी उर्फ आण्णासाहेब शिंदे यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम ठेवून पुण्यास त्यांना निमंत्रण देणेस श्री. यशवंतरावांना पाठविले व त्यांच्या नियमाप्रमाणें कराडांतील सर्व व्यवस्था करण्याचे कबूल करून श्री. यशवंतराव परत आले. कराड येथें कर्मवीर आण्णासाहेबांची उतरण्याची सोय श्री. गोविंदराव थोरवडे यांचे घरी केली. कर्मवीर आण्णासाहेब शिंदे यांचे पंगतीस श्री. यशवंतराव व मी यांनी जेवण केले. धर्मवीर बटाणे यांचे घरी तुकाराम दोडके ( कडेगांव ) नांवाचा हरीजन मुलगा त्यांनी आपल्या कुटुंबात ठेवून घेतल्याचे कर्मवीर आण्णासाहेब यांना सांगितले. हे ऐकून त्यांना फारच आनंद वाटला. कर्मवीर शिंदे यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहाने पार पडला.

स्वातंत्र्यासाठी देशसेवा आणि हरीजनोद्धाराचा असा कार्यक्रम पार पाडीत असतांना जनतेंत आपल्या कार्याची कितपत प्रतिष्ठा आहे हे अजमावण्यासाठींच केवळ नगरपालिकेच्या यावेळीं होणाऱ्या पोटनिवडणूकीत भाग घेऊन ग्रामसेवा करण्याचे आमच्या मित्रमंडळानें ठरविले व माझी उमेदवारी जाहिर करण्यांत आली आणि मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन कोणत्याहि प्रकारची भीड न घालता जाहिर विनंतिनेच मतमागणी केली. जनतेनें

आमच्या सेवेबद्दल अमाप प्रेम व विश्वास प्रकट केला. पुष्कळच अधिक मते मिळून निवडून आलो.

याचकाळांत अनेक सहकारी मित्रांचा लाभ झाला. त्यापैकी उल्लेखनीय श्री. गौरीहर सिंहासने हे एक होत. त्यांच्या सहकाराने खटाव तालुक्यांत नवीन कार्यक्षेत्र निर्माण करतां आले. दुसऱ्या गोलमेज परिषदेहून हिंदी प्रतिनिधी व महात्मा गांधी सन १९३२ च्या जानेवारीचे प्रारभी भारतास परत आले. येतात न येतात तोच संयुक्त प्रांतांत करबंदी मोहीम सुरू झाली. बंगाल्यांत दडपशाहीचे वटहुकूम निघाले आणि अखिल भारतांत कायदेभंगाची लाट पसरू नये, म्हणून व्हॉईसरॉय यांनी आर्डिनन्स काढले तेव्हां यासंबधी बोलणे करण्याकरितां महात्मा गांधींनी व्हॉईसरॉयची भेट घेण्याची इच्छा प्रदर्शित केली, पण तीस नकार मिळाला. या सर्व गोष्टीमुळें कायदेभंगाच्या मोहिमेनें फिरून उचल खाल्ली. सन १९३२ जानेवारीच्या पहिल्या आठवड्यांत महात्मा गांधी व इतर पुढाऱ्यांना एका दिवसांत पकडून तुरुंगात कोंडण्यांत आले व देशांतील सर्व कॉंग्रेस कमिटया बेकायदेशीर संस्था ठरविण्यांत आल्या. परंतु खुद्द राष्ट्रीय सभा मात्र बेकायदेशीर ठरविण्यांत आली नाहीं. बेकायदेशीर कॉंग्रेस संस्थेचा कराड तालुक्याचा अध्यक्ष मी होतो. माझ्यावर सातारा कलेक्टरांनी हजेरीची नोटीस बजावली. माझ्याप्रमाणेंच कराडांत श्री. बाबुराव गोखले, पांडुतात्या भाटे वकील, वामनराव फडके वकील, जगन्नाथ तेली या मंडळीवरही नोटीसा बजावण्यांत आल्या. त्या अगोदर दे. भ. पांडुआण्णा शिराळकर व गणपतराव आळतेकर यांना अटक होऊन तुरुंगांत रवानगी झाली होती. श्री. बाबुराव गोखले, जगन्नाथ तेली व मी या सर्वांनी हजेरीची नोटीस मोडून कायदेभंग केला. तिघानांही निरनिराळेवेळीं अटक झाली. सर्व प्रथम मला अटक झाली. नंतर जगन्नाथ तेली यांस अटक झाली. आम्हा दोघावरील खटल्याचा निकाल एकाचवेळी झाला. त्यांत प्रत्येकी एक वर्ष सक्तमजुरी व ५० रुपये दंड झाला. दंड न दिल्यास तीन महिने सक्तमजुरी अशा शिक्षा झाल्या. माझा दंड माझे परस्पर मी तुरुंगांत असतांना वसूल करण्यांत आला. श्री. यशवंतराव कॉंग्रेसच्या चळवळीची पद्धतशीर व्यवस्था करणेंत गुंतले होते. ही गोष्ट नोकरशाहीस न आवडून श्री. यशवंतरावांनाहि अटक करण्यांत आली. याचवेळी श्री. बाबुराव

गोखलेंना हजेरी नोटीशीच्या भंगाबद्दल अटक झाली. हे खटले निरनिराळे चालून श्री. यशवंतरावांना १९ महिन्याची सक्तमजुरी व गोखले यांना एक वर्ष सक्तमजरीची शिक्षा झाली. त्याचप्रमाणें श्री गौरीहर सिंहासने यांच्या-वरही कायदेभंगाचा खटला भरण्यांत येऊन त्यांना दोन वर्षाची शिक्षा झाली.

श्री. यशवंतरावांनी ठरवून दिल्याप्रमाणें तरुण मंडळींनी सातारा जिल्हा कॉंग्रेसचे तसेंच कराड तालुका कॉंग्रेसचे डिक्टेक्टर नेमण्याच्या सत्याग्रहाचा कार्यक्रम चालूच ठेविला. कराड तालुक्यांत अमाप उत्साही कार्यक्रम चालू होता. महाराष्ट्र कॉंग्रेसतर्फे प्रसृत होणारी बेकायदेशीर बुलेटिन्स सायक्लोस्टाईलवर छापून प्रसिद्ध करीत होते. ती छापणे व वाटणे तसेंच सर्व ठिकाणी पोहोचविणे हे कार्य आमच्या व्यापारी प्रेसच्या जागेतच तरुण कार्यकर्ते करीत, पण त्याचा सुगावा बरेच दिवस लागू दिला नाहीं पण जेव्हा सरकारी यंत्रणेला हा सुगावा लागल्याची चाहूल लागली, तेव्हा जागा बदलून ते काम अव्याहत चालूच ठेवले होते. महाराष्ट्रांत नजरेंत भरण्यासारखी चळवळ कराडातूनच चालू होती. त्यामुळें सातारा जिल्ह्याचे नांव चळवळीबाबत अग्रेसर होते, त्याचे सर्व श्रेय श्री. यशवंतरावांच्या कार्य-कुशलतेलाच होते. समाजात इतका उत्साह होता की, सरकारी दडपशाहीला पुरून उरण्याची तयारी सविनय कायदेभंगाने केली.

पहिल्या व दुसऱ्या गोलमेज परिषदेंत जी एक गोष्ट अनिर्णीत राहिली, ती म्हणजे कायदेमंडळातून कोणत्या जातीचे किती प्रतिनिधी असावेत ही होय. शेवटी रॅम्सेमॅक्डोनल्ड यांनी हा निर्णय करण्याची जबाबदारी स्वतःकडे घेतली व ता. १६ ऑगष्ट १९३२ रोजी कायदेमंडळातून जातवार प्रति-निधींची संख्या निश्चित करणारा जाहिरनामा काढला. त्यांत पुर्वीप्रमाणें मुसलमानांना स्वतंत्र मतदार संघ व स्वतंत्र प्रतिनिधी दिले होतेच. शिवाय हिंदु समाजांतील अस्पृश्यानाहि स्वतंत्र मतदार संघ व स्वतंत्र प्रतिनिधी दिले होते. त्यामुळें हिंदु समाजांत निष्कारण कायमची फूट पडते. ही गोष्ट लक्षांत घेऊन महात्मा गांधींनी सप्टेंबर महिन्यांत येरवडा जेलमध्यें प्रायोप-वेशन सुरू केले. अस्पृश्यांना हिंदू समाजातून फुटून बाहेर पाडणारी ही योजना बदलेपर्यंत माझे हे उपोषण चालू राहील असे ता. २० सप्टेंबर

रोजीं इंग्लंडचे मुख्य प्रधान रॅम्सेमॅग्डोनल्ड यांना कळविण्यांत आलें. सदर योजना न बदलल्यास मी हे उपोषण प्राणांतीक चालू ठेवीन असेहि कळविण्यांत आलें. यामुळें देशभर अस्पृश्यता निवारणासंबंधी अभूतपूर्व जागृती व चळवळ सुरू झाली. स्पृश्य–अपृश्य पुढाऱ्यामध्यें विचारविनीमय होऊन याबाबत महात्मा गांधींशी वाटाघाटी करण्यासाठी जेलमध्यें त्यांची भेट घेण्याची परवानगी सरकारकडे मागण्यात आली. त्याप्रमाणें स्पृश्याअस्पृश्य पुढाऱ्यांना मिळाली. महात्मा गांधींशी चर्चा सुरू केली व ती फलद्रुप होऊन उभयपक्षी मान्य असा करार झाला. याकामी अस्पृश्य पुढारी डॉ. आंबेडकरांनी अत्यंत समंजसपणे देशहिताकडे पाहून हा करार घडवून आणला. यासच ' गांधी–अंबेडकर ' करार म्हणतात. सदर करारावर ता. २४ सप्टेंबर रोजीं स्पृश्यास्पृश्य पुढाऱ्यांच्या सह्या झाल्या. त्यास ता. २६ सप्टेंबर रोजीं इंग्लंडचे मुख्य प्रधान रॅम्से मॅग्डोनल्ड यांची मान्यता मिळाली. नंतर महात्मा गांधींनी व्याधीग्रस्त मनुष्याकडून मोसंब्याचा रस घेऊन आपले उपोषण सोडले. गांधी–अंबेडकर करारानें स्वतंत्र मतदार संघाच्या योजनेंतील सर्व दोष नाहीसे झाले नाहींत. तरी संयुक्त मतदार संघाचे तत्व अमलांत आल्यामुळें स्पृश्य व अस्पृश्य मतदारांना एकाच मतदार संघात एकत्र मते देण्याची संधी निर्माण झाली, हे या कराराचे मर्म होय. तसेंच कायम स्वरुपाच्या स्वतंत्र प्रतिनिधीत्वाचे तत्व बदलून त्यासंबंधी परिस्थितीनुरुप दर दहा वर्षांनी विचार विनीमयानें जरूर तो बदल करण्याचे या करारांत ठरले होते. अस्पृश्य किंवा महात्माजींच्या नवीन शब्दप्रयोगाप्रमाणें हरीजन लोकाविषयीचे देशांतील स्पृश्य लोकांचे औदासिन्य पाहून महात्माजींनी आत्मशुद्धीकरितां सन १९३३ चे मे महिन्यांत येरवडा जेलमध्यें २१ दिवसांचे उपोषण करण्याचा निश्चय जाहिर केला, तेव्हां सरकारनें ताबडतोब त्यांची जेलमधून सुटका केली. जेलमधून सुटताच महात्मा गांधींनी सामुदायीक सविनय कायदेभंगाची चळवळ बंद ठेवण्याचा आदेश दिला. त्याप्रमाणें कॉंग्रेसच्या तत्कालीन हंगामी अध्यक्षांनी प्रथम ६ आठवडे व नंतर आणखी ६ आठवडे ही चळवळ थांबविल्याचे जाहिर केले.

कायदेभंगाची चळवळ बंद केल्यानें दडपशाहीचे सारे कायदे रद्द करावे अशा अर्थाचे पत्र महात्मा गांधींनी व्हॉईसरॉयना पाठविले. व्हॉईसरॉयांनीं

कायदेभंग कायमचा बंद केल्याशिवाय सरकार आपले दडपशाहीचे कायदे मागे घेण्याचा विचार करणार नाहीं व या बाबतींत समक्ष वाटाघाटी करण्याची सरकारची इच्छा नाहीं अशा अर्थाचे उत्तर महात्मा गांधींना पाठविले. याचवेळी लॉर्ड आर्यावन जाऊन त्यांच्या जागी लॉर्ड विलींग्टन भारताचे व्हॉईसरॉय म्हणून भारतांत आले होते. याची साक्ष वरील ताठ उत्तराने पटते. यावर महात्मा गांधींनी व्यक्तिशः ज्याला कायदेभंग करावयाचा असेल त्यानें करावा. मात्र सामुदायीक कायदेभंग बंद, अशी तोड काढली. हरिजन उद्धार हेंच कार्य यावेळीं त्यांनी चालविले होते. तथापि व्यक्तिशः कायदेभंगाचा कित्ता घालून देण्यासाठीं त्यांनी बंदी असलेल्या रास नांवाच्या खेडयास जाण्याचे ठरवून आणि वैयक्तिक कायदेभंग ता. १ ऑगष्ट १९३३ रोजीं करीत आहोत असे व्हाईसरॉयाना कळविले. सरकारनें त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना अटक करून तुरुंगांत अडकविले. परंतु प्रत्यक्ष कायदेभंग झाला नसल्यानें त्यांचेवर कायदेशीर खटला भरणे शक्य होत नसल्यानें त्यांना पुण्याच्या हद्दीबाहेर जाऊ नये अशी अट घालून ता. ४ ऑगस्ट रोजीं मुक्त करण्यांत आले. महात्मा गांधींनी ही अट तुरुंगाबाहेर पडतांच मोडली. म्हणून त्यांचेवर खटला भरण्यांत येऊन त्यांना १ वर्षाची शिक्षा देण्यांत आली. तुरुंगांत गेल्यावर त्यांनी हरिजन सेवेसाठीं ज्या सवलती मागितल्या त्या सरकारनें नाकारल्या. तेव्हां महात्मा गांधींनी उपोषण सुरू केले. त्या उपोषणाने त्यांची प्रकृती फारच बिघडली. तेव्हां ता. २३ ऑगष्ट रोजीं सरकारने त्यांची बिनशर्त सुटका केली.

सन १९३२ नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवडयांत तिसऱ्या पण छोटया गोलमेज परिषदेस सुरवात होऊन पहिल्या दोन्ही गोलमेज परिषदांनी नेमलेल्या कमिटयांचे रिपोर्ट विचारांत घेऊन शेवटचा निर्णय पक्का करण्याचे काम सुरू झाले. सन १९३२ च्या २७ डिसेंबरच्या सुमारास तिसरी गोलमेज परिषद समाप्त झाली. सन १९३३ च्या मार्च महिन्यांत तिन्ही गोलमेज परिषदांतील सूचना लक्षांत घेऊन सरकारनें आपल्या शिफारशी सरकारी खलित्यांत मांडल्या, तोच प्रसिद्ध ' व्हाईट पेपर ' होय. या शिफारशी पार्लमेंटपुढे बिलरूपानें मांडण्यापूर्वी पार्लमेंटच्या संयुक्त कमिटीने छाननी

करावी म्हणून जाईंट पार्लमेंटरी कमिटीची नेमणूक करण्यांत आली. तिच्याशी सहकार्य करण्यासाठीं कांहीं हिंदी सभासदांचीहि नेमणूक झाली होती. या कमिटीनें ता. २२ नोव्हेंबर सन १९३४ रोजीं आपला रिपोर्ट प्रसिद्ध केला.

सन १९३३ च्या जून महिन्याच्या सुमारास कॉंग्रेसचे बहुतेक पुढारी कायदेभंगांत झालेल्या शिक्षांची मुदत संपल्यामुळें मोकळे झाले होते. त्यांनी जुलै महिन्यांत पुणें येथें पुढील धोरण आखण्यासाठी एक परिषद बोलावली. तेथें महात्मा गांधींच्या प्रेरणेनें सामुदायिक कायदेभंग बंद करण्याचे ठरवून वैयक्तिक कायदेभंगाचे धोरण निश्चित ठरलें. या धोरणाचा ९ महिने प्रयोग झाल्यावर ता. ६ एप्रिल १९३४ रोजीं वैयक्तिक कायदेभंगहि तहकूब करण्यांत आला. नंतर पुढें हरिजनासंबधी कॉंग्रेसतर्फे चळवळ सुरू झाली. तेव्हां महात्मा गांधींच्या आदेशाप्रमाणें अस्पृश्यता निवारणाचा व त्याच्या विकासाचा कार्यक्रम आखण्यात आला. त्याप्रमाणें लोकांनीहि निरनिराळे कार्यक्रम सुरू केले. गांवोगांवी सहभोजने, मंदिर प्रवेश असे कार्यक्रम सुरू झाले. त्याप्रमाणें कराडातहि आमच्या मंडळामार्फत श्री. यशवंतराव प्रामुख्यानें सहभोजनाचे कार्यक्रम यशस्वी करीत. धर्मवीर ब्रटाणे यांनी आपले मालकीचे शिवमंदिर हरिजनांना खुले केले. हरीजन सेवा समितीची स्थापना दे. भ. पांडुआण्णा शिराळकर यांच्या अध्यक्षतेखाली केली. कार्यवाह म्हणून माझी निवड झाली. स्पृश्य जनतेंतून फंड जमवून हरीजन विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य केले. उदाहरणार्थ अशा हरिजन विद्यार्थ्यांपैकीं येथील श्री. पाटसुपे हे हरिजन फंडानें शिक्षणक्रम करून ऑफिसर झाले होते. तसेंच हरिजन मुलाकरितां हरिजन वाड्यांत शाळा सुरू केली. श्री. यशवंतराव स्वतः वर्गशिक्षक म्हणून नियमित काम करीत होते, पण ते शक्यतो कुठल्याहि कमिटीत पदाधिकारी नसत. त्याचे मर्म हे कीं, आपल्याबरोबर इतरांनीहि आपले आत्मे आपुलकिनें कार्यान्वित करावे, हेच होते.

सन १९३८ चे नोव्हेंबरमध्यें कराड म्युनिसिपालिटिची त्रैवार्षिक निवडणूक होती. ती राष्ट्रीय कार्यकर्त्यांतर्फे लढविण्याचे ठरले. पार्लमेंटरी बोर्ड निवडले. त्यानें राष्ट्रीय विचाराचे उमेदवार निवडले व उभे केले. परंतु श्री. यशवंतरावांचे बंधू व कुटुंबप्रमुख श्री. गणपतराव चव्हाण हे या

उमेदवाराविरुद्ध उभे राहिले. येथें कर्तव्यपालन श्रेष्ठ कीं, बंधुप्रेम श्रेष्ठ हा प्रश्न उभा ठाकला. त्यांच्या विचारसरणीप्रमाणें कर्तव्यपालनार्थ आपल्या वडिल भावाविरुद्ध प्रचार केला व आपला उमेदवार निवडून आणला. कर्तव्यसिद्धीचे समाधान झाले. पण बंधुप्रेमहि जागृत झाले. विशेष हे कीं, श्री. गणपतरावांना आपल्याविरुद्ध आपल्या भावाने प्रचार केला असताहि कर्तव्यपालनाबद्दल अभिमान वाटला. श्री. यशवंतराव व त्यांच्या आम्हां मित्रांना मुळीच दोष दिला नाहीं. एकाच कुटुंबांत थोरले बंधु सरकारी नोकर, दुसरे बंधु ब्राम्हणेत्तर पक्षाचे व श्री. यशवंतराव कॉंग्रेसनिष्ठ. पण यासंबंधीं घरांत बोलण्याची व मतभेदाची बाब कसली ती माहीत नव्हती. श्री. यशवंतराव अधिक बुद्धिमान व हुशार म्हणून जास्त शिकणार. यामुळें त्यांच्या मातोश्री व कुटुंबियांच्या आशा आकांक्षा त्यांचेवरच केंद्रीत झाल्या होत्या. अन्य लोकांच्या दृष्टीनें श्री. यशवंतरावांचे हे चाळे अव्यवहार्य होते. आमच्या सहवासांत असणाऱ्या तरुणांच्या कुटुंबांतील मंडळींच्या दृष्टीनें इतरांनी त्याग व देशभक्ती करावी. त्याची झळ आमच्या कुटुंबास लागू नये. या विचारसरणीमुळें आम्हांस त्यांच्या शिव्याशाप ऐकावे लागत. परंतु श्री. यशवंतरावांच्या कुटुंबांतील कोणीहि कधींच कांहीं कुरकुर केली नाहीं व आमच्यामुळें कुटुंबावर आलेली राजकीय आपत्ती आमच्यापेक्षां आनंदानें स्वीकारली. हा या सर्व कुटुंबाच्या देशभक्तीचा महान पुरावा माझे स्मरणां-तून कधीच नाहीसा होणार नाही.

सन १९३४ च्या अखेरीस मुंबई असेंब्लीची त्रैवार्षिक निवडणूक झाली. तीत कॉंग्रेसनें ४२ जागा जिंकल्या. या नव्या असेंब्लीत जाईंट सिलेक्ट कमिटीनें शिफारस केलेल्या सुधारणा हिंदी लोकांना नापसंत असल्याचा ठराव ता. ७ फेब्रुवारी १९३५ रोजीं कॉंग्रेसच्या प्रतिनिधींनी मोठ्या बहुमतानें पास केला. शुभ्र पत्रिका व संयुक्त कमिटीचा रिपोर्ट व अखेर पास झालेला कायदा या तिन्हीचे स्वरुप आशय दृष्टीनें एकच असलें तरी त्यांतहि दरवेळीं जे बदल होत गेले ते महत्वाचे आहेत व त्यामुळें सुधारणा कायद्याचे स्वरुप संकोच पावले आहे. शुभ्र पत्रिकेंत असेंब्लीची निवडणूक मतदाराकडून प्रत्यक्ष व्हावी अशी शिफारस केली असतां संयुक्त कमिटीनें ती अप्रत्यक्ष

म्हणजे प्रांतिक कायदे मंडळांतील सभासदांनी करावी असे ठरविले. पार्लमेंट-मध्यें बील पास होत असतांनाच मुंबई व मद्रास या इलाख्यांतूनहि इतर कांहीं प्रांतांना आहेत, त्याप्रमाणें जोड कायदे–मंडळे असावीत असें ठरविण्यांत आले. या कायद्याप्रमाणें व्यवस्था अमलांत आणण्यासाठीं भारत-सरकारचे काम झपाटयानें सुरू झाले. सन १९३६ साली संयुक्त सरकार व भावी प्रांतिक सरकार यांचे आर्थिक संबंध निश्चित करणारा रिपोर्ट प्रसिद्ध झाला. यास 'ओरोनेमियर कमेटी रिपोर्ट' असे म्हणतात. तसेंच प्रत्येक प्रांतांतील कायदेमंडळांत निवडून यावयाचे प्रतिनिधी जिल्हावार व शहरवार कसे निवडून यावेत हे ठरविण्यासाठीं नेमलेल्या हॅमंड कमिटीनेही आपला रिपोर्ट प्रसिद्ध केला. भारतसरकार यापुढें संयुक्त सरकार होणार असल्यानें प्रांतिक सरकार व वरिष्ठ सरकार यांची अधिकार क्षेत्रे निरनिराळी होतील. त्याप्रमाणें त्यांनी कायदेशीर बदल घडवून आणणेसाठीं दिल्लीस रिफॉर्म्स ऑफिस उघडले. त्यास विलायतेंतील इंडिया ऑफिस मदत करीत होते.

सन १९३४ साली कॉंग्रेसचे अधिवेशन मुंबईस होऊन त्यांत पुढें इंग्लंडात होऊ घातलेल्या राज्य सुधारणांच्या कायद्याप्रमाणें मंडळांत शिरून प्रांतिक सरकार राबविण्याला कॉंग्रेसनें सम्मती दिली व त्याप्रमाणें निवडणूका लढविण्याचे ठरले. त्याप्रमाणें सन १९३७ साली दक्षिण सातारा जिल्हयांतून चार प्रतिनिधी निवडून द्यावयाचे होते. तेव्हां सातारा जिल्हा कॉंग्रेसतर्फे उमेदवाराचे निवडीबाबत जिल्हयाचे तत्कालीन एकमेव नेते दे. भ. भाऊसाहेब सोमण यांचे नेतृत्वाखाली चर्चा सुरू झाली. श्री. यशवंतरावांनी श्री. आत्माराम पाटील यांचे नांव सुचविले, तेव्हां कॉंग्रेसमधील कांही मंडळींनी त्यांच्या उमेदवारीस विरोध केला. विरोधकांचे म्हणणे कीं, सेवे-पेक्षां धनवानांना मान्यता मिळते. त्यांचेजवळ निवडून येणेंसाठीं अवश्य तेवढे धनहि उपलब्ध नाही. तेव्हां श्री. आत्माराम पाटील यांच्या उमेदवारीस पाठिंबा म्हणजे कॉंग्रेसची एक जागा गमाविणे होय. वाटाघाटी होऊन दे. भ. भाऊसाहेब सोमणांनी श्री. यशवंतरावासह आम्हा सर्वांना वारंवार बजावून व परिस्थितीची जाणीव देऊन अखेर आमचे इच्छेप्रमाणें दक्षिण सातारा जिल्हयांत तीन उमेदवार उभे करण्याचे ठरवून पुढीलप्रमाणें नावे जाहिर केली. १) पांडुआण्णा शिराळकर २) भाऊसाहेब कुदळे ३) आत्माराम

पाटील. याप्रमाणें निकाल झाल्यावर कॉंग्रेस उमेदवारांच्या प्रचारकार्यास प्रारंभ झाला. पण कॉंग्रेसच्या कांहीं मंडळींचा श्री. आत्माराम पाटलांच्या निवडीस विरोध असल्याने त्यांनी प्रचारकार्यात विघ्ने निर्माण करण्यास सुरवात केली. ही गोष्ट लक्षांत येताच श्री. यशवंतराव व आम्ही सर्वांनी दे. भ. भाऊसाहेब सोमणांना भेटून सर्व परिस्थिती त्यांचेसमोर मांडली. तेव्हां भाऊसाहेबांनी कराडास कॉंग्रेसचे तिन्ही उमेदवार व त्यांचे सहकारी यांना प्रत्यक्ष बोलावितो व त्यांचेसमोर तुमची बाजू मांडून योग्य तो उपाय-योजना करू असे सांगितले. प्रचाराबाबत तुम्ही आपली योजना मांडा. ठर-ल्याप्रमाणें प्रचारकार्यास आरंभ करू असेंहि त्यांनी आश्वासन दिले. तिन्हीहि उमेदवार व त्यांचे सहाय्यक कराडांत जमले. दे. भ. भाऊसाहेब सोमणांनी परिस्थितीची कल्पना दिली व त्यांनी सूचना असल्यास द्याव्या असे सांगितले. कॉंग्रेस उमेदवारांचा प्रचार संयुक्तपणें करावा किंवा ज्याचा त्यानें आपापले सोयीप्रमाणें वैयक्तिक करावा असे पर्याय श्री. यशवंतरावांनी मांडले. मात्र आतां जे ठरेल त्यांत पुन्हा मुळीच बदल होणार नाहीं असे निक्षून बजावले. दोन्ही उमेदवारांनी वैयक्तिक प्रचार मान्य केला व त्या-प्रमाणें श्री. आत्माराम पाटील यांच्या वतीनें आम्हीही मान्य केला. पण त्यांतील साधक बाधक बाबी व आपली फूट प्रतिपक्षास वरदान होईल याचीहि मीमांसा यावेळीं स्पष्टपणें मांडली. पण याचा अर्थ कांही मंडळींनी निराळा लावून वरील वैयक्तिक प्रचाराचा कार्यक्रम कायम केला. आता आमचेवर प्रचाराची जबाबदारी वैयक्तिक असल्यानें श्री. आत्माराम पाटलांचे प्रचारकार्याची योजना श्री. यशवंतरावांच्या नेतृत्वाखालीं ठरविली. कराड तालुका कॉंग्रेसचा अध्यक्ष मी होतो. अखिल भारतभर पंडीत जवाहरलाल नेहरुंचा दौरा जाहिर झाला. सातारा जिल्ह्यांत सातारा व कराड या गांवी त्यांची व्याख्यानें मुकर झाली. कराडातील जनतेने व तरुण कार्यकर्त्यांनी तनमनधनाने आपापल्यापरी पंडीत नेहरूंच्या स्वागताची तयारी केली. चौकाचौकांतून कमानी उभारल्या. व्याख्यानाचे व्यासपीठहि स्वामीचे-बागेंत तयार केले. पंडीत जवाहर नेहरूना निपाणीहून कराडास आणणेची व्यवस्था कराड तालुका कॉंग्रेसनेच करावयाची असल्यानें ती जबाबदारी आमचेवर पडली. सर्व तयारी केली, पण मोटारीची व्यवस्था काय ? या

कामासाठीं योग्य अशी मोटार पाहिजे होती. आम्ही स्वजनाकडे मागणी केली, पण कांहींना कांहीं सबबी सांगून असहकार झाला. तेव्हां मी व यशवंतरावांनी विचार करून कराडचे नगराध्यक्ष व त्यावेळचे मुस्लिमलीगचे अधिकृत उमेदवार खानसाहेब अहमदसाहेब कासमसाहेब कच्छी यांचेकडे मोटारीची मागणी केली. पंडीत नेहरूंना लांबून आणण्याचं असल्याने ती मोटार चांगली व्यवस्थित असावी अशी विनंती केली. त्यावेळीं खानसाहेब कच्छी यांनी उद्गार काढले कीं, जर तुम्ही अगोदर ही गोष्ट मला सांगितली असती तर नवी मोटार पंडीत नेहरूंच्या स्वागतासाठीं आणली असती. तरी पण त्यांनी गाडीची उत्तमप्रकारे तयारी करून मागितलेल्या मुदतीच्या आंत स्वखर्चानें आमचेकडे पाठविली. पंडीत जवाहरलाल नेहरू कराडास आले. त्यावेळीं अमाप जनसमुदाय खेड्यापाड्यांतून व इतर तालुक्यांतून आला होता. पंडीत नेहरूंचे स्वागतहि जनतेकडून प्रचंड प्रमाणांत झाले. त्यांचा सत्कार प्रथम हार घालून कोणी करावयाचा याची चर्चा होऊ लागली. परंतु काँग्रेस कमिटीनें अगोदरच सर्व व्यवस्था ठरविली होती. नगराध्यक्ष खानसाहेब कच्छी यांनी प्रथम हार घालावा व नंतर काँग्रेस कमिटी व इतरांनी आपापले हार घालावे अशी ही योजना होती. मिरवणूकीच्या या मोटारीस फुलांची सजावट खानसाहेब कच्छी यांनी स्वेच्छेने केली होती. खानसाहेब कच्छी यांनी काँग्रेस कमिटीला दिलेल्या सहकाराची कल्पना आम्ही पंडीतजींना दिली तेव्हां त्यांनी त्यांची प्रशंसा केली. पण पंडीतजींनी आपल्या भाषणांत असे निक्षून सांगितले कीं, काँग्रेस उमेदवारांच्या विरुद्ध उभे असलेले उमेदवार व्यक्तिशः भले कीं बुरे हा प्रश्न नसून ते काँग्रेसचे उमेदवार नाहींत, ते जनतेचे प्रतिनिधी नाहींत, म्हणून त्यांना मते देऊ नका व आपली मते काँग्रेस उमेदवारांनाच द्या. सभा संपली. पंडीत नेहरू साताऱ्यास रवाना झाले. नंतर श्री. यशवंतरावांनी गौरीहर सिंहासने, उमेदवार आत्माराम पाटील व इतर मित्रमंडळीसह प्रचार दौऱ्यास आरंभ केला. आम्ही सर्वच पोरसवदा, प्रचाराच्या प्रथम फेरीत विशेष कांही घडल्याची कल्पना आली नाहीं. पण पुढें प्रचाराची दंगल सुरू झाली. तेव्हां अनेक गोष्टी दृष्टोत्पत्तीस येऊ लागल्या. प्रचाराचे साधन म्हणून छापखाना आमचे मालकीचा असल्यानें प्रचार-पत्रकाद्वारे आम्ही आमचे म्हणणे मांडीत

होतो. दुसऱ्या प्रचार फेरीस आरंभ झाला. सर्व तालुक्यांतील खेडोपाडी जनतेंतील आपुलकीच्या प्रेमानें श्री. आत्माराम पाटील यांचे उमेदवारीस चोहोकडून प्रचंड पाठींबा जाहिर झाला. मतदानाचा दिवस उजाडला. मतदान झालें. त्याचा निकाल पुढीलप्रमाणें झाला. आमचे कॉंग्रेस उमेदवार श्री. आत्माराम पाटील हे ४०००० च्या प्रचंड बहुमतानें निवडून आले. रावसाहेब कल्याणी कॉंग्रेसविरोधी १८००० मते मिळून निवडले गेले. शंकरराव मोहिते यांना १४००० मते मिळाली व कॉंग्रेसचे दुसरे उमेदवार दे. भ. पांडुआण्णा शिराळकर १०००० मते मिळून निवडून आले. येणेंप्रमाणें जनमताचा कौल मिळाला. श्री. शंकरराव मोहिते यांनीं निवडणूकीपूर्वी सरकारी नोकरीसाठीं अर्ज केला होता. तेव्हां त्यांना नोकरीबद्दल सरकार-कडून विचारणा झाली व ती त्यांना मान्य होऊन त्यांनी नोकरी पत्करली आणि आपल्या सभासदत्वाचा राजिनामा दिला. दक्षिण साताऱ्यांतील या रिकाम्या झालेल्या जागेची निवडणूक सरकारनें जाहिर केली. तेव्हां श्री. यशवंतरावांनी कॉंग्रेसतर्फे श्री. चंद्रोजी पाटील, कामेरी यांची उमेदवारी सुचविली. तेव्हां कॉंग्रेस कमिटीनें त्या उमेदवारीस मान्यता दिली. पूर्व निवडणुकीचा कॉंग्रेस कमिटीवर व विरोधी पक्षावर श्री. यशवंतराव व त्यांचे सहकारी यांच्या प्रयत्नांचा व चिकाटीचा परिणाम म्हणून श्री. चंद्रोजीराव पाटील बिनविरोध निवडून आले व दक्षिण सातारा जिल्ह्यांत कॉंग्रेसचे तीन सभासद निवडून आले. निवडणुकीत अकरा प्रांतापैकी सहा प्रांतांत कॉंग्रेसला निर्विवाद बहुमत मिळाले तेव्हा कॉंग्रेस पक्षानें अधिकार ग्रहण करावेत किंवा नाही हा प्रश्न उपस्थित झाला, तेव्हा ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीनें व कॉंग्रेस कमिटीनें असा ठराव केला की, गव्हर्नरांनी सन १९३५ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्टातील कलम ५२ प्रमाणें जे विशेष अधिकार आहेत, ते कॉंग्रेस प्रधान मंडळ जोपर्यंत सनदशीर मर्यादेत वागत आहेत तोपर्यंत अमलांत आणावयाचे नाहींत असे आश्वासन दिले तर अधिकार स्विकार करावा. यावर सरकारी उत्तर असे मिळाले कीं, गव्हर्नरांनी कायद्यांतील कलम ५२ व ५४ कडे बोट दाखवून सांगितले की, जोपर्यंत गव्हर्नरांना कायद्यानें अधिकार दिले आहेत ते कसे उपयोगांत आणले जातात हे पहाण्यासाठीं त्यावर गव्हर्नर जनरल व भारतमंत्री यांची देखरेख

आहे तोपर्यंत गव्हर्नरांना वरीलप्रमाणें आश्वासन देतां येणें अशक्य आहे. यानतर झालेल्या वादविवादांत कॉंग्रेसच्या धोरणाचे स्पष्टीकरण म्हणून असे सांगण्यांत आले कीं, गव्हर्नरांनी विशेष अधिकार उपयोगांत आणून प्रधान मंडळाच्या कामांत शक्यतोवर व्यत्यय आणू नयेत एवढेच नैतिक आश्वासन दिले असते तरी पुरे होते. महात्मा गांधींनी हा प्रश्न एका त्रयस्थ लवाद-मंडळाकडे सोपवावा असे सुचविले. परंतु लवाद मंडळाकडे सोपविण्याजोगा हा प्रश्न नसून कायद्याच्या अर्थाचा प्रश्न होता कीं, राज्यकारभाराच्या संघटणेंत सुरळीतपणा उत्पन्न करण्याच्या सोईचा हा प्रश्न होता, ही गोष्ट त्यावेळीं दृष्टिआड झाली असे म्हटले पाहिजे. ही लवादाच्या नेमणूकीची सूचना मान्य नाही असे पाहिल्यावर महात्मा गांधींनी तिथळ येथें टाईम्स ऑफ इंडियाच्या बातमीदारास दिलेल्या मुलाखतीत सांगितले कीं, गव्हर्नरांनी प्रधानमंडळाच्या कारभारांत हात घालूच नये, असे मी म्हटलेले नाहीं. गव्हर्नरांना विशेष अधिकार उपयोगांत न आणण्याचे आश्वासन देता न येणें कायद्यानें शक्य नसले तरी कायद्यानें गव्हर्नरांना दुसरी गोष्ट करणे शक्य आहे. ती ही कीं, त्यांनी प्रधान मंडळाच्या निर्णयाविरुद्ध राज्यकारभारांत हात घालण्यापूर्वी प्रधानांना कामावरून काढून टाकावे किंवा त्याचा रॉजिनामा मागावा. गव्हर्नरांनी प्रधानांना बडतर्फ करणें किंवा राजिनामा द्यावयास लावणे हे तरी कायदेशीर आहे ना ?

या वाटाघाटीचे मधल्या काळांत घटनेप्रमाणें निवडणूक झालेनंतर जर कांहीं तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास काम चालवू. प्रधानमंडळ गव्हर्नरांना नेमण्याचा अधिकार होता. त्याची मुदत सहा महिन्याची होती त्याप्रमाणें मुंबई इलाख्यांत सरसाहेब धनजीशा कूपर मंत्रीमंडळ गव्हर्नरामार्फत स्थापन करण्यांत आले. महात्मा गांधीच्या वरील मुलाखतीनंतर व्हाईसरॉयांनी जून ता. २१ सन १९३७ रोजीं महत्वाचा खुलासा केला कीं, लोकप्रतिनिधी व राजकर्ते यांच्यामध्यें सलोखा उत्पन्न व्हावा असे आमचे धोरण आहे. विशेष अधिकाराचा उपयोग करतांनादेखील राजकारभारांत अडथळा उत्पन्न होऊन ते बंद पडावे अशी आमची इच्छा नाही. महात्मा गांधी म्हणतात त्याप्रमाणे प्रधानमंडळास बडतर्फ करण्याची प्रथा उत्पन्न होणें, प्रातिनिधीक राजपद्धतीस अनिष्ट आहे. राज्यकारभाराचे कार्य

परस्परांचा विश्वास व पेचप्रसंग सोडविण्याचे धैर्य याच्या जोरावर पार पडते, हे लक्षांत ठेवून सर्वांनी वागणे इष्ट आहे. असे न वागल्यास घटना अमलांत आणण्याचे तहकूब करावे लागेल असा अनिष्ट प्रसंग टाळणे सर्वांचे कर्तव्य आहे. व्हॉईसरॉयांच्या या खुलाशानंतर जुलै ७ तारखेस काँग्रेसनें कसलेहि आश्वासन न मागता अधिकार ग्रहण करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे काँग्रेसची मंत्रिमंडळे सहा प्रांतांत अधिकारावर आली. मुंबई इलाख्याचे नेतेपदी बाळ गंगाधर खेर यांची निवड झाली. त्याप्रमाणें मुख्यमंत्र्यांनी आपले मंत्री जाहिर केले.

निवडणूकीची धामधूम संपली होती. यशाच्या उत्साह वर्धनानें कार्याच्या वाढीस नवीन जोम आला. श्री. यशवंतरावांच्या फारा दिवसाच्या वर्तमानपत्र काढण्याच्या योजनेस मूर्तस्वरुप देण्याचे ठरले. संपादक म्हणून श्री. आत्माराम पाटलांच्या नांवाची निवड झाली. संपादक मंडळांत श्री. ह. रा. महाजनी, भय्याशास्त्री वाटवे, यशवंतराव चव्हाण वगैरे नांवे होती. व्यवस्थापक व प्रचारक म्हणून श्री. शांताराम इनामदार व गौरीहर सिंहासने यांची नांवे नियुक्त झाली. साप्ताहिकाचे नांव लोकक्रांती असे ठेवण्यांत आले. याप्रमाणें डिक्लेरेशन केले. वर्तमानपत्र व्यापारी प्रेसमध्यें छापून प्रसिद्ध होऊ लागले. त्याचे छपाईचा खर्च सहा महिनेपर्यंत मी सोसला. पुढें तो असह्य झाल्यामुळें वर्तमानपत्र बंद पडले. याचकाळांत काँग्रेसतर्फे अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष राजेंद्रप्रसाद कराडास आले होते. तसेंच नेताजी सुभाषचंद्र बोस, पंडीत मदनमोहन मालवीय, मानवेंद्र रॉय, मणिबेन कारा, लिलावती मुनशी अशा मान्यवर पुढाऱ्यांचे दौरे चालू होते. तालुका काँग्रेसचा अध्यक्ष या नात्यानें सर्व व्यवस्था करावी लागत होती. यामुळें सर्वांना जवळून पहाण्याच्या व भेटण्याचा योग मिळत होता. नेताजी सुभाषचंद्र बोसांना साताऱ्यास पोहोचवितांना, त्यांच्या सहवासांत मोटारींतून जातांना संभाषणाचा लाभ श्री. यशवंतराव व मला अशा दोघांना मिळाला. कराडच्या सान्निध्यांतील वसंतगडाच्या दर्शनाने नेताजींच्या कुतुहलास वसंतगडाचा रामायणकालीन पौराणिक इतिहास विदीत केला. नेताजींचे लक्ष महाराष्ट्रांतील ऐतिहासिक डोंगरी किल्ल्याकडे विशेष असल्याचे दिसले.

महाराष्ट्रांत रॉयवादाचा प्रचार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या प्रभावी वाणीनें विद्वत्तापूर्ण शब्दांत केला. त्यांना महाराष्ट्रांत अनुकूल असाच कौल मिळाला. सातारा जिल्हयांत श्री. आत्माराम पाटील, ह. रा. महाजनी, वाटवेशास्त्री वगैरे पंक्तीत तरुण काँग्रेस कार्यकर्त्यांनी रॉयवादाचा स्वीकार केला. श्री. यशवंतराव व मी आणि कांहीं मित्रगण काँग्रेसच्या तत्वज्ञानापासून विचलित झालो नाहीं.

सातारा जिल्हयांत रावसाहेब, खानसाहेब, सरसाहेब अशा पदव्या धारण करणारी एक मोठी संघटना कूपर पार्टी या नांवानें जिल्हा बोर्डाच्या राजकारणांत ठाण मांडून बसली होती. त्याविरुद्ध काँग्रेसचे मान्यवर पुढारी दे. भ. भाऊसाहेब सोमणानीं अनेक सामने देऊन वरील संघटना कमकुवत करीत आणली होती. तेव्हां तिला समाजांतून संपूर्ण नष्ट करण्याचा आम्ही दे. भ. भाऊसाहेबांच्या आशिर्वादाने निश्चय केला व श्री. यशवंतराव सातारा जिल्हा लोकलबोर्डाच्या इलेक्शनच्या नियंत्रण आखाडयांत उतरले. इलेक्शन बोर्ड स्थापन केले. तालुकावार उमेदवार उभे केले. काँग्रेसचे बहुसंख्य उमेदवार निवडून आले. अशातऱ्हेनें जिल्हाबोर्डांत काँग्रेसचे मताधिक्य झाले व ते स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सन १९५२ सालापर्यंत काँग्रेस पक्षाच्या ताब्यांत राहिले.

सन १९३७ पासून श्री. यशवंतरावांचा लोकसंग्रहाचा प्रयत्न पुन्हां अधिक जोमानें चालू होता. प्रथम तालुक्यांत प्रत्येक गांवी कर्तृत्ववान तरुणाची निवड, ओळख व नंतर देशप्रेमाची आवड निर्माण करणे व वाढविणें हा कार्यक्रम चालू असे. यावेळीं अनेक तरुणांना त्यांनी आपल्या निकट आणले. कोल्हापूर, सांगली संस्थानांतून मोठा प्रचार करून खूपच जागृती करून अनेक कार्यकर्ते मित्र मिळविले. तसेंच कराड तालुक्यांत संभाजीराव थोरात, पाटण तालुक्यांत श्री. व्यंकटराव पवार, बाळासाहेब देसाई वगैरे लोकांना जवळ आणून काँग्रेस कार्यास जोडण्याचा प्रयत्न त्यांनी केला. सन १९४० मध्यें भाई मसानी यांच्या अध्यक्षतेखाली श्री. व्यंकटराव पवार यांनी प्रवेश केला. याचवेळी श्री. बाळासाहेब देसाई हे जिल्हा लोकलबोर्डांत काँग्रेस उमेदवार म्हणून निवडून आले होते. कराडांत वकिली करीत

असतांना हरीभाऊ लाड यांच्या जवळकीनें श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या अधिक सान्निध्यांत आल्यानें बाळासाहेब देसाई काँग्रेसच्या कार्यात समरस होऊ लागले. जिल्हा बोर्डाचे काँग्रेसचें पहिले प्रेसिडेंट श्री. बाबासाहेब शिंदे आखाडकर हे मुंबई असेंब्लीत निवडून गेल्यानें नंतरच्या रिकाम्या झालेल्या जागेवर श्री. बाळासाहेब देसाई यांची निवड झाली. ते सन १९५२ पर्यंत प्रेसिडेंट पदावर होते. जिल्हा बोर्डाचा कारभार उत्तमप्रकारें केल्यामुळें त्यावेळच्या शासनानें त्यांना रावसाहेब हा किताब देऊन त्यांचा बहुमान करण्याचे ठरविले, पण त्यांनी हा किताब न स्विकारता परत केला. त्यामुळें त्यांची काँग्रेसनिष्ठा लोकमतावर चांगली बिंबली. त्यानंतर सन १९५२ मध्यें पाटण तालुक्यातर्फे मुंबई असेंब्लीत उमेदवार म्हणून श्री. बाळासाहेबांना निवडण्यांत आले. नंतर त्यांची काँग्रेस कार्यासाठीं महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीसपदी नियुक्ती झाली. सन १९५७ सालीं दे. भ. मुरारजीभाई देसाई मध्यवर्ती मंत्रीमंडळात गेल्याने ' मुंबई द्विभाषिक ' राज्याचे मुख्यमंत्री म्हणून श्री. यशवंतराव चव्हाणांची निवड झाली. त्यावेळीं श्री. यशवंतरावांनी बाळासाहेबांना आपले मंत्रीमंडळांत घेतले.

सन १९३७ चे निवडणूकीनें स्थापन झालेली प्रधानमंडळे सन १९३९ पर्यंत अस्तित्वात होती. या वर्षाच्या सप्टेंबर महिन्यांत युरोपांत दुसरे महा-युद्ध सुरू झाले. जर्मनराष्ट्रानें हेर हिटलरच्या नेतृत्वाखालीं ता. १ सप्टेंबर सन १९३९ रोजीं पोलंडवर स्वारी करून दुसऱ्या महायुद्धास युरोपखंडांत आरंभ केला. जर्मन राष्ट्रानें पुकारलेल्या युद्धाविरुद्ध ता. ४ सप्टेंबर १९३९ रोजीं इंग्लंड आणि फ्रान्स यांनीहि जर्मन राष्ट्राविरुद्ध युद्ध जाहिर केले. ही वेळ भारतांतील क्रांतीकारकांनाहि सोयीची वाटली. त्याप्रमाणें रासबिहारी बसूंनी भारतांत भारतीय क्रांतीकारकांची संघटना उभारून तयारी चाल-विली. भारतसरकारनें सदर युद्धांत कोणाचाहि सल्ला न घेता युद्धांत सामील झाल्याचे जाहिर केले. या संबंधांत काँग्रेसचे काय धोरण असावे या प्रश्ना-वरून प्रांतिक मंत्रीमंडळांनी राजिनामे द्यावेत असे काँग्रेसने ठरविले. त्याप्रमाणें काँग्रेसच्या सर्व प्रांतिक मंत्रिमंडळांनी राजिनामे दिले.

सन १९४० मध्यें महात्मा गांधी काँग्रेसच्या जबाबदारींतून बाहेर पडले. ते काँग्रेसचे सभासदहि राहिले नाहींत. त्यांनीं भारत सरकारनें

स्विकारलेल्या धोरणास वैयक्तिकरीत्या विरोध करण्याचे ठरविले. त्याप्रमाणें त्यांनीं वैयक्तिक सत्याग्रह करण्याचे ठरविले. पसंतीप्रमाणें जिल्हावार सत्याग्रही निवडण्याचे जाहीर झाले. अनेक उत्साही सत्याग्रहीचे अर्ज महाराष्ट्र काँग्रेस कमिटीकडे गेले. त्यांत कराडांतून धर्मवीर बटाणे, बाबुराव गोखले, यशवंतराव चव्हाण, वालचंद गांधी, हरीभाऊ लाड, गौरीहर सिंहासने आदि पुष्कळ सत्याग्रहींचे अर्ज परवानगीकरितां महाराष्ट्र काँग्रेस कमिटीकडे गेले, त्यापैकीं धर्मवीर बटाणे, श्री. वालचंद गांधी व गौरीहर सिंहासने यांचे अर्ज मंजूर झाले. श्री. वालचंद गांधींनी कराड येथें जैनमंदीरासमोर सत्याग्रह केला. श्री. गौरीहर सिंहासनें यांनी कलेढोण ता. खटाव येथें हरीभाऊ लाड यांचे अध्यक्षतेखालीं सत्याग्रह केला. त्यांत त्यांना ६ महिन्याची सक्तमजूरीची शिक्षा झाली. वालचंद गांधींना ४ महिन्याची सक्तमजूरीची शिक्षा झाली. धर्मवीर बटाणे यांनी घरगुती आपत्तीमुळें सत्याग्रह करण्याचे स्थगित केले. विशेष हे कीं, इंग्रजांच्या अशा अत्यंत संकटाच्या व आणिबाणीच्या काळांत गांधीप्रणीत गांधीयुगांतील राजकिय कैद्यांना वागवितांना जे सौजन्य व औदार्य इंग्रजी सत्तेनें दाखविले ते युरोपातील दुसऱ्या एकाहि देशानें दाखविले नसते.

ता. १६ जानेवारी सन १९४१ ला कलकत्त्याहून गुप्तपणें नेताजी सुभाषचंद्र बोस सरकारी नजरकैदेतून अत्यंत शिताफिने भारताबाहेर निसटले. त्यांनी ता. २६ जानेवारीला अफगाणिस्तान मास्कोमार्गें बर्लिनला जाऊन हेर हिटलर यांची भेट घेतली. त्यांचे मनसुभे ठरले. त्याप्रमाणें त्यांनी अस्थायी भारतसरकारची स्थापना केली. या अस्थायी भारतसरकारला जपान, जर्मनी, स्वतंत्र फिलीफाइन्स, स्वतंत्र ब्रम्हदेश या सरकारांनी मान्यता दिली. भारत अस्थायी सरकारनें जर्मनीचे मदतीनें या सरकारतर्फे आझाद हिंद सैन्याची निर्मिती केली व आपला कारभार अंदमान निकोबार बेटावर सुरू केला. अमेरिका वगैरे अन्यदेशांतील भारतीय लोकांकडून कोटयावधि रुपयांचा निधी जमविला. सन १९४१ च्या डिसेंबरांत पूर्वकडे जपाननें दोस्त राष्ट्राशी युद्ध जाहिर केले. चार महिन्यांत या भागांतील फ्रान्स, डच, इंग्लंड वगैरेच्या ताब्यांतील सर्व देश जपाननें जिंकला. सन १९४२ च्या एप्रिल महिन्यांत जपानी फौजांनी भारताच्या सरहद्दीवर आपली ठाणी स्थापन केली.

ता. ९ ऑगष्ट सन १९४२ रोजीं मुंबईत गवालिया टँकवर काँग्रेसचे अधिवेशन भरले. त्यांत महात्मा गांधींनी 'चलेजाव' चा ठराव मंजूर केला. महात्मा गांधींनी 'चलेजाव' घोषणेनें संपूर्ण असहकार पुकारला. सारे लहान मोठे पुढारी व काँग्रेसचे कार्यकर्ते सरकारनें कैदखान्यांत टाकले. हुकूमाशिवाय धरपकड, झडत्या व झडतीच्यावेळीं घरांतील मालाची नासधूस, लाठीमार, गोळीबार, अटकेंत व तुरुंगांत कैद्यांचा छळ, सभाबंदी व जमावबंदी असे सरकारी दडपशाहीचे तांडव सुरू झाले.

मुंबईच्या या काँग्रेसच्या अधिवेशनासाठीं सातारा जिल्ह्यांतून पुष्कळ लोक गेले होते. त्यांत श्री. यशवंतराव आदि मंडळी गेली होती. त्यांनी तिकडेच परस्पर काँग्रेसच्या आदेशाप्रमाणें चळवळ करणेसाठीं भूमिगत होऊन आपले कार्य सुरू केले. सरकारी धोरणाप्रमाणें कराडांत सर्व प्रथम श्री. पांडुआण्णा शिराळकर व गणपतराव अळतेकर वकील यांना कचेरींत बोलावून नेवून तेथेंच अटक केली. जनतेंत खळबळ माजली. बंदोबस्तासाठीं पोलीस कमी पडू लागले. तेव्हा कराडचे पोलीस सब्-इन्स्पेक्टरनीं साताऱ्याहून अधिक मदत मागविली. पण त्या मदतीबरोबर डी. वाय्. एस्. पी. कराडास मुक्कामास आले. श्री. बाबुराव गोखले, वामनराव फडके वकील व व्यंकटराव पवार वकील यांनी सत्याग्रहाची तारीख जाहिर केली. त्याप्रमाणें सभा सुरू झाली. मला सत्याग्रहींनी भेटीसाठीं बोलाविले आहे असा निरोप आला. मीहि निरोपाप्रमाणें भेटावयास सभेच्या ठिकाणी गेलो. तेथेंच त्या सत्याग्रहाबरोबर मलाहि अटक करण्यांत आली. याचवेळीं अनेक तरुण कार्यकर्त्यांना याच मोटारींतून कचेरीत नेले. त्यापैकीं बाबूराव माळवदे यांस ठेवून घेऊन श्री. माधवराव जाधव वगैरे प्रमुख ६–७ कार्यकर्त्यांना सोडून दिले. श्री. यशवंतरावांनी भूमिगत राहून आपलेबरोबर शांताराम इनामदार, माधवराव जाधव, डी. एम्. पाटील, बी. आर. कोतवाल, बी. बी. काळे आदि तरुण कार्यकर्त्यांना भूमिगत ठेवून चळवळ अत्यंत नेटानें चालविली. कार्यकर्त्यांची अभेद्य संघटना स्थापन करून प्रस्थापित ब्रिटिश राज्यसत्ता जेणेंकरून खिळखिळी करतां येईल असे कार्यक्रम या कार्यकर्त्यांनी अमलांत आणले.

अमेरिकेचे प्रेसिडेंट रुझवेल्ट यांची पूर्वीपासून भारतीय जनतेचे राजकीय समाधान करावे अशी इंग्लंडच्या राज्यकर्त्यांना वारंवार टोचणी चालू होती. त्यांतच इंग्लंड युद्धाच्या घोर आपत्तींत सापडले असतांना भारतीय काँग्रेसच्या 'चलेजाव' च्या आदेशानें भारतांत तीव्र असंतोष पसरला. असे पाहून ब्रिटनचे मुख्यप्रधान विस्टन् चर्चिल यांनीं एक कमिशन नेमावयाचे ठरविले. त्या कमिशननें पुन्हां एकदां साक्षीपुरावा गोळा करावयाचा आणि विद्वत्तापूर्ण पण कोणाचेहि समाधान ज्याने होणार नाही, असे निवेदन करावयाचे ही ब्रिटिश साम्राज्यशाहीची पूर्वापार पद्धत भारतीयांनी अनुभवली होतीच. वरीलप्रमाणें ब्रिटिश सरकारनें सर स्टॅफोर्ड स्क्रीप्स यांच्या नेतृत्वाखाली एक कमिशन नेमले याचा कांहींहि परिणाम भारतावर व भारतातील असंतोषावर झाला नाहीं. त्यामुळें जनतेंत सरकारबद्दल अधिकच कटु भावना निर्माण झाली. काँग्रेसचा जबाबदार पुढारी बाहेर मार्गदर्शनासाठीं कोणीच नव्हते. तरुण कार्यकर्ते आपापल्या योजनेप्रमाणें चळवळ करू लागले. त्यांतूनच सातारा जिल्हयांत प्रतिसरकार स्थापन करण्याचा प्रयत्न अत्यंत जोरांत झाला. याच प्रतिसरकाराची परिणती पत्रीसरकारांत झाली. खेडोपाडी ब्रिटिश सरकारी हस्तकांचा बंदोबस्त या पत्रीसरकारमार्फत त्यांचे समजुतीप्रमाणें होऊ लागला. ब्रिटिश सरकारी हस्तकांना चांगलाच वचक बसला. या सरकारने ब्रिटिश सरकारशी यंत्रणेत व्यत्यय आणणेसाठीं टेलिफोनच्या तारा तोडणे, रेल्वेस्टेशनांची जाळपोळ करणें, रहदारी बगल्याचा नाश करणे, टपालांचा नाश व लुटालूट करणेचे सुरू केले. सदर कार्यक्रमाची खर्चाची व्यवस्था व्हावी, या सबबीवर शेणोलीजवळ पगारट्रेन आडवून लुटली गेली. अशासारखी विध्वंसक कार्ये महाराष्ट्रांत चालू होती. एकंदरींत या पत्रीसरकारनें हातांत कायदा घेतला होता. श्री. यशवंतराव यावेळी सातारा जिल्हयाबाहेर होते. अशा परिस्थितीत श्री. यशवंतराव भूमिगत असतांना त्यांना फलटण येथें अटक झाली. त्यांना येरवडा जेलमध्यें स्थानबद्ध करण्यांत आले.

सरकारी दडपशाही व लोकांची चळवळ यांची लढत जुंपली. दोन्ही पक्ष न्याय-निती व हिंसा-अहिंसा याचा विचार करीनासे झाले. त्यांत सरकारी सामर्थ्य विपुल यामुळें त्यांचे अत्याचार प्रखर व संख्येने जास्त

होते. अशाच एका प्रकारांत कॉंग्रेस वर्किंग कमेटिच्या सभासद अरुणा असफअल्ली यांच्याशी झालेल्या पोलिसी झटापटीत एक बॉंबस्फोट झाला. त्यामुळें त्यांवेळचे व्हॉईसरॉय लिनलिथगो यांनी महात्मा गांधींना पत्र पाठवून, वरील बॉंबस्फोट अहिंसेचे प्रतीक कीं काय ? म्हणून विचारणा केली, तेव्हां त्याचे उत्तर महात्मा गांधींनी समर्पक असे दिले कीं, सरकारी अत्याचारापुढें जे असे कांहीं प्रकार घडतात, ते कांहींच नाहीत. सरकार तोफा, बंदुका, विमाने, बॉंब अशा विध्वंसक शक्तिनें जनतेवर अत्याचार करीत असतांना जे कांहीं प्रकार घडतात, ती शूरांची अहिंसा आहे. मानव हा हिंस्र मनोवृत्तीचा आहे. त्यास संस्कारानेच संयमी व अहिंसक बनवावे लागते. आपण या गोष्टीचा निर्णय कोठल्याहि न्यायलवादापुढें मांडून घेऊ. या गोष्टीस व्हॉईसरॉयसाहेबांनी मान्यता दिली नाहीं. झाल्या प्रकाराबद्दल महात्मा गांधींनी आत्मशुद्धीसाठीं सन १९४६ च्या फेब्रुवारीत तुरुंगांत २१ दिवसाचा उपवास केला. तेव्हां सरकारनें महात्मा गांधींना जेलमध्यें सवलती दिल्या. पण त्यांना बंधमुक्त करणेस मुळीच तयार नव्हते. मात्र यावेळीं सन १९४२ साली पकडलेल्या कॉंग्रेसजनांना गटागटानें व मुदती मुदतीनें सोडण्यास सुरवात झाली. त्याप्रमाणें सातारा जिल्हयांतील ४५० बंदी मुक्त झाले. राजकीय कैद्यांच्या बंदमुक्ततेचे हुकूम जिल्हया जिल्हयांतुन येत असत. सातारा जिल्हयांतुन ' यशवंतराव चव्हाण ' या एकाच नांवाचे दोन डेटिन्यू पकडण्यांत येऊन त्यांची रवानगी हिंडलगा जेल व येरवडा जेल अशा दोन ठिकाणी झाली होती. कोल्हापूरचे यशवंतराव चव्हाण हिंडलगा जेलमध्यें, त्यांना सोडण्याचा हुकूम सातारा कलेक्टर ऑफिसमधून निघाला. पण कोणाच्या चुकीमुळें कोणास ठाऊक तो हुकूम येरवडा जेलमधील श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या मुक्ततेला कारण झाला व त्यामुळें श्री. यशवंतराव बंधमुक्त झाले.

## प्रतिसरकार किंवा पत्रीसरकार

ब्रिटिश सरकारच्या दडपशाहीविरुद्ध कॉंग्रेसनें चालविलेल्या चळवळीशी विद्रोह करणारी मंडळी कॉंग्रेस कार्यकर्त्यांच्या हालचालीच्या बातम्या गुप्तपणें सरकारला पुरविण्याचे काम करीत असत. अशा लोकांना दहशत

बसावी. तसेंच कॉंग्रेसच्या ता. ९ ऑगष्ट सन १९४२ च्या ' चले–जाव ' या ठरावाची अम्मलबजावणी कॉंग्रेसच्या तरुण कार्यकर्त्यांनी आपल्या समजुती-प्रमाणें भूमिगत होऊन सुरू केली होती. ब्रिटिश सरकारनें सर्व देशभर लहान मोठ्या पुढाऱ्यांना पकडून तुरुंगांत डांबल्यामुळें भूमिगत कार्यकर्त्यांना योग्य मार्गदर्शन मिळेनासे झाले. देशभक्तिनें प्रेरित होऊन भूमिगतांनीं आपापल्यापरी कांहीं भलेबुरे कार्य सुरू केले. सातारा जिल्ह्यांत रेल्वे स्टेशन जाळणें, पेट्रेन लुटणे, पोष्टाच्या तारा तोडणे, पोष्टाच्या टपालथैल्या लांबविणें. तसेंच सरकारपक्षीय लोकांना दहशत निर्माण करणें, बंदुका पळविणें अशासारखी कृत्ये होऊ लागली होती असे ऐकिवात येत होते. यावेळीं मी दिर्घ मुदतीच्या बंदीवासांत येरवडा जेलमध्यें असल्यामुळें प्रति-सरकार किंवा पुढें ज्याला पत्रीसरकार असे म्हणण्यांत येऊ लागले. त्या-संबंधी मला तर कांहीच कल्पना नव्हती. श्री. यशवंतरावांची येरवडा जेल-मधून कशी गफलतीनें सुटका झाली, हे वर आलेच आहे. या गोष्टीचा फायदा घेऊन त्यांनी महात्मा गांधींच्या २१ दिवसाचे उपोषणानुरोधानें भूमिगतांनावरील प्रकारानंतर पुढें योग्य मार्गदर्शन केले.

येरवडा जेलमधून चुकीनें झालेली श्री. यशवंतरावांची सुटका सरकारच्या ध्यानी आलेवर त्यांना पुन्हा अटक करणेची व तुरुंगांत डांबणेची तयारी सरकारनें केली. चौकशीची चक्रे सुरू होताच श्री. यशवंतराव भूमिगत झाले. त्यांचा शोध सुरू झाला. या कामी सरकारला लवकर यश येत नाहीं असे दिसून आल्यावर सरकारनें श्री. यशवंतरावांच्या पत्नी सौ. वेणूताईना गरोदर अवस्थेंत अटक केली. पण त्यांचेकडूनहि तपास लागण्याचे चिन्ह दिसेना. तेव्हां त्यांची मुक्तता करण्यांत आली. श्री. यशवंतरावांचे बंधु गणपतराव यांना अटक करून श्री. यशवंतरावाचा शोध घेण्याचा प्रयत्न सरकारनें करून पाहिला. तसेंच श्री. यशवंतरावांचे भाचे बाबुराव कोतवाल यांनाहि अटक करून त्यांचा अनन्वीत छळ करण्यांत आला. परंतु श्री. यशवंतरावांचा ठावठिकाणा लागला नाहीं. तेव्हां मोठे बक्षीस लावले. पण कांहीं नाहीं. कै. गणपतराव चव्हाण व बाबुराव कोतवाल यांना डेटिन्यू म्हणून डांबून ठेवण्यांत आले.

सन १९४४ मध्यें महात्मा गांधींची सुटका झाली. सन १९४५ साली जर्मन व जपान राष्ट्रांचा पराभव झाला त्यावेळीं राहिलेले सर्व कैदी सरकारनें बंधमुक्त केले. युद्ध समाप्तीनंतर इंग्लंडमध्यें नवीन निवडणूक झाली. त्यांत मजूरसरकार अधिकारावर आले. मेजर ॲटली मुख्यप्रधान झाले. त्यांनी व्हॉईसरॉय म्हणून माऊंटबॅटन यांची नियुक्ती केली. युद्धांत आझाद हिंद सेनेच्या सैनिकांना पकडले होते. त्यांचेवर खटले भरले. पण सारे राष्ट्र त्या सैनिकांच्या मागे उभे राहिले. त्यांच्या मुक्ततेची मागणी संपूर्ण राष्ट्रानें केली. सैनिकांच्या बाजूनें सर तेजबहादूर सप्रू, भुलाभाई देसाई यांच्यासारखे कायदेपंडीत व जवाहरलाल नेहरू वगैरे राष्ट्राचे नेते पुढें आले. हिंदी लष्करांतहि त्यांच्या सहानुभूतीसाठीं सैनिकांनी असंतोष प्रकट केला. त्यावेळचे ब्रिटिशसेनेचे सरसेनापती सरक्लाड आचिन्लेक यांना सर्व मुक्ती-सैनिकांना सोडून देण्याची विनंति ब्रिटिश सेनाधिकाऱ्यांनीहि केली, ती सरसेनापती सरक्लाड ऑचिन्लेक यांनी मान्य केली. चालू महायुद्धांत इंग्लडचे माणूसबळ फारच कमी झाले होते. इंग्लंडमधील सर्व उद्योगधंदे पूर्ववत चालू करणे, युद्धांत झालेली हानी भरून काढणे हे सर्व व्यवहार पूर्ण करून साम्राज्याच्या बंदोबस्तासाठीं लागणारे मनुष्यबळ इंग्लंडजवळ नव्हते. ब्रिटिश शिपाईहि परदेशांत राहणेस कंटाळले होते. याचवेळीं हिंदी लष्करां-तहि असंतोष होता. तेव्हां या सर्व परिस्थितीचा ब्रिटिश मजूर मंत्रिमंडळानें विचार करून भारताला स्वातंत्र्य देण्याचे जाहिर केले. त्याप्रमाणें त्यांनी अनेक प्रकारची गुंतागुंत निर्माण करून व पाकिस्तान स्थापन करून तसेंच ब्रिटिशांचे कमीतकमी नुकसान व भारतांत अधिकाधिक गोंधळ निर्माण करून १९४७ च्या ऑगष्ट महिन्याच्या १५ तारखेस इंग्रजांनी भारतांतून मायदेशी प्रयाण केले. भारतास स्वातंत्र्य मिळाले.

भारत स्वतंत्र झाला. अनेक वर्षांची कार्यकर्त्यांची तपश्चर्या फळास आली. स्वातंत्र्यप्राप्तीचा आनंद केवढा असेल म्हणून सांगू ? माझ्यासारखे छोटे मोठे कार्यकर्ते कृतार्थतेचे निश्वास टाकून आलेल्या स्वातंत्र्याचे सहर्ष स्वागत करीत राहिले. पण आलेल्या स्वातंत्र्यलक्ष्मीचे स्वागत करून स्वस्थ बसून भागणार नाहीं अशी जाणीव होऊ लागली. स्वराज्याचे सुराज्य झाले पाहिजे. किंबहुना 'रामराज्य' केले पाहिजे; या विचारानें विचारी,

ध्येयवादी कार्यकर्त्यांनी आपापली कार्यक्षेत्रे निवडून घेऊन कार्यास प्रारंभ करावयास पाहिजे होता. पण काय ?

श्री. यशवंतरावासारख्या प्रज्ञावंत राजकारभार कुशलावर नेतेपणाची जबाबदारी येऊन पडली. श्री. यशवंतरावांच्या कार्यकर्तृत्वाबद्दल कांहीं सांगण्याची आवश्यकता आहे असे नाहींच. कराड तालुका किंवा सातारा जिल्हाच नव्हे, तर महाराष्ट्र प्रांताची महामर्यादा ओलांडून ते अखिल भारताच्या भव्य पातळीवर स्वयंप्रज्ञेच्या जोरावर तळपू लागले असून जागतिक लौकिकाच्या क्षितीजावर डोकावू लागले आहेत. मला एवढाच आनंद आणि अभिमान कीं, बालपणापासून ज्याच्याकडे कांहीं अपेक्षेनें मी पाहिले, ती माझी दृष्टी सफल पूर्ण झाली. पण माझ्यासारखे अल्पसंतुष्ट आपल्या कुवतीप्रमाणें कार्यक्षेत्र निवडून घेऊन ते पार पाडण्याच्या मागे लागले.

स्वराज्यांत लोकशिक्षण आणि आरोग्य या दोन गोष्टीकडे लक्ष पुरविण्याच्या दृष्टीनें मी पाऊल टाकण्यास सुरवात केली. डॉ. एस्. एम्. कुलकर्णी यांच्या सहकार्यानें 'भडकमकर धर्मार्थ हास्पिटलचे' कार्य वाढविण्याच्या व स्थैर्य आणण्याच्या दृष्टीनें प्रयत्न सुरू केले, ते यशस्वी होऊ लागले. पण दुर्दैव असे कीं, विघ्नसंतोषी लोकांच्या कारवायामुळें संपूर्णतया नाउमेद व्हावयाचा प्रसंग आला. त्यांतच डॉ. कुलकर्णी यांच्या परदेशीय आगमनानंतर अकाली निधनानें हॉस्पिटल बंद करावे लागले. शैक्षणिक कार्याच्या दृष्टीनें आमच्या प्रयत्नांनी 'श्री शिवाजी एज्यूकेशन सोसायटीची' स्थापना होऊन ते कार्य चढत्या वाढत्या श्रेणीने चालू राहिले आहे. पण वयाच्या दृष्टीने व संधीसाधू वृत्तीनें स्वार्थ साधणाऱ्या वृत्ती समाजांत पावलोपावली खऱ्या कार्यकर्त्यांच्या मार्गात अडथळे व अडचणी उत्पन्न करू लागल्यामुळें कार्यनाश होऊ नये म्हणून झाली एवढी देशसेवा पुरे झाली अशा वृत्तीने राजकारणांतील आपली लुडबुड थांबविली आहे. पण त्याबरोबर शेवटी हेहि सांगितले पाहिजे कीं, मनांत जोपासलेली देशभक्तिची बीजे जेथें जेथें आणि जेव्हां जेव्हां सवड सापडेल तेथें तेथें व तेव्हां तेव्हां वर उफाळून आल्याखेरीज राहात नाहींत. परमेश्वर

सत्कार्याला केव्हांही साहाय्य करीत राहाणारच अशी आंतरीक प्रामाणिक ध्येयनिष्ठा बाळगून राहणे हेच आतां माझे कार्य आहे.

बौद्धिक, शारिरीक किंवा सांपत्तिक यातील कोणतीहि जबरदस्त अशी शक्ति नसतांना सन १९२४ ते १९३० विधायक कार्य. सन १९३० साली मिठाचा सत्याग्रहाबद्दल ३ महिने साधी व सभा, प्रभातफेऱ्यांमुळें ६ महिने सश्रम कारावास. सन १९३३ साली हजेरीभंगाबद्दल १ वर्ष सश्रम व दंडाबद्दल तीन महिने. तसेंच सन १९४२ साली डेटिन्यू म्हणून ३३ महिने कारावास मी आनंदानें भोगला. परमेश्वर कृपेनें भारताला स्वातंत्र्यप्राप्ती होऊन लोकशाही राजवट देशांत सुरू झालेली पहाणेचे भाग्य मला लाभले याबद्दल मी त्या जगन्नियंत्याचा सदैव ऋणीच राहीन.

जयहिन्द !

# श्री. यशवंतराव चव्हाण

## मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मुंबई.

'देशभक्तिची ज्योत माझ्या मनांत प्रथम कशी स्फुरली ?' असा प्रश्न 'शद्वरंजनच्या' संपादकांनी उपस्थित केला, तेव्हां क्षणभर माझे मन विचारांत पडले. राजकारणाच्या माझ्या पेशामुळे कदाचित असेल, परंतु फार लांबच्या भूतकाळाचा विचार करण्यास माझे मन कांहीसे अनुत्सुक असते. वर्तमानकाळाला आणि त्यामधील समस्यांना बाजूला सारून भूतकालाचा विचार करण्यासाठी काव्यात्मवृत्तीची आवश्यकता असते. अशा वृत्तीची जोपासना करण्यास आवश्यक ती सवड राजकारणाच्या धबडग्यांत आजवर मला कधी लाभलेली नाही.

असे असतांहि कराडच्या टिळक हायस्कूलच्या परिसरांत १९२५ पासून १९३२ पर्यंतच्या काळांत जी वर्षे मी घालविली, तिचा ठसा माझ्या साऱ्या जीवनावर इतक्या रम्योत्कट स्वरुपांत राहिला आहे कीं, या विशिष्ट कालखंडांतील आठवणी विसरू म्हटले तरी विसरण्यासारख्या नाहींत. ज्याचे वडील लहानपणीच वारले आहेत, असा गरीब शेतकऱ्याचा एक शाळकरी मुलगा देशभक्तीनें प्रेरित होऊन स्वातंत्र्यसंग्रामांत उडी घेतो, ही कल्पनाच वस्तुतः किती अद्‌भुतरम्य आहे ? पाषाणाला सुवर्णत्व प्राप्त करून देणारी ही किमया ज्या परिस्थितीने माझ्या आयुष्यांत घडवून आणली तिचा विसर यावज्जीव मला पडणे अशक्य आहे.

याच कारणानें 'शद्वरंजन'च्या संपादकांनी देशभक्ती भावनेच्या माझ्या मनातील उदयासंबंधीचा प्रश्न मला विचारला, तेव्हां माझ्या स्मृतीला पंख फुटल्यासारखे झाले. सचिवालयातील माझी 'समशीतोष्ण' कचेरी, कामाच्या फायली आणि दर अर्ध्या मिनीटाला वाजणारा टेलिफोन. या साऱ्या गोष्टी एखादी कळ फिरावी त्याप्रमाणे माझ्या मनांतून अंतर्धान पावल्या. आणि १९२७ ते १९३२ या कालखंडातील कऱ्हाड गांव आणि त्या गावांत

माझ्या अन्य मित्रमंडळीसमवेत देशप्रितीची दिक्षा मला कशी लाभली यांची चित्रे. हे प्रसंग जणू काल घडल्याप्रमाणें मला दिसू लागले.

माझ्या मनांत देशप्रितीची आवड कशी निर्माण झाली याचा त्रयस्थ बुद्धिनें मी विचार करतो, तेव्हां अमूक एका प्रसंगानें अथवा व्यक्तिच्या प्रभावानें ती निर्माण झाली असे वाटत नाहीं. राजकीय क्षेत्रांतील वा संशोधन क्षेत्रांतील नेतृत्वाची परंपरा ही एका दिव्यावरून दुसरा दिवा प्रज्वलित व्हावा त्याप्रमाणें एका व्यक्तिकडून दुसऱ्या व्यक्तिकडे संक्रांत होत, असे सामान्यतः मानले जाते. परंतु ज्यावेळीं देशभक्तिची प्रेरणा मला लाभली, त्याकाळीं महाराष्ट्राचे राजकीय पुढारी आपण होऊ असे मला वाटले नव्हते, अशी स्वप्नेंहि मनाशी नव्हती. त्याकाळी मनाची प्रेरणा अशी एकच होती आणि ती म्हणजे ब्रिटिशांच्या पारतंत्र्यांत पिढ्यान्पिढ्या अडकून पडलेल्या आपल्या मातृभूमीसाठीं आपण कांहीतरी केले पाहिजे. केवळ या भावनेनें देशाच्या स्वातंत्र्य युद्धांत ज्या हजारो तरुणांनी उडी घेतली, त्यापैकी मी एक होतो.

अशा स्थितीत घरामध्यें देशभक्तीची परंपरा नसतांना किंबहुना देश-सेवेच्या दृष्टीनें प्रतिकूल परिस्थिती घरांत असतांना स्वातंत्र्य युद्धाच्या चळवळीकडे मी ओढला गेलो. याचे सारे श्रेय त्याकाळच्या सर्व संचारी आणि स्फोटक राजकीय जागृतीला द्यावे लागेल असे मला वाटते.

माझ्या कुमार वयांतील कराड गांवाचे चित्र आज मी डोळ्यासमोर आणतो, तेव्हां ते सारे गांव देशभक्तीच्या एकाच भावनेनें मंतरलेले–भारलेले होते असे दिसते. त्या भावनेने सारा समाज आणि त्यातही समाजांतील तरुण–पिढी भारली गेली होती. देशासाठीं काय करू नि काय न करू अशी स्थिती समाजांतील आबालवृद्धांची झाली होती. शाळा कॉलेजातून शिकणाऱ्या मुलांच्या मनावर या भावनेचा विलक्षण पगडा बसलेला होता. कायदेभंग, स्वदेशीच्या भावनेनें देशांतील कोपरान्कोपरा भारून गेला होता.

या भावनेचे लोण मी रहात होतो त्या कराडगांवीही पोंचले होते. श्री. पु. पां. गोखले, श्री. गणपतराव आळतेकर, गणपतराव बटाणे हे

त्याकाळचे स्थानिक पुढारी म. गांधींच्या स्वराज्याचा आणि कायदेभंगाचा मंत्र घरोघरीं पोचवीत होते. या मंत्रामध्यें गांवांतील जलपाषाणांनाहि देशभक्तीची स्फूर्ती देण्याचे सामर्थ्य होते. मग माझ्या वयाची जी तरुण मुले होती, ती या मंत्रानें भारली गेली यांत आश्चर्य कसले ?

या कालचे सारे वातावरणच देशभक्तीच्या मंत्रानें मंतरलेले होते असे मी म्हटले तर ती अतिशयोक्ती होऊ नये. दरवर्षी भरणारी कॉंग्रेस अधिवेशनें म. गांधी, पं. नेहरू यासारख्या पुढाऱ्यांची जाहीर भाषणे आणि अनेक विविध चळवळीच्या रुपानें म. गांधींनी एखाद्या यज्ञकुंडाप्रमाणें धगधगीत ठेवलेला परकीय राज्यसत्तेविरुद्धचा असंतोष. यामुळें साऱ्या देशात राजकीय जागृतीचे 'न भूतो न भविष्यति' असे पर्व सुरू झाले होते. समाजांतील कांहीं हट्टी, मूर्ख आणि करंटे लोक सोडून दिले तर बाकी सर्व जनता देशभक्तीच्या भावनेने तापून निघाली होती. म. गांधींच्या स्वातंत्र्य युद्धांत स्वयंस्फूर्तीने सामील झालेल्या अशा लक्षावधी सैनिकापैकी मी एक होतो.

घरांत अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असतानाहि विद्या व्यासंगाची मला लहानपणापासून आवड असे. त्यामुळें प्राथमिक शाळेमधून सातवीची परिक्षा पास झाल्यानंतर कऱ्हाडच्या टिळक हायस्कूलमध्यें मला घालण्यांत आले. हायस्कूलमध्यें प्रवेश केल्यानंतर अभ्यासाव्यतिरिक्त दोन गोष्टीची मला विशेष आवड उत्पन्न झाली. यापैकीं एक म्हणजे तालमीची आणि दुसरी म्हणजे निरनिराळ्या देशांतील देशभक्तांची चरित्रे वाचण्याची होय. छत्रपती शिवाजीमहाराज, लोकमान्य टिळक, आगरकर, जोतीबा फुले यांची चरित्रे मी याच काळांत वाचून काढली. श्री. हरीभाऊ लाड, श्री. शिवाजीराव बटाणे या समवयस्क आणि समानवृत्तीच्या मित्रांचा लाभही मला याच काळांत झाला आणि मग या सर्व वाचन, मनन आणि चिंतनामधून माझा मनोपिंड पोसला गेला. उदात्तता, त्याग, तपश्चर्या, सेवा या गोष्टींची आवड माझ्या मनांत निर्माण झाली. श्री. लाड आणि श्री. बटाणे यांच्या सहाय्यानें इंग्रजी तिसरीमध्यें असतानाच मी कऱ्हाडमध्ये 'शिवाजी महोत्सव आणि गणेशोत्सव' हे दोन उत्सव सुरू केले. गणपती उत्सवासाठी राष्ट्रीय

मेळा सुरू केला आणि लोकजागृतीसाठी प्रभातफेरीचा कार्यक्रम सुरू केला.

आमच्या शाळेच्या आवारांत एक लिंबाचे झाड होते. त्यावर तिरंगी झेंडा लावून दररोज सकाळीं झेंडावंदनाचा कार्यक्रम करण्यास याचवेळीं आम्हीं सुरवात केली. या झेंडावंदनासाठीं शाळेंतील पन्नास पाऊणशे मुलें स्वयंस्फूर्तीनें जमत. आमच्या शाळेचे हेडमास्तर या गोष्टीकडे कानाडोळा करून या कार्यास उघड स्फूर्ती जरी नाहीं, तरी मूकपणें सहाय्य करीत असत. ध्वजवंदन करणे, वंदेमातरम् म्हणणे, प्रभातफेरी काढणे या आज राजकीय जीवनांतील अतिशय मामुली गोष्टी होऊन बसल्या आहेत. परंतु त्याकाळीं असे कांहीं करणे म्हणजे कारावासाला निमंत्रण देणे असे.

अशातऱ्हेनें विधायक आणि शांतपणे चाललेली माझी शालेय जीवनां-तील देशसेवा एकदम प्रकाशांत येण्याजोगा एक प्रसंग पुढीलच वर्षी घडून आला. १९२९ सालच्या लाहोर कांग्रेसमध्यें २६ जानेवारीच्या स्वातंत्र्य-दिनाच्या दिवशी गांवोगांवी देशनिष्ठेची शपथ घेणारी हस्तपत्रकें लावावीत असा एक ठराव झाला. त्या ठरावानुसार कऱ्हाड येथें पत्रके लावीत असता-नाच पोलिसांनी मला पकडले आणि इंग्रजी पाचवीत असतांनाच मला दंड आणि कारावास अशी दुहेरी शिक्षा झाली. यापैकीं कारावासाचे त्यावेळीं मला विशेष वाटले नाहीं. परंतु दंडाचे पैसे भरण्यासाठीं दिडशे रुपये पुणे येथील रानडे वक्तृत्व स्पर्धेत बक्षीस म्हणून मिळालेले मला खर्च करावे लागले. याचे त्याकाळीं माझ्या मनास फार दुःख झाले.

या कारावासातून सुटून आल्यानतर माझे शालेय जीवन व राजकीय जीवन पूर्ववत सुरू झाले. आणि १९३२ साली मी मॅट्रीकच्या वर्गात गेलो. या सालीं झालेल्या कायदेभंगाच्या चळवळींत मला पुन्हां एकवार अठरा महिन्याची सश्रम कारावासाची शिक्षा झाली. ही शिक्षा भोगून परत आल्यानंतर १९३४ साली मी मॅट्रीक झालो. देशासाठी कारावास भोगणारे देशभक्त आमच्या गांवी पुष्कळ होते. परंतु मॅट्रीक होण्याच्या अगोदरच दोनदा तुरुंगात जावून आलेला कुमार कार्यकर्ता आमच्या गांवांत मी एकटाच असेन.

देशभक्तीचे वळण माझ्या मनाला कसे लागले याची हकीकत थोडक्यांत ही अशी आहे. या हकिकतीमध्यें रोमांचकारी भाग थोडाबहुत निश्चितच आहे, परंतु त्यामध्यें अद्वितिय कांही आहे असे मला प्रामाणिकपणें वाटत नाहीं. देशप्रेमानें झपाटले जाण्याच्या भाग्यशाली कालखंडांत दैववशात् माझा जन्म झाला. देशप्रीतीच्या भावनेने झपाटलेले अनेक तरुण महाराष्ट्रात त्याकाळी होते. अशापैकींच मीहि एक होतो. त्यामुळे देशासाठीं आपण कांहीं केले, म्हणजे फार मोठा पराक्रम केला असे यावेळीं मला वाटले नाहीं, आजही तसे वाटत नाहीं.

( मासिक शब्दरंजन दिवाळी विशेषांक १९६२ वरून )

★

## वयाच्या ६५ व्या वर्षपूर्तीचेवेळी झालेल्या

# सत्कार समारंभाचे इतिवृत्त

**समर्थ** : दिनांक २० ऑगष्ट १९७०

(आमच्या विशेष प्रतिनिधीकडून)

## कृष्णाकाठच्या विद्यापीठात राजकीय शिक्षणाचे पाठ गिरवले.

**" चाळीस वर्षापूर्वीचा राजकीय इतिहास जनतेसमोर यावा म्हणून त्या पिढीतील साऱ्यांचा प्रातिनिधिक व प्रतिकात्मक सत्कार असे या सोहळ्याचे स्वरुप आहे. मृत्यूचा क्षण जवळ आला तरीही न हलणारा तो धैर्यवान माणूस अशीही व्याख्या करता येईल. स्वातंत्र्य टिकविण्यासाठी ध्येयवादी व धैर्यवान माणसांची गरज आहे. त्यांच्या कार्याची सतत आठवण राहिली पाहिजे. "**

" मंदिराचा शोभिवंत कळस आपल्याला दिसतो, पण हा डोलारा पेलणाऱ्या मंदिराच्या पायातील भरभक्कम दगड दिसत नाहीत, जनतेला आमच्यासारखे नेते दिसतात, आमचे फोटोही छापून येतात, पण समाजासाठी झिजणारे श्री. हरीभाऊ लाड यांच्यासारखे चंदनाचे खोड समाजाला कां दिसू नये " असे भावपूर्ण उद्‌गार केंद्रीय अर्थमंत्री श्री. यशवंतरावजी चव्हाण यांनी कराडातील जुन्या पिढीतील एक श्रेष्ठ स्वातंत्र्य सैनिक श्री. हरीभाऊ लाड यांच्या ६५ व्या वाढदिवसाच्या सत्कार सोहळ्यात अध्यक्षपदावरून बोलताना काढले. व्यासपीठावर गेल्या चाळीस वर्षात राष्ट्रीय चळवळीमध्ये आघाडीवर असलेले अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. त्यामध्ये दे. भ. दादासाहेब आळतेकर, गौरीहर सिंहासने, व्यंकटराव पवार, काशीनाथ देशमुख आदि उल्लेखनीय होत. या सत्कारसमितीच्या वतीने

श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते श्री. हरीभाऊ लाड यांना एकवीस हजार रुपयांची थैली अर्पण करण्यात आली. यापैकी अकरा हजार रुपयाचा निधी कराडच्या जनतेने व दहा हजार रुपये अर्थमंत्री चव्हाणानी जमा केले होते. याचवेळी सौ. लाड यांचाहि सत्कार करण्यात आला.

नवीन कार्यकर्त्यांना आपुलकीच्या दृष्टीकोनातून मार्गदर्शन घडावे व जुन्या पिढीच्या सेवेचा विसर पडू नये याकरिता हा सत्कार–सोहळा आयोजित केल्याचे नगराध्यक्ष पी. डी. पाटील यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणांत सांगितले.

दे. भ. दादासाहेब आळतेकर यांनी श्री. हरिभाऊ लाड यांच्या अर्पित भावनेतील प्रखर देशभक्ति विषद करून सांगताना म्हटले, बाह्य उपचारावर कुणाच्याहि सामर्थ्याची कल्पना येत नाही. त्याकरिता कार्य करण्याची अपूर्व शक्ति असावी लागते. गांधीजींचा मीठसत्त्याग्रह ज्याच्यात संचारला होता, अशापैकी हरिभाऊ एक आहेत. १९२३ सालचा कराड शहरातील पहिला सत्त्याग्रही म्हणून त्यांची नोंद स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास लिहितांना करावी लागेल. त्यांच्या समर्पित जीवनामध्यें स्वातंत्र्याबद्दलची भक्ति दिसून येते. पारतंत्र्य धुडकावण्याची शक्ति त्यांच्यामध्यें होती. १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यामध्यें सर्वात उशीरा सुटणारा सत्याग्रही म्हणून त्यांचा गौरव करावा लागेल.

आमच्या घरातल्या माणसाचा, घरातल्या माणसाकडून व घरातल्या माणसासमोर होत असलेला हा सत्कार आहे असे सांगून श्री. काशीनाथ देशमूख ( तांबवेकर ) म्हणाले, समाजातील अत्यंत दुबळा माणूस सत्त्याग्रह करू शकतो हे गांधीजींनी सिद्ध केले आहे. आपल्या स्वतःसाठी काही करू न शकणारा व देशातील साम्राज्यशाही हादरून सोडणारा सर्वात मोठा पंगू सत्त्याग्रही म्हणून हरिभाऊंचा गौरव केला पाहिजे.

ना. यशवंतराव चव्हाणासारख्या लोकशाहीच्या मानकऱ्याला सभेच्या सिंहासनावर नेऊन बसविणारा एक मायेचा वडीलधारी नेता या समर्पक व अचूक शब्दामध्यें श्री. संभाजीराव थोरात यांनी हरिभाऊंचा गौरव केला.

श्री. व्यंकटराव पवार व गौरीहर सिंहासने यांचीही भाषणे झाली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. यशवंतरावजी चव्हाण म्हणाले, ' चाळीस वर्षापूर्वीचा राजकीय इतिहास जनतेसमोर यावा म्हणून त्या पिढीतील साऱ्यांचा प्रातिनिधिक प्रतिकात्मक सत्कार असे या सोहळ्याचे स्वरुप आहे. मृत्यूचा क्षण जवळ आला तरीही न हलणारा तो धैर्यवान माणूस अशी व्याख्या करता येईल. स्वातंत्र्य टिकविण्यासाठी हरिभाऊ-सारख्या ध्येयवादी व धैर्यवान माणसाची गरज आहे. त्यांच्या कार्याची सतत आठवण राहिली पाहिजे.

१९२५ ते २८ च्या काळांत हरिभाऊसारखे कार्यकर्ते जर भेटले नसते तर आम्ही एवढे वाढलो नसतो. कारण मंडईच्या कोपऱ्यावर राजकीय शिक्षणाची गोडी आम्ही हरिभाऊजवळ शिकलो. युवकांना विचार देवून वाढविणारा एक राजकीय व्यापारी म्हणून मी हरिभाऊकडे पहातो. कृष्णा-काठच्या या विद्यापिठामध्ये आम्ही राजकीय शिक्षणाचे पाठ गिरवले. हरि-भाऊंच्या तोंडामध्ये दात नाहीत, पण चावा घेण्याची शक्ति मात्र आहे. दहा वर्षे मी हरिभाऊजवळ राजकारणाचे धडे गिरवले. त्यांच्या समवेत घालवलेली दहा वर्षे हा माझ्या जीवनातील अमोल ठेवा आहे. हरिभाऊंच्या राष्ट्रसेवेचा गौरव करण्यासाठीं व त्यामधून अंशतः उतराई होण्यासाठी त्यांना जो आम्ही प्रेमाने निधी देत आहोत, त्या निधीचा उपयोग हरिभाऊंनी स्वतःच्या कुटुंबियाकरता करावा. जनतेचे संसार सांभाळण्यास आम्ही समर्थ आहोत.

सद्गदित अंतःकरणाने सत्कारास उत्तर देतांना हरिभाऊ म्हणाले, मला स्वातंत्र्याचा मोह होता, ते मिळाले आहे. माझ्या राजकीय जीवनाला जे वळण लागले, माझ्यावर जे चांगले संस्कार झाले त्याचे श्रेय यशवंतरावजींना आहे.

यानंतर आभार प्रदर्शन होऊन हा कार्यक्रम संपला.

★

## चुकीची दुरुस्ती–

पान ७१ ओळ ६ मध्यें सन १९३३ ऐवजी १९३२ असे वाचावे.

# — देशभक्त हरिभाऊ —

मायभू विमोचनार्थ स्वार्थ होमुनी
धन्य तुम्ही मान्य तुम्ही जाहला जनी ॥ धृ० ॥

ज्ञानाचे बळ समृद्ध ते असो नसो
दुर्बल तनु होय परी ध्येय मनि वसो
निष्ठा ही वागविली नित्य जीवनी
धन्य तुम्ही मान्य तुम्ही जाहला जनी ॥ १ ॥

शोभविते स्वाभिमान अंगी नम्रता
कार्योत्सुक वृत्ति खुलवि प्रबल अस्मिता
सत्कार्या सफल करी प्रेमपूजनी
धन्य तुम्ही मान्य तुम्ही जाहला जनी ॥ २ ॥

कारागृह कष्ट हाल साहिले सुखे
शरणागति शब्द न ये ज्याचिया मुखें
तप कठोर आदर्शचि राहि होऊनि
धन्य तुम्ही मान्य तुम्ही जाहला जनी ॥ ३ ॥

एक ध्यास दास्यमुक्ति मातृभू पुजा
सेवाव्रत आचरिले शिकविले दुज्या
भाग्य थोर होउनि कृतकार्य जीवनी
धन्य तुम्ही मान्य तुम्ही जाहला जनी ॥ ४ ॥

कराड
१६–८–१९७०

बाळकृष्ण
कराड.

☆

# नम्र विनंति

प्रस्तुत पुस्तकाच्या पुरस्कारात ना. यशवंतरावजीनी "माझ्या बाबतीतील कांहीं घटनांचा तपशील कदाचित पुढे मागे करावा लागेल" असे एक वाक्य लिहिले आहे. त्यानुसार दुरुस्ती खालील-प्रमाणें करून घेऊन वाचावी अशी विनंती आहे.

पान ३८ ओळ ११ वर " निरनिराळे गट आपापल्या कामावर रुजू झाले ...... ........ पासून पान ३९ वरील पहिल्या ११ ओळी अखेर मजकूर सन १९३० सालचा म्हणून छापला गेला आहे, तो थोडयाशा स्मृति प्रमादामुळें छापला गेला आहे. तो सर्व मजकूर खरा आहे, पण तो १९३२ सालच्या जानेवारी महिन्यात घडला आहे. तो पृष्ठ ५० वरील खालून ३ ऱ्या ओळीच्या पुढें म्हणजे "श्री. यशवंतराव कॉंग्रेसच्या चळवळीची व्यवस्था करण्यात गुंतले होते ही गोष्ट नोकरशाहीस आवडली नाही" यापुढें वाचावा.

लेखक

☆